।। श्री स्वामी समर्थाय नमः।।

# ।। श्री शिव नवशती ।।


वैद्य गणेश लक्ष्मणराव शिंदे

(B.A.M.S.)



मनकर्णिका पब्लिकेशन

## ।। पहिला अध्याय ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सीतापतये नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री शिवाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

गजानना हे गणाध्यक्षा। ठेविला तव चरणी माथा। विघ्नहर्ता तू सुखकर्ता। शिवपुत्र तू आद्य पूजिता।।१।। असावा शिरी तव वरदहस्त। विनवितो मी होवोनी विनित। देऊनी मम लेखणीस सामर्थ्य। करावी पूर्ण ही शिव नवशती।।२।। आता नमितो शारदे तुजसी। असशी वाणीची तू अधिष्ठात्री। बहरवून माझी प्रतिभा शक्ती। करी देवी कृपा तू मजवरी।।३।। माझे सद्‌गुरु स्वामी समर्थ। असती प्रत्यक्ष परमात्म रुप। तयांची कृपा होताच शीघ्र। पूर्ण होई काज नम्र भक्तांचे।।४।। प्रेरण मज दिधली तयांनी। म्हणती लिहावी शिव नवशती। दिली मजहस्ती ही लेखणी। होईल पूर्ण ती त्यांच्या कृपेने।।५।। आता श्रीशंकरा तुजसी नमन। असशी उत्पत्ती - स्थिती - लय कारण। स्वीकारुनी माझे नम्र वंदन। करावी कृपा या लक्ष्मणसिंधु सुतावरी।।६।। सदाशिवा तू सदैवची शिव। तुझा पवित्र मंगल गौरवर्ण। शिरी धारण केला सोम। गंगेचा निर्मल प्रवाह मस्तकी।।७।। डमरु हस्ती केलासी धारण। त्रिशूळ

शोभवी तव अपरकर। शोभती तेजपूर्ण त्रिनयन। असशी तू स्वत: पंचमुख।।८।। तुझे भाळी असे भस्मलेपन। केलेसी तू धारण व्याघ्रचर्म। गळयात शोभे मुण्डमाळ। रुद्राक्षमाळ ही शोभतसे गळा।।९।। तूची परमतत्त्व परब्रह्म। मूळस्वरुप तुझे निर्विकार। करीन यथामती तव वर्णन। असावे प्रसन्न तू सदा।।१०।। ब्रह्मदेवासी पूसे नारद। सांगावे वर्णून शिवस्वरुप। मोदे म्हणती तया ब्रह्मदेव। वर्णिन मी पापनाशक शिवतत्त्व।।११।। महाप्रलयांती झाले नष्ट विश्व। राहीले शेष सत्स्वरुप ब्रह्म। नसे तया नाम, रस, रुप, गंध। नसे त्या नाश, वृध्दि ही नसेची।।१२।। एकमेव, सत्यस्वरुप, ज्ञानरुप। अनंत, परमानंदमय, ज्योतिस्वरुप। अविनाशी, अप्रमेय आणि अव्यय। असे ते आधारहीन अखण्ड।।१३।। सर्वव्यापी, निर्गुण अन् निराकार। निर्विकार, निर्विकल्प, निरारंभ। आदि मध्यान्तरहित, उपद्रवरहित। अनादि आणि चिन्मयरुप त्याचे।।१४।। शब्द असमर्थ करण्या वर्णन। नसे ते ज्ञानाचा विषय। आकलन करणे असे कठीण। असे ऐसे हे शिवतत्त्व।।१५।। उत्पत्ती समयी जाहले स्फुरण। असे मी एक व्हावे अनेक। अनुसरुन हया स्वसंकल्पास। केली कृती शिवस्वरुपाने।।१६।। आपुल्याच लीला सामर्थ्याने। निर्मिली आपुलीच मूर्ती त्याने। मूर्ती करुनी निर्माण स्वहस्ते। पावले अंतर्धान शिवतत्त्व।।१७।। होती ती सकल गुणैश्वर्य युक्त। शुभ स्वरुपी दिसे शोभायमान। सर्वाद्या सर्वस्वरुपी वंदनीय। संस्कृती केंद्र

ती ज्ञानदात्री।।१८।। असे हे परमात्म्याचे मूर्तरुप। म्हणती तयासीच सदाशिव। विद्वान म्हणती त्यांनाच ईश्वर। करीतो स्वेच्छेने तो विहार।।१९।। सदाशिवाने नंतर पुढती। स्वशरीरातून निर्मिली एक शक्ती। तीच प्रधान, माया, प्रकृती। असे विकाररहीत ती गुणवती।।२०।। म्हणती तिजसी शक्ती अंबिका। सर्वेश्वरी ती प्रकृती नित्या। विश्वाचे मूल कारण ती त्रिदेवमाता। असे ती सर्व शुभ लक्षणयुक्त।।२१।। असती अष्टभुजा तिजसी। मुखमंडळ तिचे अतिशय तेजस्वी। विविध सुंदर आभूषणे धारण करी। हाती असती अस्त्र आणि शस्त्रे।।२२।। परमपुरुष, शिव आणि ईश्वर। शंभू , महादेव आणि महेश्वर। असती सदाशिवाची नामे अनेक। देवाधिदेव ऋषी पूजिती त्यास।।२३।। मस्तकी गंगा माथ्यावर चंद्र। पाचमुखे प्रत्येकास त्रिनेत्र। असती तयास दहा हस्त। त्रिशूळ धारण करी तो नित्य।।२४।। अंगकांती त्याची कर्पूरा सामन। असे सदाशिवाचा श्वेत वर्ण। शरीरावर सदा भस्माचे लेपन। शोभे नित्य ऐसा सदाशिव।।२५।। अंबिका सहाय्ये केले निर्माण। क्षेत्र पवित्र 'शिवलोक' नाम। तेची ते परमपावन स्थान। 'काशीक्षेत्र' नामे असे विख्यात।।२६।। परमकल्याण प्रद असे सदाशिव। करती निवास प्रिय शक्तीसह। प्रलय समयी ही न सोडती हे क्षेत्री। म्हणती यासी 'अविमुक्तक्षेत्र'।।२७।। आनंदे शिवाने निर्मिले हे वन। म्हणुनी 'आनंदवन' असे नाम। काशीक्षेत्र हे भुवरी मोक्षदायक। असे

परमानंदमय स्वरुप त्याचे।।२८।। क्षेत्री करीत असता विहार। स्फुरला शिवाचे मनी विचार। करावे आपणच पुरुषास उत्पन्न। द्यावे त्यास सृष्टी संचलन कार्य।।२९।। मग आपुले डाव्या अंगास। लावीले शिवाने अमृतास। झाला एक पुरुष उत्पन्न। सुंदर सत्वगुणी सागरा समान।।३०।। अंगकांती इंद्रनील मण्यासम। नेत्र तयाचे दिसती पंकजाासम। त्याचे सुवर्णासम पितांबर अन् उपवस्त्र। झळके शरीर दिव्य प्रभेने।।३१।। केले त्याने शिवास वंदन। म्हणे मजसी द्यावे नाम। सांगावे मजसी कोणते कार्य। ऐकोनी वदले त्यास सदाशिव।।३२।। असशील तू विश्वव्यापक। म्हणून 'विष्णु' तव अभिधान। असती तुजसी नामे अनेक। करी तू तपश्चर्या येथे राहून।।३३।। शिवजींनी मग दिले तयास । श्वासमार्गाने वेदांचे ज्ञान। तेंव्हा शिवासी करुनी नमन। झाले विष्णु तपश्चर्यत मग्न।।३४।। केली तपश्चर्या वर्षे बारा हजार। ऐकू आली शिववाणी तयास। म्हणे पुन्हा तू तपश्चर्या कर। केले विष्णुने प्रखर तप।।३५।। जाहला शिवाचा साक्षात्कार। जाहले विष्णु अतिप्रसन्न। परी जाहले तपश्चर्येचे श्रम। वाहू लागल्या घामधारा।।३६।। व्यापीले धारांनी शून्य अवकाश। जाहले सर्व पूर्ण जलमय। गेले होते विष्णु अति श्रमून। केले त्यांनी जलात शयन।।३७।। 'नार' याचा अर्थ जल। केले विष्णुंनी जलात शयन। प्राप्त झाले 'नारायण' नाम। होते तेंव्हा ते एकमेव तेथे।।३८।। त्यांच्या पासून झाली तत्त्वे उत्पन्न। त्रिगुण

त्रिविध अहंकार झाले उत्पन्न। पंचतन्मात्रा झाल्या अहंकारातून। झाली त्यापासूनच पंचमहाभूते।।३९।। झाली ज्ञानेंद्रिये कर्मेंद्रिये उत्पन्न। झाली त्याच्या प्रकृती पासून उत्पन्न। त्याकारणेच ती असती जड। केली विष्णुंनी सारी ग्रहण।।४०।। झाली शिवाज्ञा विष्णुने म्हणून। होते केले त्यांनी ब्रह्मजलात शयन। शिवेच्छेने तेंव्हा त्यांच्या नाभीतून। जाहले मोठे कमळ उत्पन्न।।४१।। शिवजींनी तेंव्हा स्व वामांगातून। केले ब्रह्म देवास त्यांनी उत्पन्न। दिले ब्रह्मास नाभी कमळात ठेवून। भासाविले (ब्रह्मास) मज मी कमलोरभव।।४२।। शिवमायेने झालो मी मोहीत। नव्हते ज्ञात मी कोणाचा सुत। तेंव्हा मी केला विचार मनात। गेलो कमलदेठातून शोधण्या उगम।।४३।। नाही सापडला मज उगम। निघालो मग मी परत फिरुन। कमळही तेंव्हा न दिसे मज। तेणे जाहलो मी संभ्रान्त।।४४।। झाली आकाशवाणी तेंव्हा। तप करण्याची केली आज्ञा। केले घोर तप वर्षे बारा। माझ्या जन्मदात्यास शोधण्यासाठी।।४५।। जाहले विष्णु तेंव्हा प्रकट। केला मी त्यांस हस्तस्पर्श। विचारीले मी आपण कोण। प्रेमपूर्वक हसून वदले ते मज।।४६।। वत्सा, करीतो तुझे स्वागत। राहा येथे तू निर्भय होऊन। करीन तुझ्या कामना पूर्ण। चिंता मुळी नको करु।।४७।। ऐकून झालो मी संतप्त। समजता का मज तुमचा शिष्य। असे स्वयंभू मी विश्वत्मरुप। वेदही 'परमेष्ठी' मानती मज।।४८।। ऐकून झाले विष्णु कोपायमान। झालासी

तू मजपासोन उत्पन्न। माझ्याच मायेने मोहीत होऊन। मानसी तू स्वत:सच श्रेष्ठ।।४९।। असे मीच परमतत्त्व परब्रह्म। असे मी नारायण देवांचा ईश्वर। हे सारे व्यक्त - अव्यक्त विश्व। सर्व ही असे माझीच लीला।।५०।। करतो विश्व निर्माण - पालन - संहार। असे मीच बुध्दिचा जनक। झालास मम नाभी कमलातून प्रकट। यावे तू शरण मजसी।।५१।। ऐकोनी अस मी म्हणालो त्यास। शरण येण्या मज सांगतोस। परब्रह्म स्वत: मानतोस परी तव ब्रह्म। तुमचा ही निर्माता असे अन्य।।५२।। जाहले आमच्यात युध्द दारुण। दोघांमध्ये अग्निस्तंभ झाला प्रकट। त्या तेजस्वी अग्निस्तंभास पाहून। जाहलो उभय आश्चर्य चकित।।५३।। घेऊनी विष्णुंनी श्वेत वराह रुप। गेले वेगाने खाली पाताळात। घेऊनी मग मी हंसरुप। गेलो स्तंभाचे वरचे बाजूस।।५४।। न मिळे आम्हा आदि अंत। आलो थकून आम्ही परत। गेला गळून आमचा अहंकार। केले आम्ही अग्निस्तंभास वंदन।।५५।। केले आम्ही त्यास निवेदन। म्हटले द्यावे आम्हा तव दर्शन। दीनांचे पालक शंकर भगवान। जाहले ते आम्हावर प्रसन्न।।५६।। ओंकार नाद प्रकटला स्तंभातून। झाले विष्णुस 'अ ' 'उ' 'म' चे दर्शन। जाणले मग त्यांनी मनात। होई ओंकार (ॐ) याच अक्षर ब्रह्मातून।।५७।। असे 'अ' कार सूर्यासम तेजोमय। 'उ' कार अग्निसम असे दिप्तीमान। 'म' कार चंद्रासम उज्ज्वल प्रकाशमान। सहजेची ते पाहीले

विष्णूंनी।।५८।। अन्तर्बाहय निर्मळ प्रभेने युक्त। अदि - मध्य - अन्त रहीत। विश्वाधारभूत अमृतमय सत्य। झाला परब्रह्म साक्षात्कार त्यास।।५९।। श्री हरींनी फीरुनी मग। केले शिवाचे मनसा चिंतन। गेले खाली घेण्यास शोध। तेंव्हा ऋषी जाहले प्रकट।।६०।। ऋषी तेंव्हा म्हणाले विष्णूस। परब्रह्मस्वरुप स्वत: शिव। तेजस्वी ज्योतिर्मय लिंगरुपात। असती येथे प्रकट झाले।।६१।। प्रणव, एकाक्षर, परब्रह्म वाचक। परमात्म्याचे ते व्यक्त रुप। सांगतो मी तयाचे सामर्थ्य। नाद ब्रह्ममय रुप असे त्याचे।।६२।। 'अ' कारतून ब्रह्मदेवाचा बोध। 'उ' कारातून होई विष्णुबोध। 'म'कारातून स्वयं शिवाचा बोध। असे हाच खरा बीजमंत्र।।६३।। अकार संज्ञक ब्रह्मदेव बीज। असती योनी हरी योनी संज्ञक। बीजी असती स्वत: शिव। असती नादरुपे सर्व समाविष्ट।।६४।। शिवलिंगा पासून 'अ' कार बीज। झाले अंडे 'उ' कार योनीत पडून। हजार वर्षे अंडे होते तसेच । केली शिवांनी त्याची दोन शकले।।६५।। वरच्या शकलापासून स्वर्ग। झाली पृथ्वी खालच्या शकलापासून। भव (शंकर) आणि ब्रह्मदेव। जाहले उत्पन्न अंडयातून।।६६।। 'अ' 'उ' 'म' अक्षराधिष्ठित। असती परब्रह्मरुपी शिव। त्या कारणे त्या अग्निस्तंभातून। केले सूचित ओंकार (ॐ) ध्वनितून।।६७।। आले श्रीविष्णूचे हृदय भरुन। केले तयांनी महेश्वराचे स्तवन। जाहले प्रकट स्वयं महादेव। आभूषणांसह मूर्त स्वरुपात।।६८।।

जाहलो आम्ही उभय कृतार्थ। केले शिवाने शब्दमय रुप प्रकट। सर्व अव्यये आणि सर्व व्यंजने। होती सामावली त्यांच्या अवयवात।।६९।। शब्द ब्रह्म शरीरधारी शिव। होती उमादेवी त्यांच्या समवेत। जाहलो प्रसन्न उभयतांस पाहून। केले नमन तयांचे चरणी।।७०।। पाहीले 'ॐ तत्त्वमसि' महावाक्य। पुरुषार्थद बुध्दिस्वरुपी गायत्री मंत्र। मृत्युंजय, पंचाक्षर, दक्षिणमूर्ति मंत्र। चिंतामणी मंत्र दृगोच्चर झाले।।७१।। ध्यानात ठेवून हे सारे मंत्र। करु लागले श्रीहरि ध्यान। नंतर निर्गुण, निराकार, निर्विकार। शिवाचे आम्ही केले स्तवन।।७२।। झाले सदाशिव अतिशय प्रसन्न। घेतले अक्षरब्रह्ममय रुप आवरुन। जाहले प्रकट साकार सगुण। होती भगवती उमा तयांसह।।७३।। केले आम्ही उभयतांस वंदन। दिले शिवांनी वेद श्वासातून। विचारीले श्रीहरीने तयांस। सांगावे आम्हा आमुचे कार्य।।७४।। श्री शिव म्हणाले आम्हास। करावे सगुणरुपी माझे पूजन। माझे लिंग असे माझेच रुप। करावे माझे लिंग पूजन।।७५।। केले आम्ही उभयतांचे भक्तिपूर्ण पूजन। जाहले सदाशिव अतिशय प्रसन्न। दिधली तयांनी आम्हा वरदाने अनेक। म्हणाले होईल हा मम पूजन दिवस।।७६।। म्हणतील या तिथीस शिवरात्र। करील जो या दिवशी उपोषण। घेऊनी मम दर्शन करील पूजन। तो सुखसमृध्दी, मोक्ष, करील प्राप्त।।७७।। असे मी परमात्मा सच्चिदानंदरुप। असे मीच निर्विकार परब्रह्म। सृष्टी

सृजन,पालन, आणि लय। करीतो मीच तिन्ही कार्य।।७८।। सांगितले मग त्यांनी मज। होईल उत्कृष्ट पुरुष तव अंगातून। रुद्र ऐसे असेल त्याचे नाम। सामर्थ्यवान तो मज सम (शिवासम)।।७९।। असेल आमुचे अभेद रुप। जगद् व्यवहारास्तव होऊ विभक्त। घेऊनी सर्वांनी हे ध्यानात। पहावे सर्वत्र शिवरुप त्यांनी।।८०।। माझे रुप आहे सनातन। सर्वरुपात मी हेच खरे ज्ञान। करु नये ब्रह्मा, विष्णू असा भेद। विष्णू, ब्रह्मा, रुद्र एकच रुप।।८१।। आता ब्रह्मा सांगतो तुज। होईन मी प्रकट तव भुवयांतून। नंतर तू सृष्टीचा निर्माता। विष्णु पालन, रुद्र लयकर्ता कराल कार्य।।८२।। ही जी उमा नामक देवी। मम अर्धांगिनी मूळ प्रकृती। वाग्देवीरुप तिची अंगभूत शक्ती। होईल ब्रह्मा तव अर्धांगिनी।।८३।। दुसरी तिची शक्ती लक्ष्मीरुपी। होईल ती विष्णूची पत्नी। कालीरुप तिची अंगभूत शक्ती। होईल ती रुद्र अर्धांगिनी।।८४।। ब्रह्माने वाग्देवीचे साहाय्याने । करावे संचलन सर्व सृष्टीचे। करावे पालन लक्ष्मीसह विष्णूने। रुद्ररुपे काली साहाय्ये करीन मी लय।।८५।। या नंतर करावे तुम्ही अन्य कार्य। आहात तुम्ही ज्ञान - विज्ञान - संपन्न। करावे तुम्ही लोकांचे हितरक्षण। माझ्या आज्ञे व्हावे मोक्षदाते।।८६।। हे ब्रह्मा मम दक्षिणांगातून। असशी झाला तू उत्पन्न। विष्णु तू माझे वामांगातून। असशी तू झाला निर्मित।।८७।। रुद्राची निर्मिती मम हृदयातून। ऐसे माझे ब्रह्मा विष्णू रुद्र रुप। सत्त्व

- रज - तम गुणांचा आधार घेऊन। करीतसे मी त्रिविध कार्ये।।८८।। जाहलो जरी मी त्रिगुण युक्त। परी ते रुप कार्या निमित्त मात्र। असे मी अज, अविनाशी, निरंजन। सर्वव्यापी एकमेव मी परमात्म रुप।।८९।। ब्रह्मदेव असेल आंतर्बाह्य। रजोगुण युक्त त्यांचे स्वरुप। विष्णूचे अंतस्थ तमोगुणरुप। परी बाह्यरुप ते सत्त्वगुण युक्त।।९०।। त्रैलोक्य संहारक हा रुद्रदेव। असेल सत्वगुणी तो अंतस्थ। परी बाहय व्यक्त त्याचे रुप। असेल ते तमोगुण युक्त।।९१।। हे तुमचे गुणांचे प्राबल्य। होईल याचे ज्ञानीजनांस ज्ञान। येईल त्यांनाच ते प्रत्ययास। करतील ते तुमचे पूजन।।९२।। आता विष्णू सांगतो मी तुज। करावे सृष्टीचे पालन रक्षण। सृष्टीकर्त्या ब्रह्माचेही करी पालन। तेणेची होशील त्रिलोकी वंद्य।।९३।। दुसरी आज्ञा आहे तुज। ब्रह्मदेव निर्मित या लोकांत। दु:ख संकट होता उत्पन्न। करावे तत्परतेने तू निवारण।।९४।। या कठीण कार्यात सदैव। देईन मी तुजसी साथ। करुनी तुझ्या शत्रुंचा नाश। जाण तू हृदयी निश्चये।।९५।। वेळोवेळी कार्य निमित्ते करुन। विविध अवतार करुन धारण। सर्वांचा करुनी तू उध्दार। वाढवी आपुली तू कीर्ती।।९६।। होशील तू भोग - मोक्ष दायक। होशील तू सर्वांस परमपूज्य। करतील तुझे ध्यान आणि पूजन। होशील भक्तवत्सल म्हणून ख्यात।।९७।। करशील वेळोवेळी दुष्ट संहार। होईल तेणे सज्जन रक्षण। करुनी भयंकर दैत्यांचा नाश। करशील

साधुजनांचे तू प्रिय।।९८।। शरणागतास द्यावे तू अभय। होशील सज्जनांचा सखा जीवलग। परी रुद्र हेच तुझे परम ध्येय। रुद्ररुपात करशील तू माझे ध्यान।।९९।। सांगितले नारदास जे ब्रह्मदेव। स्वामी कृपे तेची सांगितले। शिवस्वरुपाचे बीज कथिले। सारे अर्पण श्री स्वामी चरणी।।१००।।

श्री सदाशिव चरणार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु

## ।। अध्याय दुसरा ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सीतापतये नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री सदाशिवाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

सिध्दी बुध्दी कलांचा ईश्वर। शिव पुत्र तू गणाधीश। करीतो तव चरणी वंदन। द्यावी मती लक्ष्मण सिंधुसुता।।१।। करुनी शिवमूर्ती वा लिंगाची स्थापना। करावी तयाची नित्यपूजा। शिवाची सेवा आणि आराधना। भक्तांस भवसागर तरुन नेई।।२।। करुनी प्रथम शिवास आवाहन। करावे त्याचे षोडशोपचारे पूजन। घालूनी प्रदक्षिणा साष्टांग नमन। करावा शिवनामचा जप।।३।। असती शिव सगुण साकार। तैसेची ते निर्गुण निराकार। म्हणूनी पूजन दोन्ही रुपात। मूर्तीरुपी अन् लिंग स्वरुपात।।४।। सांगती स्वमुखे स्वत:शिव। ब्रह्मभाव माझे निराकार रुप। महेश्वरभाव असे सगुण रुप। असती ही माझी सिध्द रुपे।।५।। करी जो लिंग वा लिंगी पूजन। करीतसे दृढभावे आराधन। होईल तो उपासक मत्स्वरुप। लाभेल त्यास सायुज्यमुक्ती।।६।। ओंकार (ॐ) स्मरण माझेच स्मरण। असे माझा आत्मा हा मंत्र। म्हणती हा एकाक्षरी महामंत्र। करीतसे बोध मत्स्वरुपाचा।।७।।

मंत्र हा विश्व अंतर्बाहय व्यस्त। असे शिव अन् शक्ती बोधक। यातूनच झाला असे निर्माण। ‘ॐ नमः शिवाय’ षडाक्षर मंत्र।।८।। नंतर ऋषी विचारती सुतास। सांगा पार्थिव लिंगपूजन माहात्म्य। म्हणती सूत तेंव्हा ऋषींस। सर्व लिंगात श्रेष्ठ पार्थिव लिंग।।९।। रत्नादि आठ प्रकारच्य मूर्तीत। असे पार्थिव मूर्ती श्रेष्ठ। करीता नित्य पार्थिव लिंगपूजन। होई पुण्य, धन, ऐश्वर्य वृध्दी।।१०।। उत्तम उपचारांनी भावपूर्वक। करीता पार्थिव लिंग पूजन। होतसे तो जीवनमुक्त। याची देही जाई रुद्रलोकी।।११।। करुनी शिवलिंगाचे विधिवत पूजन। करावे त्रिजगन्मयी अष्टमूर्ती पूजन। पृथ्वी, जल, अग्नी, वायू, आकाश। सूर्य, चंद्र यजमान हया अष्टमूर्ती।।१२।। शर्व, भव, रुद्र, उग्र भीम। पशुपती, महादेव अन् ईश्वर। ह्या अष्टही असती शिवमूर्ती। करावे यांचेही भक्तिने पूजन।।१३।। ईशान, नंदी, चंड, महाकाल, वृष। भृंगी, कपर्दीश्वर, सोम, शुक्र। असे हा शिवाजींचा परीवार। चंदन, अक्षता, बिल्वपत्राने पूजावे यांसी।।१४।। असती पाच प्रकारची लिंगे भूवर। स्वयंभू लिंग, बिंदु लिंग, प्रतिष्ठीत लिंग। चरलिंग आणि गुरुलिं नाम। असती ती फल सिध्दिदायक।।१५।। जमीन भेदून नादरुपात व्यक्त। होती स्वतः शिवजी प्रकट। म्हणती त्यासी ‘स्वयंभू लिंग’। त्याच्या पूजने ज्ञानवृध्दि होई।।१६।। शुध्द प्रणव असे मंत्र लिंग। सोने अथवा चांदीच्या पत्र्यावर। अथवा भूमीवर वा वेदीवर। रेखाटावे ते

हाताने।।१७।। करुनी प्राणप्रतिष्ठा त्यावर। करावे भावे शिवास आवाहन। म्हणती यासच ' बिंदु लिंग। करवे षोडशोपचारे पूजन त्याचे।।१८।। करावे भावोत्कट मनसा होऊन। कल्पावे यातच प्रत्यक्ष शिवरुप। करीता भक्तिभावे त्याचे पूजन। साधकास ऐश्वर्य लाभ होई।।१९।। देवता अन् ऋषी आत्मसिध्दिस्तव। करुनी वैदिक मंत्राचे उच्चारण। स्थापन करती जे उत्तम शिवलिंग। त्यास 'पौरुष' वा ' प्रतिष्ठीत' लिंग मानती।।२०।। राजा अथवा श्रेष्ठ ब्राह्मण। करविती शिल्पकाराकडून लिंग। करीता प्राणप्रतिष्ठ विधिवत। 'प्राकृत प्रतिष्ठीत लिंग' त्यास मानती।।२१।। विद्वान पर्वतास म्हणती पौरुषलिंग। आणि पृथ्वीस प्राकृतलिंग। मानती वृक्ष हे पौरुषलिंग। तर वेलीस म्हणती प्राकृतलिंग।।२२।। पौरुषलिंग पूजनाने लाभे। अणिमादि सिध्दी आणि ऐश्वर्य। होई प्राप्त प्राकृत लिंग पूजने। स्त्रीधन आणि विषयादि सुख।।२३।। कटिभाग, हृदय, मस्तकस्थानी। शिव प्रत्यक्षरुपे विराजती। ऐसे कल्पित अध्यात्मिक लिंगासी। 'चरलिंग' ऐसी संज्ञा असे।।२४।। चरलिंगात श्रेष्ठ असे 'रसलिंग'। करी ब्राह्मणास अभीष्ट प्रदान। तैसेची शुभकारक असे 'बाणलिंग'। क्षत्रियांस राज्यप्राप्ती होतसे।।२५।। असे आणिक 'सुवर्णलिंग'। देई वैश्यास कुबेरासम ऐश्वर्य। शुद्रासाठी असे 'सुंदर लिंग'। होई प्राप्त तया आंतर्बाहया शुध्दी।।२६।। गुरुच्या आज्ञेने स्थापून लिंग। करीता

षोडशोपचारे त्याचे पूजन। म्हणती तया तेंव्हा ‘गुरुलिंग’। नैवेद्य अर्पण करावा त्यासी।।२७।। गुरुच असती प्रत्यक्ष शिवरुप। शुश्रूषारुपे करावे पूजन। करावे गुरु आज्ञेचे पालन। गुरु करी जीवस बंधनमुक्त।।२८।। शिवपूजनात बेलाचे असे महत्त्व। बिल्ववक्षृ प्रत्यक्ष महादेव रुप। असे त्याचे महत्त्व शब्दातीत। सकल पुण्यतीर्थे बिल्वमूळासी।।२९।। करीता बिल्ववृक्ष मूळाचे सिंचन। होई प्राप्त तीर्थस्नान पुण्य। गंधपुष्पे करीता तयाचे पूजन। संतती आणि सौख्य होई प्राप्त।।३०।। भस्माचे महत्त्व असे शिवपूजेत। असती भस्माचे दोन प्रकार। महाभस्म आणि स्वल्पभस्म। भस्म सर्वप्रकारे मंगलकारक।।३१।। महाभस्माचे असती तीन प्रकार। श्रौत,स्मार्त, आणि लैकिक। श्रौत व स्मार्त भस्म ब्राह्मणास। लैकिक भस्म इतरजनांस्तव असे।।३२।। करावा सर्वांनी भस्म त्रिपुंड्र। धारण आपुल्या मस्तकावर। प्राप्त होतसे तया दीर्घायुष्य। तैसे आरोग्य अन् सुखलाभ होई।।३३।। तैसेची थोर रुद्राक्ष माहात्म्य। असे तो शिवास अतिप्रिय। रुद्राक्ष दर्शने वा स्पर्श केल्याने। होती सर्वही पापे नष्ट।।३४।। लीलावश श्री शिवाचे अश्रुतून। जाहला रुद्राक्ष वृक्ष निर्माण। विष्णुभक्तांस आणि सर्व जनांस। दिली शिवाने वृक्षाची रुद्राक्षे।।३५।। मल्य पर्वतावर अन् कशी क्षेत्रात। तैसेची अयोध्यादि पवित्र। अशा सर्व पवित्र पावन क्षेत्रांत। केले शिवाने रुद्राक्षवृक्ष निर्माण।।३६।। असती रुद्राक्षे लाल

पांढरी। पिवळी व काळी ऐशा रंगाची। शिव पार्वतीच्या प्रसन्नतेसाठी। करावे रुदाक्षांचे धारण जनांनी।।३७।। रुद्राक्ष आवळया एवढे मोठे। श्रेष्ठ मानिले जाते ते। मध्यम बोरा एवढे चण्या एवढे। कनिष्ठ मानले जाते रुद्राक्ष।।३८।। आवळया एवढे करी अरीष्ट नाश। बोरा एवढे देई उत्तम फलसुख। चण्याच्या आकाराचे करी इष्टकाम पूर्ण। लहान रुद्राक्ष विशेष फलदायी।।३९।। असे रुद्राक्ष क्लेश व पापनाशक। तैसेची ते सौभाग्स वृध्दिकारक। देतसे रुद्राक्ष अभीष्ट फल। म्हणूनी करावे ते धारण।।४०।। एकमुखी असे साक्षात शिवरुप। करी ब्रह्महत्यादि पापे नष्ट। दोन मुखीस म्हणती देवदेवेश्वर। इष्टकामना पूर्तीकारक असे।।४१।। तीनमुखी रुद्राक्ष देई साधना फल। तत्प्रसादे होतसे सर्व विद्या निपुण। चतुर्मुखी रुद्राक्ष ब्रह्मस्वरुप। देतसे ते चतुर्विध पुरुषार्थ।।४२।। पंचमुखी कालाग्नी रुद्र स्वरुप। इच्छित फल, मुक्ती देई ते। सहामुखी कार्तिकेयाचे स्वरुप। करी ब्रह्महत्यादि पापमुक्त।।४३।। सप्तमुखी असे अनंग स्वरुप। करीतसे मनुष्यास धनवान। अष्टमुखी असे भैरव स्वरुप। देत असे मनुष्या पूर्णायुष्य।।४४।। नऊमुखी असे कपिलमुनी स्वरुप। होतसे तो मनुष्य सर्वेश्वर। दशमुखी असे साक्षात विष्णुरुप। करीतसे सकल इच्छापूर्ती।।४५।। अकरामुखी रुद्राक्ष असे रुद्ररुप। देतसे विजय प्राप्ती सर्वत्र। बारा मुखी रुद्राक्ष बारा आदित्यांसम। होतसे धारण कर्ता तेजस्वी।।४६।।

तेरा मुखी रुद्राक्ष विश्वदेव स्वरुप। होई अभीष्ट पूर्ती करता धारण। चौदामुखी असे परम शिवस्वरुप। करीता धारण होई सर्व पाप नाश।।४७।। ही सारी रुद्राक्षे मंत्रोच्चारे। स्वअंगावर करावी धारण। करावा श्रध्दापूर्वक मंत्रोच्चार। होईल तेणे मनोरथ सिध्दी।।४८।। रुद्राक्षमाळ जो करीतसे धारण। ऐशा त्या मनुष्यास पाहून। भूत, प्रेत, पिशाच्चादिक। डाकिनी शाकिनीही जाती पळून।।४९।। करीतेस जो रुद्राक्षमाळ धारण। न होई त्याच्यावर जारणमारण। उच्चाटनादि आभिचारिक प्रयोग। होती सर्व तयापुढे निष्प्रभ।।५०।। ऐसे हे रुद्राक्ष प्रभावयुक्त। करावे धारण देहावर नित्य। करुन धारण भस्म आणि रुद्राक्ष। करावे बिल्वपत्रे शिवाचे पूजन।।५१।। नारदाने विचारीले ब्रह्मदेवास। असून योगी विरक्त शिव। कैसा केला विवाहाचा विचार। केला कैसा त्यांनी सतीशी विवाह।।५२।। ब्रह्मदेव म्हणती तेंव्हा तयास। देवी सती अन् शिव कथा शुभ। सांगतो त्यांच्या विवाहाचे कारण। असे फार शुभकारक ही कथा।।५३।। माझी कन्या सध्येस पाहून। जाहलो मी कामपिडित। शिवांनी माझा धिक्कार करुन। दिले पितृधर्माचे स्मरण।।५४।। जाहला मनी शिवद्वेष उत्पन्न। करण्या विचलित तयाचे मन। त्याला मोहीत करण्याचा प्रयत्न। केला मम पुत्र कामदेवा कडून।।५५।। झाले सर्व उपाय निष्फल। केले मग श्रीविष्णूचे ध्यान। त्यांनी समजाविले तेंव्हा मज। दिधला सोडून मी

शिवद्वेष।।५६।। केली मी शक्तीची आराधना। दक्षाने केली भगवती आराधना। झाली प्रसन्न ती आम्हा। दिले तिने आम्हास वरदान।।५७।। देवी वर प्राप्ती झाल्यावर। दक्ष करी मानसिक सृष्टी सृजन। परी संख्या न होई वर्धमान। आला तो मजसी शरण।।५८।। सांगितले मग मी तयास। पंचजन कन्या अक्सिनी सह। करुनी विवाह करी अंगसंग। करावी मैथुनातून प्रजा उत्पन्न।।५९।। दक्ष अन् अक्सिनी झाला विवाह। केली अंगसंगातून प्रजा उत्पन्न। झाले एक सहस्र हर्यश्व नाम पुत्र। होते ते धर्माचरणी, पितृभक्त।।६०।। दक्षांनी सांगितले आपल्या पुत्रांस। करावी प्रजेची वृध्दी आपण। त्या कारणास्तव तप करण्यास। जावे नारायण सरोवर क्षेत्री।।६१।। नारदा तू जाऊनी केला उपदेश। सांगितला तयांसी निवृत्तिमार्ग। उपदेशाने झाले मत परिवर्तन। गेले ते निवृत्ती मार्ग धरोनी।।६२।। नंतर केले सहस्र शबलाश्व नामपुत्र। गेले तपास्तव ते नारायण सरोवरास। ईश्वरीलीलेने तेथे तू गेलास। केले तयांसही तू परावृत्त।।६३।। दक्ष जाहला तुजवरी संतप्त। तेंव्हाच तू तेथे गेलास। केले तयाने तुजसी शापित। 'राहशील तू फिरत त्रैलौक्यात'।।६४।। ईश्वरी इच्छा ऐसे मानून। केलास मोदे तू शापाचा स्वीकार। उत्पन्न न झाला विकार चित्तात। म्हणूनीच तूझा सन्मान होई सर्वत्र।।६५।। केल्या दक्षाने साठ कन्या उत्पन्न। दहा कन्या दिधल्या धर्मास। तेरा कश्यपास सत्तावीस चंद्रास। दोन

दिल्या बटुपुत्र भूमास।।६६।। दोन दिल्या अंगिरसास। दिल्या दोन कुशाश्वास। चार कन्या अरिष्ट नेमीस। त्यांच्या प्रजांनी त्रैलोक्य व्यापिले।।६७।। ऐसे पुत्र, कन्या करुन उत्पन्न। केले दक्षाने जगदंबेचे ध्यान। केले तयांनी जगदंबेचे पूजन। जाहली प्रसन्न जगदंबा।।६८।। जाहली अक्सिनी गर्भवती। मोदे झाली प्रसन्न चित्त ती। दक्षाने केले पुंसवनादि संस्कारासी। केला दक्षाने पुष्कळ दानधर्म।।६९।। नऊ मासानंतर दहावे मासी। माते सन्मुख शिवा प्रकट झाली। प्रसन्न झाला दक्ष पाहून तिजसी। जाहली आकाशातून पुष्पवृष्टी।।७०।। जाहल्या शांत सर्व दिशा। जमल्या आकाशात सूर्यदेवता। दक्षाने शिवेस केला नमस्कार। गाईले त्याने स्तुतीस्तोत्र।।७१।। जाहली भगवती अतिप्रसन्न। म्हणे त्यास करते वरदान पूर्ण। केले तिने शिशुरुप धारण। सुरु केले सहज बाल रोदन।।७२।। अक्सिनीच्या दासी आल्या धावत। कन्येचे रुप पाहून झाल्या हर्षित। जाहला नगरात मोठा उत्सव। जाहले सर्वत्र आनंदमय वातावरण।।७३।। दक्षाने विधीपूर्वक केले कुलाचार। केला साजरा मोठा जन्मोत्सव। ऋषी, मुनी, देवतांनी घेतला भाग। श्रीहरी आज्ञे ठेवले 'उमा'नाम।।७४।। दक्ष व अक्सिनीने केले प्रेमे पालन। वाढू लागली ती शुक्लचंद्रासम। खेळतसे प्रेमे उमा सख्यांसह। सदैव करी ती शिवस्मरण।।७५।। एकदा आपण गेलो दक्षाचे घरी। पित्याचे अंकी बैसली होती सती। सौदर्य संपन्न

उमा होती। केले नमन दक्षाने मजसी।।७६।। पाहून उमेने केले मज वंदन। दिले मी तिज आर्शीवचन। भगवान शिव तव कामना करती। महादेवच होतील तुझे पती।।७७।। नंतर परतलो आपण स्वस्थानी। जाहला दक्ष हर्षित मानसी। तिचे विवाहाचा विचार मनी। समजून मातेशी वदली सती।।७८।। होतील शिवच माझे पती। मागितली आज्ञा तिने तपासाठी। मिळता मातेची त्यास अनुमती। दृढ आराधना केली सुरु।।७९।। सुरु केले तिने नंदाव्रत पालन। करी ती ऋतुजन्य फळे, फुले अर्पण। अतिशय नियमित आहार घेऊन। सतत शिवजप ती करीतसे।।८०।। ऐसे नंदाव्रताचे करुन पालन। निष्ठेने त्याचे पारणे करुन। करु लागली ती शिवजींचे ध्यान। हृदयी सतत शिवांचेच स्मरण।।८१।। मी, विष्णू गेलो तप पाहण्यासी। जाहलो आम्ही चकित मानसी। तपः साधना पाहून तियेची। नंतर कैलासपर्वती। आम्ही आलो।।८२।। सर्वांनी करुनी शिवास नमन। केले आम्ही त्याचे स्तवन। म्हटले शिवजी तुम्ही सामर्थ्यवान। सत्त्व, रज, तम गुणांचे स्वामी।।८३।। वेदत्रयी आणि लोकत्रयी आपण। असा तुम्ही शरणागतांचे पालक। भक्त वत्सल, साधुजन रक्षक। नमन आमुचे तुमचे चरणी।।८४।। ऐशी स्तुती शिवाची करुन। राहीले उभे मस्तक झुकवून। आम्ही केलेले स्तवन ऐकून। झाले सदाशिव प्रसन्न।।८५।। करुनी आमच्याशी वार्तालाप। पूसीले आम्हास येण्याचे कारण। मागणे मागण्या आलो

सर्वजण। करतो आपण सृष्टी नियमन।।८६।। परमात्मा महेश्वर असती स्वतंत्र। सृष्टीलीला हाच असे छंद। आपणा तिद्यांच्या रुपे झाले उत्पन्न। तुम्ही असा त्याचेच रुप।।८७।। कारण वश झालो आम्ही सपत्निक। तुम्हीही सुंदर स्त्रीशी करा विवाह। व्हावे तुम्हीही सपत्निक। करण्यास आपुले नेमस्त कार्य।।८८।। ऐकून शिवाजी म्हणाले आम्हास। विवाहाविषयी नसे मी आसक्त। 'तुमचे वचन मानणे' माझे व्रत। त्यास्तव मी करीन विवाह।।८९।। शोधा तुम्हीच स्त्री मज योग्य। करील जी माझे आज्ञापालन। करी तो मी ज्योतिरुप शिवाचे पूजन। त्यात बाधा न आणावी तिने।।९०।। ऐकून रुद्रवचन झालो हर्षित। म्हणालो तेंव्हा आम्ही शिवास। भगवती शिवाच झाली अवतीर्ण। दक्षकन्या 'उमा' नाम तियेचे।।९१।। करी ती तप तव प्राप्ति कारण। व्हावे तुम्हीच तिजवर प्रसन्न। द्यावे तिजसी तुम्ही वरदान। करावा तियेचा तुम्ही स्वीकार।।९२।। आमची ऐसी प्रार्थना ऐकून। झाले सदाशिव अति प्रसन्न। केला शिवाने प्रस्ताव मान्य। झालो आम्ही उभय आनंदित।।९३।। सती दक्षगृही करीत होती तप। तेंव्हा आश्विनी शुध्द अष्टमीस। झाले सन्मुख शिव प्रकट। लावण्याने त्याच्या झाली सती मोहीत।।९४।। म्हणाले शिवजी मग तिज। झालो असे मी तुजवर प्रसन्न। घ्यावे मागून इच्छित वरदान। करीन पूर्ण ते निश्चित।।९५।। लाजून सती राहीली मूक। जाणून शिवजी

म्हणाले तियेस। ''देवी, तू माझी पत्नी व्हावेस'' । आनंदे रोमांचित झाली सती।।९६।। सती म्हणाली मग महादेवास। करावी बोलणी मम पित्यासह। विवाह विधीने करावसा स्वीकार। शिवजी 'तथास्तु' म्हणाले तेंव्हा।।९७।। परतले नंतर शिव स्वस्थानी। माते समीप आली सती। विरह व्यथेने अस्वस्थ शिवजी। त्यांचे कडे गेलो मी अन् सरस्वती।।९८।। सांगितले मज जा दक्षापाशी। माझ्यावतीने करावी बोलणी। सांगा विवाह प्रस्ताव त्यासी। सांगा द्यावी कन्या रुद्रासी।।९९।। सांगितल मी त्यास दक्षविचार। ऐकून शिव जाहले प्रसन्न। स्वामीकृपे वर्णित विवाह महोत्सव। शरणागत मी त्यांचे चरणी।।१००।।

श्री सदाशिव चरणार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु।

## ।।अध्याय तिसरा।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री सदाशिवाय नमः । श्री ग्रामदेवताय नमः।

स्वामी समर्थ माझे त्राता। ठेवितां तुमचे चरणी माथा। करीतो वर्णन शिव विवाह कथा। असावा वरदहस्त शिरसी।।१।। ब्रह्मदेव वदले सदाशिवासी। पूर्वीच बोललो मी दक्षासी। कन्या सती द्यावी तुम्हासी। ऐसाच विचार त्यांचे मनी।।२।। होता प्राप्त शिवाकडून वरदान। आली सती स्वमाते समीप। सांगितले जाहले शिव प्रसन्न। ऐकून माता झाली हर्षित।।३।। धरीले तिने सतीस हृदयाशी। प्रेमे चुंबिले तिचे मस्तकासी। आनंदे अक्सिनी सांगे दक्षासी। केला दक्षाने मोठा उत्सव।।४।। घेऊनी मग शिवाचा निरोप। मी अन् सरस्वती गेलो दक्षगृहास। पाहुनी आम्हा झाले आनंदित। करोनी सत्कार पूसीले कारण।।५।। सांगितले मग मी दक्षास। आलो आम्ही तुमचेच कार्यास। शिवांनी दिले वरदान सतीस। त्याच्या पूर्ततेचा आला समय।।६।। आलो अनुसरुन शिवाज्ञेस। घालण्या मागणी तव कन्येस। असती महादेव झाले विरहदग्ध। जाहले अस्वस्थ त्यांचे मन।।७।। झाले न वश शिव

कामदेवास। न झाले वश त्याचे पंचबाणांस। परी जिंकीले सतीने महादेवास। जाहली तियेची तपश्चर्या सफल।।८।। केले तप सतीने शिवास्तव। आता शिव करती सतीस्तव। सतीस आता शिवास अर्पून। करावे मोदे कन्यादान तुम्ही।।९।। ऐकून झाला दक्ष आनंदित। म्हणे असे मज वचन मान्य। म्हणालो मी करी तयारी सर्व। येतो घेऊन आम्ही शिवास।।१०।। प्रसन्न मुद्रे गेलो शिवापाशी। ऐकून झाले आनंदी मानसी। म्हटले आम्ही तेंव्हा तयासी। दक्ष म्हणे यावे सुमुहूर्ती विवाहास्तव।।११।। आनंदे रुद्र म्हणाले आम्हासी। घ्यावे बोलावून नारदासी। यावे माझ्या मानसपुत्रसह कैलासी। तैसेची विष्णुही आलेस सलक्ष्मी।।१२।। आले वऱ्हाडी कैलासनगावर। चैत्र शुध्द त्रयोदशी झाली निश्चित। रविवारी फाल्गुन नक्षत्रावर। सर्वांसह केले शिवानी प्रस्थान।।१३।। सर्व मंडळी निघालो नटुन थटुन। देव, देवता, ऋषी, मुनींना घेऊन। सर्व मंडळींसह होते शिव शोभत। होता तो मोठा आनंदी उत्सव।।१४।। मार्गावर सर्वत्र ओसंडे उल्हास। गेले वाद्यांनी गगन दुमदुमुन। होता सर्व वऱ्हाडाचे आमगन। कन्येकडे आले आनंदास उधाण।।१५।। आला दक्ष सामोरा तयांस। केला सर्वांचा सत्कार यथोचित। घातली प्रदक्षिणा वऱ्हाडास। आला घेऊन सर्वा स्वत:चे घरी।।१६।। दिले रुद्रास उत्तम आसन। दिले देवता ऋषींस योग्य स्थान। विचार विमर्श मरिच्या दिंशी करुन। म्हणाला दक्ष मग मजसी।।१७।। करुनी

मान्य मी केली विवाह विधी सुरुवात। पाहुनी शुभलग्न शुभमुहुर्त। करविले दक्षहस्ते सतीचे कन्यादान। शिवांनी विधीपूर्वक केले पाणिग्रहण।।१८।। केले मी अन् विष्णुने शिवस्तवन। केला दक्षाने मोठा समारंभ। जाहले नृत्यगायनादि कार्यक्रम। झाला विवाह थाटात संपन्न।।१९।। श्री हरींनी केली रुद्रास विनंती। दाक्षयणीमुळे शोभा आली। आता प्रार्थितो मी तुम्हासी। करावे जगाचे मंगल व रक्षण।।२०।। सतीसह रुद्र आले कैलासी। वदले ते वीरगण आणि नंदीसी। आता तुम्ही जावे अन्यस्थानासी। स्मरण मी करता यावे परत।।२१।। आता तेथे होते रुद्र व सती। सती मनी आनंदित होती। शिव धन्य स्वतःस मानती। होते मोहीत सती सौंदयाने।।२२।। केले रुद्राने कामदेवाचे स्मरण। तेणे आले वृक्षवेली डवरुन। परस्परांची काळजी घेत। करती शिवसती सर्वत्र विहार।।२३।। झाले होते रुद्र सतीत रमामाण। घालविली ऐसी वर्षे पंचवीस। आता विचार सतीच्या मनात। राहीली उभी ती शिवासमोर।।२४।। झाले शिव मनी आश्चर्यचकित। पूसती सतीस त्याचे कारण। कोणते विचारचक्र असे मनात। सांगावे निःसंकोचपणे मजसी।।२५।। म्हणाली सती तेंव्हा शिवास। आता सुरु असे पर्जन्यकाळ। सळसळती वृक्ष वेगे पळती मेघ। भयदायक असे सर्वत्र वातावरण।।२६।। वाहे यमुना दुथडी भरुन। मध्येच आकाशी विजेचे नर्तन। पाहुनी भीती वाटते मनात। वाटते असावे आपुले

निलय।।२७।। विषम अशा या पर्जन्यकाळात। चातकमोरादि करती गृह। कैसे रहावे गृहाविना आपण। करावा मनी आपणच विचार।।२८।। ऐकून ऐसी सतीची विनंती। आले शिवास हास्यअती। तव मर्जीस्तव ऐशा स्थानी। करीन निर्माण गृह मी।।२९।। सांगितले जेथे न येतील मेघ। राहतील फिरत शिखराखालून। असती ऐसे गगन चुंबी पर्वत। एक हिमालय दुजा मेरु पर्वत।।३०।। केले शिवाने पर्वतांचे वर्णन। ऐकून सती जाहली प्रसन्न। म्हण मज आवडला हिमालय नग। करावे तेथेची गृह निर्माण।।३१।। हिमालय शिखरी नेऊन सतीस। केले तेथे रम्य निवासस्थान। सतीसह उद्यानी करती विहार। केले दहा हजार वर्षे वास्तव्य।।३२।। रुद्रासह करुनी प्रदीर्घ विहार। जाहली सती कामविरक्त। म्हणाली सती तेंव्हा सदाशिवास। जाहले तृप्तकाम तव सहवासात।।३३।। झाले मी आता सुखातून निवृत्त। वाटते जाणावे मी परमतत्त्व। ज्यायोगे सुखदुःखापासून उध्दार। लाभे जीवास निरतिशय सुख।।३४।। ऐकून सतीचे ऐसे वचन। शिव म्हणाले तेंव्हा तियेस। लोक कल्याणास्तव केलास प्रश्न। ऐकूनी मी जाहलो प्रसन्न।।३५।। मग शिव म्हणाले सतीस। असे विज्ञान हेच परम तत्त्व। ब्रह्मविषयक ज्ञान हेच विज्ञान। होता न राही मनी कसलेच स्मरण।।३६।। होई तेंव्हा मन संग रहीत। होई व्यक्तीचा आवर्तव्यूह नष्ट। म्हणती यासची परब्रह्म ज्ञान। असे हेची मुक्तीचे स्वरुप।।३७।।

परी ब्रह्मविषयक ज्ञान असे दुर्लभ। प्राप्त होता होई मन बुध्दी शुध्द। होतो तो जीव शिवस्वरुप। विज्ञानाची जननी असे भक्ती।।३८।। शिवाने वर्णन केले भक्तिस्वरुप। असती भक्तीचे नवविध प्रकार। श्रवण, कीर्तन, स्मरण, सेवन। दास्य, वंदन, सख्य, आत्मनिवेदन।।३९।। या सर्व प्रकारची भक्ती श्रेष्ठ। असे मजसी ती अतिशय प्रिय। असे ती भोग, मोक्षदायक। असे भक्ती मुक्तीची स्वामिनी।।४०।। ऐकूनी सती झाली बहु प्रसन्न। भक्तिभावे केले शिवास वंदन। म्हणाली जाणू इच्छिते यंत्र, मंत्र। शास्त्र, धर्म आणि त्याचे महत्त्व।।४१।। झाला शिव मुदीत ते ऐकून। सांगितले सतीस सर्व वर्णन करुन। भक्तिमाहात्म्य कथा तिज सांगून। करीत होते सुख संवादात विहार।।४२।। एकदा उभय झाले वृषभावर आरुढ। आले शिवसती भूलोकावर। आले ते उभय दंडकारण्यात। होते परिसर शोभा पाहात।।४३।। दिसले त्यांना राम आणि लक्ष्मण। घेत होते ते सीतेचा शोध। पाहून रामास शिवाने केले वंदन। जयजयकार करुन निघाले पुढे।।४४।। सती मग म्हणाली शिवास। तुम्हीच सर्वांचे श्रेष्ठ ईश्वर। असे तुमचे माहात्म्य अगाध। विधी, विष्णू आदि करती सेवा।।४५।। करती ज्याचे सर्व पूजन स्मरण। ऐसे तुम्ही स्वामी एकमेव। सांगा हे दोन धनुर्धर कोण। का केले तुम्ही तयांसी वंदन।।४६।। म्हणाले मग शिव तियेस। ते उभय असती दशरथ पुत्र। असती उभय

महापराक्रमी पुत्र। गौरवर्णाचा लक्ष्मण असे शेषावतार।।४७।। त्याचा जेष्ठ बंधु नीलवर्ण। असे तो राम विष्णूचा अवतार। करण्या साधुरक्षण आणि लोक कल्याण। घेतला असे त्यांनी अवतार।।४८।। ऐकून सतीचे न झाले समाधान। शिव सतीस म्हणाले मग। नसे तुझा मम वचनी विश्वास। घ्यावी तूच रामचंद्राची परीक्षा।।४९।। शंकराची आज्ञा मिळाली तियेस। कैसी घ्यावी परीक्षा ती करी चिंतन। घेतले सीतेचे रूप विचार करुन। गेली सीता स्वरुपात रामा समोर।।५०।। होता शिवनामात राम दंग। पाहूनी तियेसी म्हणाला हसून। ''सती, असो तव चरणी वंदन। कोठे आहेत शंकर या वेळेस?।।५१।। आणि वनात का एकटी आलीस?। का सोडीले तू स्वस्वरुपास। हे रुप धरण्याचे काय कारण?। कृपया सांगावे मजसी ते।।५२।। ऐकून सती जाहली लज्जित। म्हणे श्रीराम असती विष्णु प्रत्यक्ष। करुनी मग शिवचरणाचे स्मरण। म्हणाली तेंव्हा ती श्रीरामास।।५३।। मी अन् शिव करीत होतो भ्रमण। सीताशोधार्थ हिंडणाऱ्या तुज पाहून। मुदित स्वामींनी केले तुज वंदन। पूसीले त्याचे कारण मी तयांस।।५४।। उत्तर ऐकून न झाले समाधान। त्यांच्या आज्ञे आले घेण्या परीक्षेस। परी आता जाणले तुझे प्रभुत्व। असशी तू विष्णू साक्षात।।५५।। पर शिव असती देवाधिदेव। करती सकल तयांसी वंदन। ऐसे असून तयांस वंदनीय। कैसा झालास ते सांग मज।।५६।। ऐकूनी रामास

झाला आनंद। केले मनोमनी त्याने शिवाचे स्मरण। आले उचंबळोन ह्दयात प्रेम। भक्तिभावे वर्णु लागला शिवमहीमा।।५७।। एकदा प्राचीन काळी शिवाने। विश्वकर्म्यास स्वलोकी बोलाविले। त्याच्या कडून बनवून घेतले। एक गोशाळा, महाल आणि सिंहासन।।५८।। गणपतीस्तव एक छत्र बनविले। देव सिध्द गणांसी बोलाविले। संगीत तज्ञ, गायनाचार्य बोलविले। आणविली मृदुंग वीणादि मंगल वाद्ये।।५९।। जाहला सुरु मोठा उत्सव। दुमदुम लागली सारी वाद्य। केली तयारी राज्याभिषेकास्तव। होऊ लागले उच्चे मंत्र घोष।।६०।। होते शिव हरी भक्तीने प्रसन्न। बोलाविले श्रीहरींना वैकुंठातून। सुमुहुर्ती त्यांना सिंहासनी बैसवूनी। केले विभूषित आभूषणांनी।।६१।। ठेविला त्यांचे मस्तकी मुकुट। केले श्रीहरींचे अपार कौतुक। केला स्वहस्ते तयांस राज्याभिषेक। केली मुक्तकंठे श्रीहरींची स्तुती।।६२।। नंतर शिवजी म्हणाले सर्वांस। आजपासून श्रीहरी मज वंदनीय। करावे सर्वांनी श्रीहरींसी वंदन। वेदही करती त्यांचे यश गुणगान।।६३।। म्हणाले शिवजी तेंव्हा श्रीहरीस। कर्ता - भर्ता - हर्ता सारे तुम्हीच। चतुर्विध पुरुषार्थांचे अधिष्ठान। जगत्पूज्य, बलीष्ठ, पराक्रमी व्हाल।।६४।। असाल युध्दात तुम्ही अजिंक्य। कराल अधर्मास तुम्ही शासन। नानाविध लीला तुम्ही कराल। प्रताप तुमचा त्रिलोकी गाजेल।।६५।। आता मायाही तुम्हा स्वाधीन। तिचेच पटल झाकतसे चिद्रुप। तुम्हीच ब्रह्मदेव

पिता आणि रक्षक। रुद्र अन् ब्रह्मदेवांस असाल पूज्य।।६६।। करावे येथूनच विश्वाचे पालन। होईल ‘गोलोक’ नामे प्रसिध्द स्थान। करण्या धर्माचे स्थापन सज्जन पालन। होतील तुमचे विविध अवतार।।६७।। पृथ्वीवरील तुमचे प्रत्येक अवतार। ते सर्व माझी भक्ती करतील। मी ही त्यांचे दर्शन घेईन। ऐसे म्हणून शिव गेले कैलासास।।६८।। झाले श्रीहरी ‘गोलोक’ अधिपती। केला गोपवेष धारण हरींनी। राहती सह गोप - गोपी - गायी। कालपरत्वे ते अवतार घेती।।६९।। आता धारण केला चतुर्विध अवतार। राम, लक्ष्मण, भरत, अन् शत्रुघ्न। पितृ आज्ञे आलो असे वनात। रावणाने केले सीतेचे हरण।।७०।। सीतेचाच घेत आहोत शोध। मी अन् लक्ष्मण या वनात। फिरत आहोत आम्ही सर्वत्र। अनायसे घडले तुमचे दर्शन।।७१।। करुनी मग सतीस नमस्कार। गेला श्रीराम निघून वनात। समजले सतीस तो विष्णु अवतार। केली तिने मनात प्रशंसा।।७२।। परतली सती होऊन निस्तेज। अंतर्ज्ञाने शिवाने जाणले सर्व। राहीली सती मग मौन। झाले विषण्ण शिवाचे मन।।७३।। आठवले शिवास विष्णुवचन। आठवले त्यास स्वप्रतिज्ञा वचन। म्हणे माझे बोलणे अव्हेरुन। केला सतीने मोठा अपराध।।७४।। केला मनोमन शिवाने सती त्याग। निघाले कैलासास तिज घेऊन। शिवजी खरोखरी धन्य आपण। जाहली ऐशी आकाशवाणी।।७५।। ऐकली सतीने ती आकाशवाणी।

पूसे शिवास प्रतिज्ञा कोणती। जाणले अंत:करण शिवध्यान करुनी। केला असे त्याग कळले तिजसी।।७६।। जाणले शिवाने सतीचे दु:ख। न दर्शविता निघाले तिज घेऊन। कथा सांगून केले तिचे मनोरंजन। परी प्रतिज्ञा नाही सांगितली।।७७।। आले उभयता कैलासावर। तेथे अपुले श्रेष्ठ आसनावर। जाहले तात्काळ शिव ध्यानमग्न। झाली सती फार व्याकुळ।।७८।। ऐसा बराच काळ गेल्यावर। रुद्र समाधीतून आले भानावर। व्यथित सतीने केला नमस्कार। शिवाने तिज दिले आसन समोर।।७९।। सांगितल्या मनोहर कथा प्रेमाने। सती शोक दूर झाला त्यामुळे। जाहली सुखी ती पूर्वी प्रमाणे । परी शिवाने प्रतिज्ञा सोडली नाही।।८०।। पण या मध्ये नसे नवल काही। शिवसती कथा लीलाच असती। असती सदा एकरुपच शिवसती। लीला करणे हा छंद तयांचा।।८१।। एकदा ऐसेची प्रयाग क्षेत्री। मोठा यज्ञ केला मुनीजनांनी। सनकादि महात्म्ये ऋषी प्रजापती। जाहले होते यज्ञात सहभागी।।८२।। होते ब्रह्मदेव उपस्थित सपत्नी। आले गणांसह भवानी पती। योगायोगाने त्याच समयासी। झाले दक्षप्रजापतीचे आगमन।।८३।। केले होते दक्षास ब्रह्मांडाधिपती। होता स्वाभिमान दक्षाचे मनी। सर्वांनी स्तविले उत्थापन देऊनी। भवानिपतींनी नमस्कारिले नाही।।८४।। जाहले संतप्त दक्ष प्रजापती। गर्वाने म्हणाले उपस्थितांसी। माझे स्वागत केले तुम्ही सर्वांनी। परी हा

दुर्जन शिव बसून राहीला।।८५।। असे हा कुलहीन, कुरुप, जन्महीन। स्मशानवासी। हा असे अपवित्र। करीतो यास यज्ञातून बहिष्कृत। नसे योग्यता ती शिवाची।।८६।। दक्षवचन ऐकून भृगु आदि ऋषी। आणि देवता शिवनिंदा करती। तेणे नंदी झाला संतप्त अती। केली त्याने दक्षाची निर्भत्सना।।८७।। निर्भत्सना ऐकून दक्ष कोपायमान। केले शापित सर्व रुद्र गणांस। म्हणे व्हाल तुम्ही सर्व वेदबाह्य। महर्षी तुमचा त्याग करतील।।८८।। क्रोधाने नंदीने केले सर्व शापित। '' न जाणाल तत्त्वज्ञान होऊनही वेदपारंगत। बसाल करीत व्यर्थ वादविवाद। व्हाल क्रोध, लोभ, मदाने उन्मत्त।।८९।। दक्षा, तू कर्मभ्रष्ट होशील। जीवनातील आनंदच तू गमावशील। शिवनिंदा करणारे मुख नष्ट होईल। येईल तेथे बकऱ्याचे मुख''।।९०।। शिवाने समजावले मग नंदीस। कसा झालास तू संतप्त। अरे, असे ठाऊक तुज शिवतत्त्व। न कोणीही शापू शकेल मज।।९१।। अरे, यज्ञाचे सर्वांग असे मीच। मायेच्या प्रभावे वाटतो भेद। आत्मदृष्टीने पहा हे माझेच रुप। आत्मनिष्ठ राहून हो विकार शून्य।।९२।। झाला नंदी शांत ऐकून उपदेश। गेले निघून शिव स्वस्थानास। परंतु झाला दक्ष बुध्दिभ्रष्ट। लागला करु तो शिवाचा द्वेष।।९३।। केले दक्षाने महायज्ञाचे आयोजन। न धाडले शिवास निमंत्रण। यज्ञाचा वृत्तांत कळला सतीस। म्हणाली शिवास जाऊ या यज्ञास।।९४।। शिव म्हणे नसे निमंत्रण आपणास।

न जावे तेथे हेच योग्य। सती हाऊन संतप्त पित्यावर म्हणे शिवास। तुमच्या विना न होई यज्ञ सफल।।९५।। जाणूनही त्यांनी डावलले तुम्हास। जाऊन घेते मी कारण जाणून। शिव वदती न जावे ऐसे मम मत। परी स्वेच्छेने तू जा तेथे।।९६।। गेली सती यज्ञास नटून थटून। माता भगिनी करती तिचे स्वागत। पित्याने पूर्ण दुर्लक्षिले सतीस। शिवासाठी यज्ञभागही नव्हता तेथे।।९७।। पाहून सती झाली संतप्त। म्हणे न जाणता तुम्ही शिवमाहात्म्य। तुम्ही केलेली ही शिवनिंदा ऐकून। झाले मी स्वत:च अपवित्र।।९८।। आता करीन मी प्रायश्चित। करीन मी माझा देह त्याग। ऐसे म्हणून केले तिने मैन धारण। बसून उत्तराभिमुख केले शिवचिंतन।।९९।। योगाद्वारे करुन अग्नि निर्माण। केला सतीने तेथेच देहत्याग। जाहला कोलाहल सर्व त्रिभुवनांत। करु लागेल सर्व दक्षाची चिंता।।१००।।

श्री सदाशिव चरणार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु

# ।। अध्याय चौथा ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री सदाशिवाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

श्री सदाशिवा आपणास शरण। आहात सर्वांचे आदिकारण। आहात सनातन धर्माधिष्ठान। वेद असती स्थित आपणात।।१।। केला दक्षाने शिवाचा अपमान। केला दक्ष यज्ञात सतीने देहत्याग। माजला साऱ्या त्र्यैलोक्यात हलकल्लोळ। झाले शिवगण अतिसंतप्त।।२।। धावले दक्षावर हाती शस्त्र घेऊन। तेंव्हा भृगुंनी यजुर्मंत्राने आहुती देऊन। केले ऋषभ नाम वीर निर्माण। त्यांनी पळवून लावले गणांसी।।३।। गेले शिवगण सदाशिवासमीप। सांगितला सर्व वृत्तान्त त्यास। जाहले शिवही मग अतिसंतप्त। केला जटेतून वीरभद्र निर्माण।।४।। गेला वीरभद्र दक्ष यज्ञाकडे। सर्वत्र दिसती अशुभ चिन्हे। गेला दक्ष विष्णुस शरण भीतीने। केली विष्णूने दक्षाची कानउघाडणी।।५।। केलीस शिवनिंदा अन् अपमान। होणार याचा परिणाम दारुण। ठाकला वीरभद्र यज्ञ मंडपात। सुदर्शनाचाही प्रभाव न चालेल।।६।। दक्षाने केले आवहन सर्वांस। करावे तुम्हीच माझे रक्षण। म्हणाले बृहस्पती

करुन शिवस्मरण। करती शिव सदा भक्तांचेच रक्षण।।७।। आला तेंव्हा वीरभद्रा यज्ञात। म्हणाला तेंव्हा तो विष्णूस। आलात येथे शिवाज्ञा उल्लंघून। करु पाहता का शंकराशी वैर।।८।। ऐकून श्रीहरी म्हणाले तयांस। असे मीही तुजसम शिवसेवक। परी असे मी भक्तांच्या आधीन। आलो येथे दक्षाचे आर्जव ऐकून।।९।। गेले विष्णू स्वस्थानी निघून। आले ब्रह्मदेवही स्वस्थानास। केले वीरभद्राने शासन सर्वांस। दक्ष बैसला भयाने लपून।।१०।। काढले वीरभद्राने त्यास शोधून। तोडले मस्तक हाताने पिरगळून। दिले दक्षमस्तक यज्ञात फेकून। केला दक्षयज्ञाचा संपूर्ण विनाश।।११।। आला वीरभद्र कैलासास। सांगितली शिवास समग्र हकीकत। ऐकून शिवही जाहले संतुष्ट। केले वीरभद्रास गणाध्याक्ष।।१२।। आले देवऋषी ब्रह्मदेवापाशी। सांगितले निज दुःख करुन स्तुती। पुत्र विरहाने ब्रह्मा झाले दुःखी। किंकर्तव्य विमूढ झाले विधी।।१३।। गेले सारे शरण विष्णुलोकी। सांगितला सारा वृत्तांन्त त्यासी। म्हणाले विष्णू तुम्ही शिव अपराधी। करावे तयाचे क्षमा प्रार्थन।।१४।। आले कैलासावर सकल मिळून। बसले होते शिव कुशासनावर। केले सर्वांनी शिवचरणी नमन। शिवदर्शने जाहले सर्व धन्य।।१५।। ब्रह्मदेव तेंव्हा वदले शिवास। आपण सर्व व्यापी विश्वमूर्ती आहात। संकटापासून तुम्हीच करता रक्षण। लाभो तुमची कृपादृष्टी आम्हास।।१६। आलो आहोत तुम्हास

शरण। अपराधांची आमच्या क्षमा करुन। यजमान दक्षाचा करावा उध्दार। करावा यथासांग यज्ञही पूर्ण।।१७।। केली सर्वांनी शिवास विनंती। हसून शिव वदले तयांसी। घेत नाही अपराध मनात। थोडासा दंड करतो अवश्य।।१८।। करु नये कोणाचाच द्वेष। लागते भोगावे त्याचे फळ। न करावे कुणा त्रासदायक कर्म। इतकेच असे सांगणे माझे।।१९।। केलीत तुम्ही मजसी विनंती। म्हणून तुम्हा क्षमा असे केली। करीन जीवंत मी दक्षालाही। लावून शिर बोकडाचे।।२०।। बैसले नंतर शांत सदाशिव। विष्णु आदींनी दिले निमंत्रण। करुनी मान्य त्यांचे निमंत्रण। आले ते कनखल या यज्ञस्थानी।।२१।। पाहुनी तेथील विध्वंसाचे रुप। पाचारीले शिवांनी वीरभद्रास। म्हणाले कौतुकाने वीरभ्रदास। केलेस तू दंड देण्याचे कार्य।।२२।। आता तू ची येथे यावे घेऊन। दोषपूर्ण कार्यकर्त्या त्या दक्षास। आणिला वीरभद्राने दक्षाचा देह। शिर रहीत देह पाहून शिव पूसती।।२३।। अरे, कोठे असे याचे शर। वीरभद्र म्हणे केले अग्नीत हवन। मग शिवांनी बोकडाचे शिर घेऊन। जोडले ते दक्षाच्या कबंधास।।२४।। पाहती कृपा दृष्टीने शिव त्यास। जाहला प्राणसंचार त्याचे देहात। झोपेतून उठल्यावत उठला दक्ष। पाहून शिवजीस झाला प्रसन्न।।२५।। म्हणे शिवाजी तुम्ही भक्तवत्सल। साधुजनांचे तुम्हीच कल्पवृक्ष। करीता तुम्ही दुष्टांसी शासन। करितो नमन तुमचे चरणी।।२६।। मी

तुमची अवहेलना करुन। यज्ञभाग न देता वदलो अपशब्द। तरीही पतित माझ्यावर करण्या अनुग्रह। उदर अंतःकरणाने आला येथे।।२७।। ब्रह्मदेव तेंव्हा वदले शिवास। तुम्ही शरणागत दुःख निवारक। विसरुन अपमान केला अनुग्रह। असे तुमचा ऋणी मी अपराधी।।२८।। विष्णुही तेंव्हा वदले शिवजीस। असे केला मी महाअपराध। म्हणवितो तुमचा दास स्वतःस। यज्ञरक्षणार्थ केले वीरभद्रासह युध्द।।२९।। केला मी तेंव्हा पक्षपात। करावी क्षमा माझ्या अपराधास। असा तुम्हीच आमुचे मायबाप। कराल मज क्षमा मनी विश्वास।।३०।। नंतर इंद्रादि देवता लोकपाल। सिध्द, ऋषी नागादि सर्व। त्यांनी करुनी रुद्रदेवास प्रणाम। केली रुद्रदेवांची स्तुती सहर्ष।।३१।। तेंव्हा रुद्रदेव म्हणाले दक्षास। असे मी तुझ्यावरही प्रसन्न। तू केवळ कर्ममार्ग अनुसरुन। तरु इच्छित होतास हा भवसागर।।३२।। म्हणूनची केला मी यज्ञविध्वंस। ज्ञानमार्गाचा तू करी आश्रय। घे जाणून मीच जगाचे कारण। विश्वाचे आदीबीज असे मीच।।३३।। मी सनातन, स्वयंभू, स्वयंप्रकाश। सर्वांचा आत्मा आणि ईश्वर मीच। करतो, उत्पत्ती,पालन अन् संहार। शुध्द ज्ञाने जाणून करी कर्म।।३४।। उपस्थित सर्वांनी केला जयकार। केले सर्वांनी शिवगुणगान। शिवनाम घेऊन दक्षाने केला यज्ञारंभ। यज्ञात दिला शिवास हविर्भाग।।३५।। शिवकृपेने झाला यज्ञ संपन्न। निमंत्रित सर्व झाले संतुष्ट। गेले ब्रह्म, विष्णु स्वस्थानास। आले गणांसह

शिव कैलासास।।३६।। केला सतीने यज्ञात स्थूलदेह त्याग। घेतला हिमालय अन् मेनेपोटी जन्म। ही कथाही ब्रह्माने कथिली नारदास। तीच इथे सांगतो संक्षिप्त।।३७।। उत्तरेस हिमालय पर्वत विशाल। असे तो विष्णुरुप तेजस्वी अन् समृध्द। असे त्याचे कडे हिमाचे भांडार। तेणे तो स्वभावे अतिशीतल।।३८।। वाटले एकदा हिमालयाचे मनास। व्हावी धर्मवृध्दी आणि पितरांचे हित। त्यास्तव वाढविण्या आपले कुल। केला त्याने विवाहाचा निश्चय।।३९।। हे ऐकून आपले कल्याण व्हावे म्हणून। गेले दिव्य पितरांकडे सर्वदेव। म्हणाले ऐका आमुचे मनोगत। होण्या देवकार्य सिध्दी आणि अभीष्ट।।४०।। आपली कन्या मेना मंगलाकारक। द्यावी तुम्ही ती हिमालयास। देवांचे म्हणणे करनी मान्य। केले मेनेचे हिमालयाशी लग्न।।४१।। जाहला विवाह सोहळा संपन्न। केले सर्वांनी हिमालयाचे स्तवन। स्वस्थानी सर्व परतले शिवनाम घेत। आला मेनेसह हिमालय आपुले स्थानी।।४२।। विवाह पश्चात होते सती अन् शिव। करीत होते क्रीडा हिमालयावर। तेंव्हा मानुनी कन्या सतीस। करीतस मेना सतीचे कौतुक।।४३।। होते मेनेविषयी प्रेम सतीचे मनात। इकडे मेनाही करीत होती देवी आराधना। यज्ञात सतीने केला स्थूलदेह त्याग। जाहली सती मेनेची कन्या।।४४।। नारद गेले होते हिमालये गृहास। केला हिमालये सत्कार यथोचित। घातले पार्वतीस नारद चरणावर। विचारले तिचे

भाग्य असे कैसे।।४५।। मग पाहून तियेचे हस्त, चरण। म्हणाले असती हिचे ठायी शुभलक्षण। असेल ही अतिशय आनंददायक। परी हिची एक रेषा असे विलक्षण।।४६।। असेल हिचा पती योगी दिगंबर। मातापिता रहीत आणि निष्काम। करील तो अमंगल वेष धारण। ऐकून मेनाहिमालय झाले दु:खित।।४७।। विचारले हिमालयाने नारदास। झालो दु:खी जाणूनी भविष्य। मिळावा हीस चांगला पती म्हणून। सांगावा आम्हास काही उपाय।।४८।। तेंव्हा तया उभयतांसी वदले नारद। नसे यात काही दु:खाचे कारण। असे केवळ शंकर या लक्षणांनी युक्त। त्यामुळे ही कुलक्षणेही असती शुभ।।४९।। असती शंकर अज, अव्यय,निर्विकार। असती ते दर्याद्र भक्तवत्सल। करुनी मनसी शिवतत्त्वाचा विचार। द्यावे पार्वतीस तू सदाशिवास।।५०।। परंतु शिव प्राप्त व्हावे म्हणून। करावी पार्वतीने आराधना भक्तीपूर्वक। तिच्या तपश्चर्येनेच होईल हे कार्य। करतील शिव सर्व इच्छा पूर्ण।।५१।। म्हणाले पुढे नारद हिमालयास। नसे येथे काही चिंतेचे कारण। सती शिवाची पत्नी प्राणप्रिय। पतीचा अपमान न साहला तिज।।५२।। केला यज्ञात तिने स्वदेहत्याग। आता पार्वती झाली तीच। सांगुनी सर्व वृत्तान्त गिरिराजास। नंतर नारद निघाले तेथोनी।।५३।। म्हणाले मग गिरिराज मेनेस। न ठरे अन्यथा नारदवचन। मनातील कुशंका टाकून काढून। व्हावेसी शांत तू

मनी।।५४।। सांगावे हे आता तूच पार्वतीस। करावे तिने शंकराचे आराधन। करीता तिने तपश्चर्येचे आचरण। होईल सर्व शुभ अन् मंगल।।५५।। आली मेना पार्वती समीप। करी विचार कैसे सांगावे हीस। करावी तपश्चर्या शिव प्राप्तीस्तव। असे पार्वतीची तनु सुकुमार।।५६।। तेंव्हाच पार्वती म्हणाली मातेस। पहाटे आज पडले मज स्वप्न। होता आला एक तपस्वी द्विज। त्यांने मज शिवास्तव तप करण्या कथिले।।५७।। म्हणाला मग तो मजसी। मुली तू असशी भाग्याची होशील शंकराची तू पत्नी। त्यासाठी करी शिव आराधना।।५८।। मेनेने हे कथिले हिमालयास। म्हणे तो मज झाल स्वप्न दृष्टान्त। आला शिव आपुल्या नगराजवळ। नारद वर्णना प्रमाणे होता दिसत।।५९।। पार्वतीसह मी गेलो त्याचे पाशी। सांगितले तेंव्हा मी त्यासी। ठेवून घ्यावे पार्वतीस सेवेसी। त्याने स्वीकार केला नाही।।६०।। केला मी त्याच्यासवे वादविवाद। केले त्याने मान्य माझे वचन। त्याचे प्राप्तीची इच्छा धरुन। पार्वती सेवा करु लागली।।६१।। झाले आनंदी हे स्वप्न पाहून। पाहतो कधी होणार स्वप्न पूर्ण। हिमालयाचे स्वप्नवृत्त ऐकून। मेनेसही खूप हर्ष जाहला।।६२।। झाली पार्वती आठ वर्षांची। वृत्त ऐकून हर्षित झाले शिवजी। गेले ते गढून तिच्या आठवणी। विरह वेदने झाले मन कातर।।६३।। ठरविले त्यांनी करावी तपश्चर्या। गणांसह आले शिखरी गिरिराजाच्या। आले शिव गंगावतरण स्थाना।

करु लागले परमात्म्याचे चिंतन।।६४।। शिखरी शिवाचे आगमन झाले। ऐकून हिमालय आले शिवाकडे। करुनी शिवास नमन आदराने। केली त्याने शिवाची स्तुती।।६५।। त्रिभुवन पालक आपण महादेव। स्वरुप तुमचे सगुण - निर्गुण। भक्तवत्सल तुम्ही आहा परिपूर्ण। करीतो भक्तीने तुम्हास नमन।।६६।। आगमने तुमच्या मम जन्म सफल। आली आराधना जप फळास। निःसंकोच पणे करावी आज्ञा मज। करीन सेवा आपुली आनंदे।।६७।। ऐकून हसून म्हणाले कैलासनाथ। शैलराज येथे आलो तपास्तव। म्हणूनी येथे नाही कुणी फिरकणार। करावी ऐसी व्यवस्था येथे।।६८।। पर्वतराज तू तपस्या - धाम। मुनी देवता आणि राक्षस। अनुष्ठानस्तव घेती तुझ्या आश्रय। असशी द्विजदिकांचे तू निवास स्थान।।६९।। तू रम्य म्हणून आलो आश्रयास। करणार येथे आत्मसंयम पूर्वक तप। नाही येणार मम साधनेत विघ्न। करावी तू ऐशी व्यवस्था।।७०।। विनयाने म्हणाला गिरीराज। आला तपास्तव या स्थानास। भाग्य थोर घडले तवदर्शन। करीतो मनःपूर्वक तूमचे स्वागत।।७१।। करावी तपश्चर्या शांतपणे येथ। नाही होणार कसलाही त्रास। ठेवीन मी चोख बंदोबस्त। झालो मी खरोखरच धन्य।।७२।। दुजेदिनी परिजन सेवकां आज्ञा देऊन। सुवासिक फुले अन् फळे घेऊन। आणि बरोबर कन्येस घेऊन। गेला हिमालय शिवापाशी।।७३।। अर्पून फुले फळे केले नमन। पार्वतीस शिवाचे

सन्मुख करुन। म्हणे ही मम कन्या असे सेवेस उत्सुक। सख्यांसह करील ती तुमची सेवा।।७४।। डोळे उघडून शिव पाहती तिज। पार्वती यौवनाच्या प्रथमावस्थेत। अंगकांती नील कमलासम श्यामल। मुख पूर्ण इन्दुसम तेजस्वी।।७५।। पाहुनी तिज शिव नेत्र मिटून। जाहले फिरुन शिव ध्यानमग्न। आली शंका हिमालयाचे मनात। करतील की नाही शिव स्वीकार।।७६।। केली शंकराची प्रार्थना फिरुन। केले शिवाने ध्यान विसर्जन। ''नित्य दर्शनास तू ये शैल्यराज। परी कन्येस समवेत नको आणू।।७७।। शैलराज, असशी तू ज्ञानी,धार्मिक। स्त्री सानिध्ये होते वासना उत्पन्न। तपस्व्यांनी रहावे स्त्री पासून दूर। म्हणूनी कन्येस न आणणे योग्य''।।७८।। ऐकून पार्वती म्हणाली शिवास। ''केलात तुम्ही तपश्चर्येचा निश्चय। प्रकृतीच घडवितसे सर्व कर्म। तीच करी उत्पत्ती-स्थिती-लय।।७९।। सांगते आता मी तुम्हास। मीच असे प्रकृती तुम्ही पुरुष। झालात माझ्यामुळे सगुण साकार। आहात तुम्ही निरिच्छ जीतेंद्रिय''।।८०।। शिवजी मग म्हणाले पार्वतीस। ''जर असेन परब्रह्म परमेश्वर अलिप्त। नसे मज तुजपासूनी भय। यदृच्छेने करी तू माझी सेवा''।।८१।। जातेस हिमालय पार्वतीसहीत। करीतये ती सेवा अविरत। इकडे लाभला होता तारकासुरास वर। त्यामुळे तो झाला होता उन्मत्त।।८२।। शिवपुत्राचे हस्तेच होणार त्याचा वध। होते ऐसेची विधीचे विधान। त्यास्तव शिव-पार्वतीचा विवाह।

होणे होते अति आवश्यक।।८३।। इंद्रादिंनी पाठविले कामदेवास। शिवास वशीभूत करण्यास्तव। परी शिवाचे मन तेणे झाले क्षुब्ध। त्याने संतापे केले काम दहन।।८४।। गेले निघून सदाशिव कैलासास। जाहला पार्वतीस शिवविरह। नारदाने जाऊन सांगितले तियेस। करावी तपश्चर्या शिवप्राप्तीस्तव।।८५।। मातापित्यांच्या अनुज्ञे जाऊनी वनात। करु लागली ती कठोर तप। नाही जाहले तिज शिवदर्शन। परंतु होता पार्वतीचा दृढनिश्चय।।८६।। तपप्रभावे झाले त्रैलोक्य संत्रस्त। आले ब्रह्मादिदेव शिवासमीप। म्हणाले ते सर्व तेंव्हा शिवास। करी पार्वती तप तुमचे प्राप्तीस्तव।।८७।। करावे अनुग्रहीत तिज करुनी विवाह। तुमचे विवाहाचे असे मोठे कारण। तारकासुर झाला असे उन्मत्त। तुमचा पुत्रच करु शकेल वध।।८८।। म्हणूनी करीतो विनंती तुम्हास। करुनी तुम्ही पार्वतीसह विवाह। करावे तुम्ही आम्हा अनुग्रहीत। आपण भक्ताभिमानी भक्तवत्सल।।८९।। केले मान्य शिवाने त्यांचे वचन। म्हणाले मी असे विषय विरक्त। परी तुमचे हे कार्य करण्यास्तव। करीत मी पार्वतीशी विवाह।।९०।। बोलाविले शिवाने सप्तर्षीस। सांगितले पार्वती परीक्षा घेण्यास। नाना परीने नारदासी निंदून। शिवरुप वर्णुन घेतली त्यांनी परीक्षा।।९१।। परी पार्वतीची गुरुवरील निष्ठा पाहून। तैसेची तपाचा दृढ निश्चय पाहून। सप्तर्षींनी मग शिवाकडे येऊन। सांगितला सर्व वृत्तान्त शिवास।।९२।। स्वत: शिव

आले परीक्षा घेण्यासाठी। केला ब्राह्मणवेष धारण त्यांनी। शिवाची निंदा तिजसमोर केली। ऐकून पार्वती झाली क्रोधीत।।९३।। ऐकू नये शिवनिंदा म्हणोनी। निघाली पार्वती मग तेथोनी। तेंव्हा स्वतःचे मूळ रुप घेवोनी। धरीला पार्वतीहस्त शिवांनी।।९४।। म्हणाले शिव मग तियेस। जाहलो असे मी तुजवर प्रसन्न। करीन मी तुझे पाणिग्रहण। असशी तू मम सनातन पत्नी।।९५।। मग पार्वती म्हणाली शिवास। आहा तुम्हीच पती पहिल्यापासून। तारकासुराचे त्रासे देव संत्रस्त। घेतला मी जन्म त्यांच्या कार्यास्तव।।९६।। आत तुमच्या आज्ञे जाते घरी। आहात तुम्ही लीला चतुर म्हणुनी। घेऊन भेट माझ्या पित्याची। घालावी मागणी माझ्यासाठी।।९७।। गेली परत पार्वती स्वगृहास। आले तेथोनी शिव कैलासास। सांगितला विवाह निश्चय सर्व गणांस। केला गणांनी मोठा आनंदोत्सव।।९८।। हिमनगाकडे पाठवले शिवाने सप्तर्षींस। केला वसिष्ठांनी हिमालयास उपदेश। हिमालये केला पर्वतांसी विचार विमर्श। दिली संमती पार्वती विवाहास।।९९।। आले सप्तर्षी मग कैलासास। म्हणाले हिमनगे कन्या दिली तुम्हास। झाले शिवजी अतिशय प्रसन्न। करीन स्वामी कृपेने विवाह वर्णन।।१००।।

श्री सदाशिव चरणार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु

## ।। अध्याय पाचवा ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री सदाशिवाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

सदाशिवा तुजसी नमन। निर्गुण निराकार तव निजरुप। लीला म्हणूनी होशी साकार। काय वर्णावे मी तुझे रुप।।१।। असती तव लीला शब्दातीत। करीतो वर्णन तव विवाह कथेस। वैराग्य मूर्ती तू सती कलत्र। विविधरुपे होता साकार।।२।। हिमनगाने दिली संमती विवाहास। झाला शिव बहु आनंदित। हिमनगबाला पार्वतीस वरण्यास। निघाला सदाशिव वऱ्हाडासह ।।३।। हिमनगाची सुरु लगबग। दिली त्याने आज्ञा तयारी स्तव। वऱ्हाड स्वागताची तयारी जय्यत। सजले नगर दिव्य,अलौकिक।।४।। केली विश्वकर्म्याने मंडपरचना। विशाल मंडप मनोहर वेदीरचना। विस्तार दशसहस्र योजने त्याचा। शुभ लक्षणे युक्त। होता मंडप।।५।। होते देखावे चमत्कृती पूर्ण। पशुपक्ष्यांच्या कलाकृतींनी युक्त। महालक्ष्मीची मूर्ती लक्षणयुक्त। ऐसी अतिशय मोहक रचना।।६।। केले उभे देव निवासासाठी। त्यांचे लोकासम कृत्रिम लोकांसी। सत्यलोक, वैकुंठ, अमरावती। सारे लोक

दिव्य सिंहासनांसह।।७।। शिवकृपे विश्वकर्म्यास सामर्थ्य। शिवास्तव केले उज्ज्वलस्थान। केला सज्ज विवाहास्तव मंडप। अतिशय उत्तम विश्वकर्म्याने।।८।। पाठविली लग्नपत्रिका शिवाकडे। पाहून शिवजी संतुष्ट जाहले। शिवाने मग नारदाचे स्मरण केले। आला नारद तुरंत तेथे।।९।। आज्ञापिले नारदास शिवाने। देव, ऋषी, मुनींसी भेटावे। तूची मजवतीने सर्वांसी द्यावे। आग्रहाचे निमंत्रण विवाहाचे।।१०।। दिले नारदाने निमंत्रण सर्वांसी। सर्वही देव,मुनी आणि ऋषी। अतिशय आनंदे आले कैलासी। सुरु जाहली विवाह तयारी।।११।। विष्णुने शिवास केली विनंती। गृह्यसूक्त विधीवत विवाह करण्याची। मंडप स्थापना, नांदी मुख श्राध्दादि। कुलधर्म युक्त करावेत विधी।।१२।। तेणे वाढेल तुमची कीर्ती। होईल प्रचलित तीच रीती। मिळेल मार्गदर्शन लोकांसी। करतील तैसेची आचरण।।१३।। शिवांनी मान्य केले वचन। ऋषींनी केले वेदोक्त मंत्रोपचार। करुनी स्वस्तीवाचन,ग्रहपूजन। केली सर्व वैदिक कर्मे पूर्ण।।१४।। झाले सदाशिव अतिसंतुष्ट। केले ऋषींना आदरे वंदन। नंतर सर्व निमंत्रितांना घेऊन। निघाले शिव कैलासाहून।।१५।। आली सर्व मंडळी नगरा समीप। झाला हिमालय प्रसन्न अतिशय। स्वागत साहित्य हाती देऊन। पाठविले ब्राह्मनांस अन् पर्वतांस।।१६।। आला स्वागतासाठी हिमालय। त्याचा मोठा परिवार पाहून। जाहला देवांनाही बहु

आनंद। केले स्वागत हिमालयाने।।१७।। शिवजीच्या दक्षिण भागी ब्रह्मदेव। वामबाजूस हरी प्रत्यक्ष। मागे इंद्र अन् देवसमुदाय। केले हिमालयाने सर्वांस वंदन।।१८।। शिवजींची अन् देवश्रेष्ठींची ओळख। आपुल्या परिवारास देण्यास्तव। बोलाविले आप्तांना स्वगृहास। शिवजींना परिवारासह बोलाविले।।१९।। शिवजी लीला चतुर महान। दाखविली त्यांनी लीला प्रत्यक्ष। करुन धारण विचित्र वेष। भयंकर गणांसह मेने समोर आले।।२०।। पाहून शिवाचे भयंकर रुप। आला मेनेस कोप बहुत। म्हणाली नाही देणार मी यास। माझी कन्य पार्वती कदापिही।।२१।। समजून काढण्या आला हिमालय। न मानी परी मेना तयास। करती प्रयत्न ब्रह्मादि सर्व। स्वयं विष्णूंनी समजाविले तिज।।२२।। मेना म्हणाली तेंव्हा विष्णूस। दाखवावे शिवाने मनोहर रुप। तरीच देईन मी माझ्या कन्येस। अन्यथा हा विवाह होणार नाही।।२३।। श्री हरींनी प्रेषिले नारदास। जावे हे देवकार्य सिध्दीस। जाऊनी नारदे केली शिवस्तुती बहुत। जाहले शिव बहुत संतुष्ट।।२४।। ऐकूनी सारा येथील समाचार। शिवजींनी धरीले रुप मनोहर। मोदे पाचारिले नारदे मेनेस। आली लगबगीने ती बाहेरी।।२५।। पाहुन शिवरुप आनंददायक। जाहली मेना आश्चर्यचकीत। मग मेना म्हणाली शिवास। ‘‘ आपण आहात बहुत महान’’।।२६।। अज्ञाने वदले मी अपशब्द। करावी क्षमा मजसी आपण। व्हावे

आपण मजवरी प्रसन्न। व्हावा आता सोहळा संपन्न।।२७।। आले शिवजी देवगणां समवेत। हिमालयाच्या भव्य प्रासादात। शिवाचे तेजोमय मनोहर रुप। पाहून प्रसन्न झाले समस्त।।२८।। जवळी येता लग्न समय। गर्गमुनी वदले हिमालयास। बोलवा नवरदेव अन् वऱ्हाडास। कन्यादान समय आला समीप।।२९।। आता आला कन्यादान समय। हिमालयाने केला नामगोत्र उच्चार। हिमाद्रि म्हणाला सदाशिवास। उच्चारावे आपले नामगोत्रादि।।३०।। तेंव्हा शिव जाहले निरुत्तर। नारद तेंव्हा म्हणाला सर्वांस। शिवजींचे नामगोत्र जाणण्यास। ब्रह्मविष्णुही असती असमर्थ।।३१।। शिवतत्त्व सर्वातीत, निर्गुण, निराकार। परब्रह्म मायाधीश निर्विकार। असती ते परमात्मा परमेश्वर। त्यांचे कुठले कुळ आणि गोत्र।।३२।। गोत्रहीन असून ते उत्तम गोत्राचे। कुलहीन परी उच्चोत्तम कुलाचे। केली आराधना पार्वतीने। म्हणून ते जावई लाभले तुज।।३३।। झाले विधीपूर्वक कन्यादान। दिला पार्वतीहात शिवाचे हातात। केला शिवांनी पार्वतीचा स्वीकार। जयकाराने दुमदुमला त्रिलोक।।३४।। जाहला विवाह सोहळा संपन्न। हिमनगाने केला बहुत दानधर्म। आदरातिथ्याने केले वऱ्हाड प्रसन्न। निघाले शिवजी पार्वतीसह।।३५।। निघाली सर्व मंडळी वधुवरांसह। आले सर्व कैलासावर। शिव हसून म्हणाले पार्वतीस। आससशी तू प्राणहुनी प्रिय।।३६।। झालो मी अतिशय प्रसन्न। म्हणे पार्वती मीही असे धन्य।

आता करुया आपुले कर्तव्य। ऐकून शिव जाहले हर्षित।।३७।। दिले त्यांनी सर्वांस मिष्टान्न भोजन। केला सन्मान भेटवस्तू देऊन। मग घेऊन शिवपार्वतीचे दर्शन। गेले समस्त आपापले लोकी।।३८।। कैलासावरील विवाह महोत्सवानंतर। शिवजी आपल्या प्रियेस घेऊन। गेले मनोहर आणि दिव्य एकांतात। हजार वर्षे राहीले तेथेची।।३९।। इतका काळ लोटून गेला तरीही। शुभवार्ता कानी आली नाही। देवांना चिंता उत्पन्न जाहली। केला इंद्रासह विचार विमर्ष।।४०।। इकडे जाहला तारकासुर उन्मत्त। शिवपुत्रा हस्तेच तयाचा वध। यावरी कोणता करावा उपाय। आले विधिसह सर्व हरीकडे।।४१।। त्यांचेसह आले हरी कैलासावर। परी शिवजींचे न घडले दर्शन। गण सांगती गेले पार्वती मंदिरात। म्हणूनी श्रीहरी आले तेथे।।४२।। श्रीहरीसह सर्वांनी मिळून। केले शिवस्तवन आर्त होऊन। त्यांची आर्त अशी हाक एकून। शिवजींनी दार उघडीले।।४३।। सांगितले सर्वांनी शिवास। असा आपणची सर्वेश्वर। माजला असे तारकासूर फार। करावे आपणची संकट दूर।।४४।। वदले शिव सर्व देवांस। मम पुत्रा हस्तेच होणार वध। देईन मी त्यास्तव मम तेज। धारण करण्यास असे कोण समर्थ?।।४५।। इतक्यात झाले तेजाचे स्खलन। विनविले सर्वांनी मग अग्नीस। केले धारण त्याने कपोतरुपात। इतक्यात पार्वती आली तेथे।।४६।। पाहूनी तेथील सारे दृश्य। जाहली पार्वती

कोपायमान। शापित करुनी त्या सर्वांस। गेली पार्वती निघोन तेथून।।४७।। अग्नीने शिववीर्य केले धारण। भयंकर दाह न होई सहन। गेला मग शिवास शरण। म्हणाले ते स्त्री गर्भात कर प्रवीष्ट।।४८।। नारदाज्ञे अग्नीने ते तेज। केले प्रवीष्ट ॠषीस्त्रीयांचे उदरात। गर्भवती झाल्याची होता जाणीव। गेल्या भीऊन त्या ॠषी स्त्रिया।। ४९।। पति आज्ञेने गेल्या हिमालयात। केला तेथेच शिववीर्याचा त्याग। हिमालयासही सोसेना दाह। त्याने ते गंगेत सोडून दिले।।५०।। गंगेने ते सर्व सहा भाग। केले सारे वीर्य एकत्र। सोडले सरकांडयाच्या वनात। तेथे तेजस्वी बालक जन्मला।।५१।। अशा प्रकारे मार्गशीर्ष मासात। शुक्ल षष्ठीच्या सुमुहुर्तास। भूलोकी जाहला शिवपुत्राचा जन्म। झाली आकाशातून षुष्पवृष्टी।।५२।। केले कृत्तिकांनी बालकांचे पालन। समजली पुत्रवार्ता शिवास। आणवूनी कैलासी स्वपुत्रास। केला तयास अभिषेक।।५३।। देवदेवता आले या समयास। झाले मुदित पाहुनी कुमारास। दिधले सर्वांनी सर्वोत्तम दान। जाहला कुमार ऐश्वर्य संपन्न।।५४।। देव म्हणाले शिवजीस। तारकासुर वधास्तव कुमारजन्म। लागतो आता युध्दतयारीस। द्यावी कुमारास तैशी आज्ञा।।५५।। नंतर देवांनी मांडले युध्द। सरसावून झाली उभयसेना सिध्द। जाहले देवदैत्यांचे तुंबळ युध्द। जाहली उभयपक्षी जीवित हानी।।५६।। दैत्यराजाने केले इंद्रास विध्द। सरसावला पुढती तेंव्हा वीरभद्र। करुनी मनी

शिवजींचे स्मरण। झुंझु लागला तो रणांगणात।।५७।। सांगती कार्तिक स्वामी वीरभद्रासी। यावे रणात आपण मागुती। जोर चढला मग तारकासुरासी। केले शस्त्रास्त्रांनी जर्जर देवांसी।।५८।। आले श्रीहरी मग युध्दासी। दैत्यराज त्वेषे भिडला त्यांसी। उभयतात सुरु तुंबळ लढाई। ब्रह्मदेव मग वदे कार्तिकेयासी।।५९।। कार्तिया असे वर यासी। त्याचा वध फक्त तुझेच हाती। तरी तू मारुनी तारकासुरासी। करावेस त्रिजगतास सुखी।।६०।। गेला कार्तिकेय तारकासुरावर। त्वेषे लढु लागले ते उभय। मग करुन शिवपार्वती स्मरण। कुमाराने शक्ती घेतली हाती।।६१।। कुमाराने केला शक्तीचा प्रहार। दैत्यराज कोसळला होऊनी जर्जर। जाहला तारकासुराचा वध। गेले पळून उर्वरीत दैत्य।।६२।। जाहले सर्व देव, ऋषी मुदीत। सकल मिळून आले कैलासावर। जाहला मोठा आनंदोत्सव। जाहले शिवपार्वती प्रसन्न।।६३।। एकदा सखी पार्वतीस म्हणती। कैलासी शिवगण अनेक असती। ते सर्व शिवाज्ञे नुसार वर्तती। आपला ऐसा एकही गण नाही।।६४।। ऐकूनी सखियांचे वचनाला। पार्वतीने स्वअंगमळा पासून केला। शुभ लक्षणयुक्त। दिव्य पुरुषाला। होता विशाल अन् महाबलवान।।६५।। मग पार्वतीने कथिले त्याला। माझाची पुत्र रे तू मुला। नाव 'गणेश' दिधले त्याजला। द्वारपाल म्हणून केले स्थापित।।६६।। एके दिनी सांगुन गणेशाला। गेली पार्वती लगेच स्नानाला। शिव तेंव्हाची

आले दर्शनाला। गणेशाने अडविले त्यासी।।६७।। शिवजी तैसेची जाऊ पाहता। गणेशाने सोटयाने प्रहार केला। संतप्त शिवजी म्हणाले गणांना। घ्यावा याचा यथेच्छ समाचार।।६८।। सुरु झाले शिवगण अन् गणेश। माजले त्यांमध्ये तुंबळ युध्द। नाटोपे गणेश शिवगणांस। जाहले शिवजी आश्चर्य चकित।।६९।। वृत्तान्त ऐकून आले विष्णु आदि सर्व। झाले घनघोर युध्द तयांत। परी गणेश नाटोपे कोणास। माजली सर्व त्रैलोक्यात खळबळ।।७०।। पाहून झाले शिव अस्वस्थ। केला त्यांनी गणपतीचा शिरच्छेद। देव गणादि तेणे झाले तटस्थ। झाली पार्वती अति संतप्त।।७१।। केल्या पार्वतीने लक्ष शक्ती उत्पन्न। विकट गर्जत। आल्या त्या बाहेर। देवसेने वर त्यांनी चढाई करुन। करु लागल्या त्या भयंकर संहार।।७२।। वाटली देवांना प्रलयाची भीती। पार्वती पुत्रवधा मुळे ही स्थिती। करावे प्रसन्न आता तिजसी। हाची असे एकमेव उपाय।।७३।। सर्व देवादि वदले पार्वतीसी। आम्ही सकलही शरण तुजसी। करुनी अपराधांची क्षमा आम्हासी। माते रक्षण करावे त्रैलौक्याचे।।७४।। तेंव्हा पार्वती म्हणाली त्यांसी। सांगते आता मी सर्वांसी। करुनी जीवंत माझे पुत्रासी। द्यावा अग्रपूजेचा मान त्यासी।।७५।। व्हावा मम पुत्र सर्वांचा अध्यक्ष। तरीच मी मागे घेईन सेनेस। होईल शांती सर्वत्र प्रस्थपित। हेची असे माझे सांगण।।७६।। नंतर सर्व देवादिंसह नारद। आला शिवजींच्य समीप।

सांगून शिवजीस सर्व वृत्तान्त। राहीले उभे सर्व तयासमोर।।७७।। शिवजी ऐकून वदले गणांस। जावे तुम्ही उत्तर दिशेस। प्रथम मिळेल त्या प्राण्याचे मस्तक। आणुनी गणेशाचे धडास लावावे।।७८।। आज्ञोप्रमाणे गेले शिवगण। दिसला हत्ती जो होता एकदंत। आणले कापुनी त्याचे मस्तक। लावले गणेशाचे कलेवरास।।७९।। नंतर शिवजींचे आज्ञेनुसार। घेतले देवांनी हातात जल। तेजाचे उत्पत्ती स्थानातील तेज। करु दे प्रवेश बालक शरीरात।।८०।। ऐसे वदून शिंपडले जल। तेंव्हा निष्प्राण देहात त्वरीत। होऊनी प्राणसंचार झाला जीवंत। जाहली पार्वती अत्यानंदित।।८१।। गणाध्यक्ष म्हणून अभिषेक। केला देवांनी श्रीगणेशास। करुनी त्याची स्तुती सहर्ष। बैसविले त्यास शिवअंकावर।।८२।। प्रसन्नतेने शिव वदले सर्वांस। असे हा माझा द्वितीय पुत्र। तेंव्हा ब्रह्मादि विष्णु वदले त्यांस। होशील तू त्रिभुवनात पूज्य।।८३।। तू सकल विघ्नहर्ता सुखकारक। देशील भक्तांस उत्तम फल। होईल तुझीच पूजा प्रथम। नंतरच होईल आमुचे पूजन।।८४।। तेंव्हा शिवजी म्हणाले पुत्रास। असे मी तुजवर अति प्रसन्न। होशील तू सर्वांसीस पूजनीय। 'विघ्नहर्ता' नाम असे तुजसी।।८५।। नांदत होते सुखे शिवपार्वती। संगती दोन पुत्र असती। तेंव्हा पार्वती म्हणे शिवासी। आता पुत्र विवाह विचार करावा।।८६।। ऐकून आनंदले स्कंद, गणपती। कुमार म्हणे मम विवाह आधी। तेंव्हा गणपती वदे तयांसी। मीच विवाह

करणार प्रथम।।८७।। ऐकून शिवपार्वतीस आले हसू। परी भांडू लागले दोघे बंधू। पाहुनी दोघांचा दृढ निर्धारु। म्हणाले शिवपार्वती तयांस।।८८।। तुम्ही दोघे अतिप्रिय आम्हासी। जावे दोघांनी पृथ्वी प्रदक्षिणेसी। प्रदक्षिणा करुन येईल प्रथम मागुती। त्याचा विवाह होईल प्रथम।।८९।। केले मान्य उभय बंधुंनी। निघाला स्कंद प्रदक्षिणे लागोनी। परी गणेश विचार करी मनी। कैसी करावी मी प्रदक्षिणा।।९०।। मग योजिली त्याने नामी युक्ती। केले स्नान त्याने यथाविधी। आश्चर्य करीती शिवपार्वती। म्हणे गणेश स्वीकारावी मम पूजा।।९१।। बैसले उभय आसनावरी। गणपतीने मनोभावे पूजा केली। उभयतांस सात प्रदक्षिणा घालुनी। म्हणे माझा विवाह करा आता।।९२।। ते म्हणती ये पृथ्वी प्रदक्षिणा घालुनी। नको करु विलंब जा त्वरिती। कोपे वदला गणेश तयांसी। सात प्रदक्षिणा मी केल्या असती।।९३।। असा तुम्ही धर्मरुप अन् पंडीत। जाणता सारी वेदादि शास्त्र। मातापिता प्रदक्षिणेचे असे फल। पृथ्वी प्रदक्षिणेचे त्या पुण्य मिळेल।।९४।। करीता सेवा मातापित्याची। सारी पवित्र तीर्थे त्यांचे ठायी। हेच सर्व संमत धर्मसाधन मानती। मोठे शास्त्र पंडीत अन् विद्वान।।९५।। वाटले शिवपार्वतीस भारी कौतुक। पाहुनी मुलाचे बुध्दिचातुर्य। असे तव युक्तीवाद धर्म संमत। असशी खरोखरी धन्य तू।।९६।। केला गणेश विवाहाचा विचार। रिध्दी, सिध्दी विश्वरुप कन्या

दोन। आला विश्वरुप प्रस्ताव घेऊन। शिवपार्वतीने केला तो मान्य।।९७।। जाहला श्रीगणेशाचा विवाह। दिले सर्वांनी शुभाशिर्वाद। नांदु लागला गणेश त्यास। 'क्षेम' अन् 'लाभ' नाम पुत्र झाले।।९८।। नारदांनी दिली वार्ता स्कन्दास। पाहुनी स्कन्द गेला निघून। गेला निघून तो क्रौंच पर्वतावर। कुमाराचे 'कुमारत्व' झाले प्रस्थापित।।९९।। गेले शिवपार्वती दर्शनास। राहीले 'मल्लिकार्जुन' रुपात। पुत्रस्नेहे उभय जाती दर्शनास। पार्वती पुनवेस शिव आमावस्येस।।१००।।

श्री सदाशिव चरणार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु

# ।। अध्याय सहावा ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री सदाशिवाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

नमन माझे सद्‌गुरुराया। दयाळु कृपावंता करुणालया। तुमचेची कृपेने वर्णितो आता। श्री शिवतत्त्व माहात्म्य नवशतीत।।१।। केला स्कंदाने तारकासुर वध। झाले त्याचे पुत्रांना अतिदुःख। तारकाक्ष,विद्युन्मालि अन् कमलाक्ष। होते तारकासुर सुत बलाढय।।२।। गेले तिघे मेरुपर्वतावर गुहेत। आचारले त्यांनी प्रखर तप। त्यामुळे जाहले ब्रह्मदेव प्रसन्न। म्हणाले करीन मी मनोरथ पूर्ण।।३।। मागितले तयांनी वरदान। करावे आम्हा अमर आणि अजर। असावे आम्ही सदा निरामय। व्हावा त्रैलोक्यात मुक्त विहार।।४।। ब्रह्माजी तदा म्हणाले तयांस। न हाती मम देणे अमरत्व। मागा तुम्ही असे वरदान। जेणे होईल तुमचे संरक्षण।।५।। म्हणाले ते तेंव्हा विधात्यास। नसे आमुचे कडे सुरक्षित स्थान। त्यामुळे सर्व ऐश्वर्य सुविधा युक्त। द्यावी करुन तीन पुरे निर्माण।।६।। करु शकतील तीनही पुरे सर्व। त्रिभुवनात मुक्त संचार अन् विहार। राहु तयात आम्ही सुरक्षित। करु निर्भयपणे संचार

सर्वत्र।।७।। तारकाक्षाने मागितले सुवर्णनगर। कमलाक्षाने मग चांदीचे नगर। विद्युन्मालिस प्राप्त लोह नगर। येतील हजार हजार वर्षांनी एकत्र।।८।। त्या स्थितीत असता पुष्य नक्षत्र। पाहुन केवळ अभिजीत मुहूर्त। फक्त शिवजीच एक बाणे छेदतील। तेंव्हाच ती सर्व होतील नष्ट।।९।। ऐकून त्यांसी देऊनी वरदान। गेले ब्रह्मदेव सत्यलोकात। केली मयासुरे तीन पुरे निर्माण। होती ती सुरेख सर्वेश्वर्य संपन्न।।१०।। फिरु लागले दैत्य स्वपुरांतुन। एक स्वर्ग लोकात दुजा आकाशात। तिसरा फिरु लागला पृथ्वीवर। सुरु झाले असुर भ्रमण सर्वत्र।।११।। नगरे होती अलौकिक तेजयुक्त। त्रैलोक्यास होऊ लागला त्रास। झाला असुरांचा बहु उत्कर्ष। इंद्रादिदेव झाले बलहीन।।१२।। झाले सर्व इंद्रादि देव हतबल। आले ते ब्रह्मदेवाकडे सकल। ब्रह्मा म्हणाले तेंव्हा तयांस। झाले मोठे मज मुळेच दैत्य।।१३।। असे अशक्य मज करणे वध। त्यांचे मरण शिवहस्तेची असेल। करावे तुम्ही शिवास प्रसन्न। तेणेच होईल तुमचे कार्य संपन्न।।१४।। आले सकल देवाधिदेव शिवासमीप। केली त्यांनी शिवस्तुती अमुप। केले तयांनी विनम्र निवेदन। सांगितले तयास त्रिपुरांचे वृत्त।।१५।। ऐकूनी शिवजी म्हणाले तयांस। असे ज्ञात मज तुमचे दुःख। परंतु त्रिपूराधिपती करती पुण्यकर्म। करती ते माझी भक्ती नित्य।।१६।। जावे तुम्ही सर्वांनी वैकुण्ठ लोकात। करतील श्रीहरी तुम्हा सहाय्य।

त्रिपुराधिपती असती पुण्य परायण। जरी देती ते त्रिभुवनास त्रास।।१७।। केला श्रीहरींनी मानसी विचार। कर्तव्य माझे त्रिभुवन रक्षण। म्हणून मी आता युक्ती करीन। त्यामुळे होईल त्रिपुरांचा नाश।।१८।। श्रीहरींनी स्वतेजे केला उत्पन्न। तेजस्वी महापुरुष बलवान। त्याने कटोरा, झाडू हाती घेऊन। घेतले होते मुख वस्त्रे झाकून।।१९।। त्याने मग विष्णू आज्ञे वरुन। त्रिपुरात पसरविला सर्वत्र अधर्म। दिला स्वधर्म सर्वांनी सोडून। करु लागले विपरीत धर्माचरण।।२०।। दिले तयांनी सोडून शिवाराधन। जाहले ते सर्व आचारहीन। केले सर्वांसी वदेमार्ग भ्रष्ट। माजला तेथे सर्वत्र अनाचार।।२१।। गेले कैलासी विष्णु भगवान। आले ब्रह्मदेव ही कैलासावर। केले तयांनी शिवाचे स्तवन। जाहले शिव तयांवर प्रसन्न।।२२।। म्हणाले असे मज ज्ञात संपूर्ण। तुमच्या येथे येण्याचे प्रयोजन। झाले असे त्रिपुरासुरांचे पतन। असे ठाऊक त्यांचे अधर्माचरण।।२३।। म्हणता मज सम्राट देवराज। नसे सामग्री मजकडे तया योग्य। नसे मजकडे सारथी, दिव्यरथ। नसे धनुष्यबाणही मज पाशी।।२४।। देवांनी दिधले शिवासी सर्व। रथ, सारथी, दिव्य धनुष्य व बाण। जाहले शिवजी तेंव्हा प्रसन्न। आला रथ त्रिपुरांसमीप।।२५।। तेंव्हा सदाशिव म्हणाले तयांस। करावे पशुंचा अधिपती मज। कल्पिला निरनिराळा पशु प्रत्येक देव। तरीच होईल त्रिपुरासुरांचा नाश।।२६।। झाले ऐकून सर्व देव खिन्न। म्हणाले शिव

तेंव्हा तयांस। करीता तुम्ही ‘पाशुपतव्रत’ आचरण। व्हाल तुम्ही पशुभावातून मुक्त।।२७।। शिवजींचे म्हणणे करुनी मान्य। झाले पशु सर्व देव अन् असुर। पशुत्वरुपी पाशांतून मुक्त करणारे शिव। जाहले ‘पशुपती’ नामे विख्यात।।२८।। रथातून आले शिव त्रिपुरांसमीप। आले रथाच्या शीर्ष स्थानात। धरु लागले नेम घेऊन धनुष्य। परंतु वेध घेता येईना।।२९।। मग तयांनी केले गणेश पूजन। जाहला तेंव्हा गणेश प्रसन्न। जाहले दूर कार्यातील विघ्न। झाले शिव नेम घेण्यास समर्थ।।३०।। तेंव्हाच तीनही पुरे आली एकत्र। केली शिवांनी गर्जना दुस्सह। केली पाशुपतास्त्राची योजना बाणावर। सोडल बाण अभिजीत मुहुर्तास।।३१।। लागला जळू तारकाक्ष भावांसह। म्हणाला तेंव्हा तो शिवप्रभुंस। असा तुम्ही आम्हावरी प्रसन्न। म्हणून लाभले तुमच्या हाती मरण।।३२।। एकाची विनंती तुमचे चरणी। असावी तुमची भक्ती मनी। शिवकृपे त्यासी मिळाली मुक्ती। जाहले प्रसन्न सर्व देव ऋषी।।३३।। गेले जळून सर्व स्थावर जंगम। परी वाचला तेंव्हा मय दैत्य। होता तो निस्सीम शिवभक्त। त्यांच्याची कृपे राहीला सुरक्षित।।३४।। दैत्य एक होता जालंधर नामक। जन्म झाला त्याचा शिवापासून। एकदा बृहस्पती आणि इंद्र। जात होते शिवाचे भेटीस।।३५।। घेतली परीक्षा शिवाने त्यांची। आले तपस्वी होऊन तयांसमोरी। इंद्राने गर्वाने विचारले त्यासी। सांग तू शिव कोठे असती।।३६।। तपस्वी

न वदे शब्द पाहूनी। आला कोप मग इंद्रा लागुनी। उगारिले वज्र त्या तपस्व्यावरी। झाले प्रज्ज्वलीत तपस्व्याचे नेत्र।।३७।। बृहस्पतींने जाणले हे तर शिवजी। करु लागले ते शिवाची स्तुती। घातले इंद्रास त्यांचे चरणावरती। म्हणाले करावी क्षमा यासी।।३८।। तेंव्हा शिव म्हणाले बृहस्पतीस। असे मी स्तुती ऐकून प्रसन्न। देतो तुम्हास्तव इंद्रास जीवदान। 'जीव' नाम तुम्ही व्हाल प्रसिध्द।।३९।। मग शिवाने नेत्रातील तेज। काढून घेतले आपुले हातात। दीले सोडून ते क्षीरसमुद्रात। त्या तेजापासून झाला बालक।।४०।। बालकाने केली सुरुवात रडण्यास। होऊ लागली पृथ्वी कंपायमान। गेले सर्व ब्रह्मदेवास शरण। आले ब्रह्मदेव तेंव्हा भूलोकी।।४१।। समुद्राने प्रकट होऊन केला नमस्कार। ठेविले बाळक त्यांच्या मांडीवर। म्हणाला करा जातकर्मादि संस्कार। सांगावे जातक करुन वर्णन।।४२।। तेंव्हा बालकाने मारली मिठी। त्यामुळे अश्रु आले विधीच्या नेत्री। म्हणाले तेंव्हा ब्रह्मदेव सागरासी। असेल याचे नाम 'जालंधर'।।४३।। असेल बालक पराक्रमी युध्दनिपुण। दैत्यांचा अधिपती हा होईल। जिंकेल विष्णूंनाही हा युध्दात। असे हा रुद्राविना सर्वांसी अवध्य।।४४।। मिळेल यास पतिव्रता पत्नी। शीलवान सुंदर मधुभाषिणी। मग शुक्राचार्यांसी बोलावूनी। केला बालकास राज्याभिषेक।।४५।। बालकास समुद्राहाती देवोनी। गेले ब्रह्मदेव आपुले स्थानी। सागरे केले संगोपन प्रेमानी। जाहला

मोठा जालंधर।।४६।। कालनेमी कन्या वृंदा पाहोनी। दिला उभयतांचा विवाह लावोनी। फिरु लागले दैत्य धरणीवरी। राहु लागला जालंधर सुखाने।।४७।। सर्व दैत्य असता सभास्थानी। जालंधरे पूसीले शुक्राचार्यांसी। राहूचा शिरच्छेद केला कुणी। सांगा मज संपूर्ण कथानक।।४८।। मग शुक्राचार्यांनी तेंव्हा। सांगुनी समुद्र मंथन कथा। राहु देवसभेत देव होऊन गेला। श्रीहरींनी केला त्याचा शिरच्छेद।।४९।। केले सर्वांनी समुद्राचे मंथन। सर्व रत्ने केली देवांनी हरण। ऐकून जालंधर झाला कोपायमान। म्हणे धडा शिकविन देवांसी।।५०।। जाहले सुरु देवदानव युध्द। जिंकीले असुरांनी सर्व देवांस। गेले सर्व देव मेरुपर्वत गुहेत। आला जालंधर देवांना शोधण्यास।।५१।। तेथून देव पळाले वैकुण्ठाकडे। घातले त्यांनी श्रीहरीस साकडे श्रीहरी गरुडावरुन युध्दास आले। परी जालंधर नाटोपे त्यांसी।।५२।। झाले विष्णु त्याच्यावर प्रसन्न। देऊ केले तयास वरदान। जालंधर इच्छेने आले निवासास। त्याचे कडे लक्ष्मीसह श्रीहरी।।५३।। नारदाने खेळले कपट जाल। केले पार्वतीचे रुप वर्णन। म्हणे जालंधरास ऐसे स्त्रीरत्न। नसे तुझ्याकडे फिके तव वैभव।।५४।। जाहली जालंधराच्या मनी ईर्ष्या। लागला प्रयत्नी पार्वती मिळविण्या। ललकारीले त्याने प्रत्यक्ष शिवाला। रणांगणात युध्द करण्यासाठी।।५५।। जाहले शिव अतिशय संतप्त। मुखातून कृत्या झाली निर्माण।

तिने पळविले शुक्राचार्यांस। दडविले त्यांना आपले गुप्तांगात।।५६।। जाहले शिवगण आणि असुर। यांच्यात भयंकर तुंबळ युध्द। होऊ लागला दैत्यांचा पराभव। आला जालंधर स्वतः रणभूमीवर।।५७।। आसुर माये केले गंधर्व उत्पन्न। तैशाची मायिक अप्सरा निर्माण। पाहुन शिवगण गेले लोभून। हातातील शस्त्रे पडली गळून।।५८।। मग जालंधराने शुंभ निशुंभ। केले युध्दासाठी नियुक्त। घेऊनी स्वतः मायिक शिवरुप। गेला तो पार्वती मंदिराकडे।।५९।। पाहुनी तिचे अनुपम सौंदर्य। गेला जालंधर मोहे दीपून। पार्वतीने त्याचे रुप जाणून। पावली तेथून ती अंतर्धान।।६०।। आली पार्वती मानस सरोवरावर। केले तिने श्रीविष्णूंचे स्मरण। म्हणे करा वृंदेचा पतिव्रत्य भंग। माझी आज्ञा असे तुम्हास।।६१।। होता तियेचा पातिव्रत्य भंग। होईल जालंधर बलहीन। मग होईल त्याचा रणात वध। केली हरींनी आज्ञा शिरसावंद्य।।६२।। मग धारण करुन मायिक रुप। आले विष्णु जालंधराचे नगरात। मायेने वृंदेस पाडून स्वप्न। केले तिज मनातून भयभीत।।६३।। भीतीने ती आली मुनीसमीप। पाहीले तिने क्रुर राक्षस। मुनींनी हुंकारे पळविले राक्षस। झाली वृंदा आश्चर्य चकित।।६४।। झाली वृंदेच्या मनी श्रध्दा उत्पन्न। केले तिने मुनींसी नमन। म्हणाली वृंदा तेंव्हा मुनींस। असे मी जालंधराची पत्नी।।६५।। सांगावी त्याची वार्ता मज। तितक्यात प्रकटले दोन वानर। आणीले त्यांनी पकडून

हातात। जालंधराचा देह अन् मस्तक।।६६।। वृंदेने मग केली याचना। यावी मम पतिदेहात चेतना। द्यावे जीवदान तुम्ही त्यांना। असे मी शरण तुमचे चरणी।।६७।। केले त्यांनी जालंधरास जीवंत। पावले ते मुनी अंतर्धान। मग जालंधरास देऊन आलिंगन। झाली रममाण वृंदा त्याचेशी।।६८।। एके दिवशी तीस झाली जाणीव। नसे हा मम पती जालंधर। यामुळे झालो आपण शील भ्रष्ट। दिला तिने श्रीहरींस शाप।।६९।। करुनी मनात पतीचे स्मरण। केला वृंदेने अग्नीत प्रवेश। झाले तिचे तेज पार्वतीत विलीन। झाली मुक्त पतिव्रता वृंदा।।७०।। पार्वती अदृश्य झाल्यानंतर। आला जालंधर फिरुन रणात। केला त्याने शिवावर बाणवर्षाव। शिवजींनी शरजाल भेदून टाकले।।७१।। पायाच्या अंगठयाने सुदर्शन निर्माण। करुनी टाकीले ते जालंधरावर। झाले धडावेगळे जालंधर मस्तक। जाहला ऐसा जालंधराचा वध।।७२।। कश्यप स्त्री दनुचे अनेक पुत्र। विप्र चित्ती होता त्यातील एक। त्याचा पुत्र दंभ हा विष्णुभक्त तयासी परी नव्हते संतान।।७३।। कृष्णमंत्र घेऊन केले तप। जाहले विष्णू तयावर प्रसन्न। झाला तयासी पराक्रमी पुत्र। नाम तयाचे शंखचूड।।७४।। केला त्याने ब्रह्मविद्येचा जप। जाहले तयावर ब्रह्मदेव प्रसन्न। देऊनी तयासी श्रीकृष्ण कवच। दिले तयास अपेक्षित वरदान।।७५।। ब्रह्मदेवाच्या आज्ञेला अनुसरुन। धर्मध्वज कन्या तुलसी नामक। केला तिच्यासह

याने विवाह। तुलसी होती पतिव्रता एकनिष्ठ।।७६।। करण्या आपल्या राज्याचा विस्तार। शंखचूडाने स्वारी केली इंद्रावर। उभयपक्षी जाहले रणक्रंदन। केला देवांनी प्रखर प्रतिकार।।७७।। गेला शखंचूड देवांवर धावून। लावले त्याने देवांना पळवून। झाले देव हतबल अन् दीन। आले ते सर्वजण ब्रह्मदेवा कडे।।७८।। घेऊनी हरीस ब्रह्मा अन् देव। आले समस्त कैलासावर। कथिले तयांना शंखचूडवृत्त। करुनी त्याचा वध द्या अभया।।७९।। शिवाने पाठविला पुष्पदंत दूत। तयासी म्हणाला उन्मत्त दैत्य। करुनी चढाई करी न युध्द। सांग रुद्रास यावे युध्दास।।८०।। निघाला शंखचूड मग युध्दास। सुरु जाहले भयंकर युध्द। होते लढत हरी,ब्रह्मदेव, सर्व। करीत होते शिव अवलोकन।।८१।। होऊ लागले दैत्यांचे पारडे जड। होऊ लागला देवसेनेचा संहार। आले सर्व शिवजीस शरण। गेले स्कन्द भ्रदकाली साहाय्यास।।८२।। केला स्कन्दाने दैत्य महासंहार। केले भद्रकालीने असुरांचे भक्षण। आले शिव रथावर आरुढ होऊन। शंखचूडाने केला त्यांस प्रणाम।।८३।। नंतर सुरु झाला रणसंग्राम। होते शंखचूडाकडे श्रीकृष्णकवच। तैसेची पत्नीचे पतिव्रत्य महान। तेणे होता शंखचूड अवध्य।।८४।। मग शिवाज्ञेने श्रीहरींनी। ब्राह्मण रुपे गेले शंखचूडापाशी। घेतले मागून श्रीकृष्ण कवचासी। दिले दानवेंद्राने आपुले कवच।।८५।। नंतर धारण करुन दैत्यराज रुप। केला तुलसीचा पतिव्रत्य भंग।

त्याचवेळी शिवांनी सोडला त्रिशूळ। त्याचे तेजाने शंखचूड गेला जळून।।८६।। तेंव्हा देव, ऋषी, मुनी सर्व करती मोठा आनंदोत्सव। गेले सर्व आपापले लोकांस। असे शिवचरित मंगलप्रद।।८७।। हरींनी केला पातिव्रत्य भंग। तुलसीने दिला त्यास शाप। मग दुःखाने केले शिवस्मरण। शिवजी तेंव्हा म्हणाले तिज।।८८।। सुखदुःख सारे आपले कर्मभोग। असते त्याचे फल बरे वाईट। पूर्वी केले होतेस मोठे तप। त्याची उद्दिष्ट पूर्ती आता होईल।।८९।। सोडूनी हा देह राह विष्णूसह। हेच तव तपाचे पुण्यफळ। देहत्याग करता नदी होशील। गंडकीनदी म्हणून होशील ख्यात।।९०।। होशील तूची तुलसी वृक्ष। असेल देवपूजेत तुझे महत्त्व। शापाकरणे होऊनी पाषाण। राहतील श्रीहरी तीरी तव।।९१।। शिवजींनी दिले अंधकास वरदान। केला शिवांनी बाणासुर गर्वहरण। करुनी शिवांनी गजासुराचा वध। दिले त्यांनी गजासुरास वरदान।।९२।। गजासुराने सांगितले शिवास। माझे कातडे असावे कोमल निर्मळ। करावे तुम्ही ते धारण। 'कृत्तिवास' म्हणून व्हावे प्रसिध्द।।९३।। असती शिवजी भक्तवत्सल। नेहमी करती ते भक्तरक्षण। एकदा शिवरात्रीस रात्री समयास। शिवभक्त पूजित होता शिवलिंग।।९४।। दुंदुभिनिर्ऱ्हाद दैत्य घेऊन व्याघ्ररुप। आला तयापाशी खाण्यास। शिवमंत्ररुपी कवच होते भक्तास। खाऊ शकला नाही व्याघ्र।।९५।। त्याचा दुष्ट हेतू जाणून। जाहले

शिवजी अतिसंतप्त। व्याघ्रावर मुष्टीप्रहार करुन। केले वाघास तात्काळ गतप्राण।।९६।। आले तेथे तपस्वी धाऊन। म्हणाले शिवास विनम्र वचन। व्याघ्रेश नाम करुन धारण। रहावे यास्वरुपी येथे स्थित।।९७।। झाले तेथे 'व्याघ्रेश्वर लिंग'। येती भक्तगण दर्शनास। देऊनी भक्तांसी इष्ट वरदान। शिव तयांची कामनापूर्ती करती।।९८।। विदल उत्पल दैत्यांचा वध। पार्वती हस्ते कन्दुकाने करवून। झाले कंदुकाचे लिंगात रुपांतर। 'कन्दुकेश्वर'नामे झाले प्रख्यात।।९९।। स्वामी कृपेने शिवलिलांचे वर्णन। केले मी स्वामी भक्त शरण। वर्णनशक्ती मजसी देऊन। करवावी शिव नवशती पूर्ण।।१००।।

श्री सदाशिव चरणार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु

## ।। अध्याय सातवा ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री सदाशिवाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

श्री सदाशिव भक्तवत्सला। करुणामूर्ती दयासागरा। अगाध तुमचे चरित्र शंकरा। कैसे वर्णावे ते नवशतीत।।१।। शिव कृपे गुणनिधि उध्दार। होता तो यज्ञ विधि पुत्र। झाला होता तो व्यसनाधीन। केला तयाचा पित्याने त्याग।।२।। बैसला होता वृक्षतळी जाऊन। नव्हता पोटात अन्नाचा कण। पाहीले तेथे त्याने एक शिवालय। आला रात्री नैवेद्या खाण्यास।।३।। त्यास्तव वस्त्र फाडून लावली वात। झाला शिवगाभारा प्रकाशमान। मिळाले त्यामुळे दीपदानाचे पुण्य। नाही घडली चोरीही हातून।।४।। त्यामुळे शिव झाले त्यावर प्रसन्न। लाभला गुणनिधिला शिवलोक। पुढील जन्मी झाला कलींग नृप। दीपदान करुन करीतसे दीपदानाचा प्रचार।।५।। आचरली त्याने अनेक पुण्यकर्म। केली शिवभक्ती भावभक्तिी पूर्ण। झाला शिव त्याचे वरी प्रसन्न। झाला तो देवांचा धनपती कुबेर।।६।। ऐसी तुमची लीला मनोहर। असती अनेक मूर्ति अन् अवतार। आठवूनी कीर्ती मनी सविस्तार।

करीन वर्णन संक्षीप्त रुपात।।७।। स्वामी कृपे वर्णितो पाच अवतार। जाहले जे विविध कल्पांत। नंदीकेश्वराने कथिले सनत्कुमारांस। सूतजींनी निवेदिले ऋषींस।।८।। 'श्वेतलोहीत' एकोणिसावे कल्पात। झाला शिवजींचा प्रथमावतार। होते ब्रह्मदेव ध्यान करीत। 'सद्योजात' नाम झाला उत्पन्न।।९।। जाणीले ब्रह्माने हा शिवावतार। केला हात जोडून नमस्कार। करती सद्‌बुध्दिने ते चिंतन। झाले तेथे चार कुमार उत्पन्न।।१०।। ते श्वेतवर्णी, परमज्ञानी, परमोत्कृष्ट। सुनद, नंदन, विश्वनंदन, उपनंदन। सद्योजाताने दिले ब्रह्मास ज्ञान। दिले त्याला सृष्टी रचनेचे सामर्थ्य।।११।। 'रक्त' नामक विसावे कल्पात। ब्रह्माने धरीले रक्तवर्ण शरीर। पुत्रासाठी करती होते ध्यान। जाहला एक पुत्र प्रकट।।१२।। लालवस्त्र त्याचे गळी लाल फुलमाळ। नेत्र लालबुंद आभूषणेही लाल। असे तो 'वामदेव शिव' जाणून। केला ब्रह्माने तयास नमस्कार।।१३।। झाले चार लालवस्त्रधारी पुत्र। विरज, विवाह, विशोक, विश्वभावन। वामदेवाने दिले ब्रह्मास ज्ञान। दिली सृष्टी उत्पन्न करण्या शक्ती।।१४।। 'पितावासा' नाम एकविसावे कल्पात। केले ब्रह्माने पीत वस्त्र धारण। पुत्र कामनेने करीत होते ध्यान। झाला 'तत्पुरुष' नाम प्रौढ कुमार।।१५।। तो शिवस्वरुप असे हे जाणून। महादेव गायत्री उच्चारे केले नमन। त्यापासून झाले पीतवस्त्रधारक। अनेक दिव्य कुमार प्रकट।।१६।। सुरु

होता शिवनाम कल्प। जाहले सर्व विश्व जलमय। सृष्टी निर्माते ब्रह्मा झाले खिन्न। जाहला तेजस्वी कुमार उत्पन्न।।१७।। कृष्णा वर्ण अंगावर कृष्णवस्त्र। जाणून ' अघोर' रुपात शिव। शिवावताराचे करुन ध्यान। केला मनः पूर्वक नमस्कार।।१८।। 'अघोर' रुपी शिवाचे बाजूस। झाले कृष्णवर्णी चार कुमार प्रकट। कृष्ण, कृष्ण शिख, कृष्णास्य, कृष्णकंठ। अद्‌भूत घोर योगाचे प्रवर्तक।।१९।। सुरु झाला ब्रह्माचा दुसरा कल्प। नाव त्याचे होते विश्वरुप। पुत्रास्तव ब्रह्मा करती ध्यान। झालि विश्वरुपा सरस्वती प्रकट।।२०।। तैसेची भगवान ईशान रुपात। प्रकटले शिव शुध्द स्फटिकासम। केले ब्रह्माजीने आदरे नमन। भगवानांनी केला सन्मार्ग उपदेश।।२१।। चार सुंदर बालके केली उत्पन्न। जटी, मुंडी, शिखंडी,अर्धमुंड। योगाद्वारे केले सद्‌धर्मानुष्ठान। झाली प्राप्त त्यास श्रेष्ठगती।।२२।। ईशान, पुरुष, अघोर वामदेव, ब्रह्म। महेशाच्या पाच मूर्ती प्रसिध्द। शिवांमुळेच संपूर्ण ब्रह्मांडात। सर्वहितकारक व्यवहार झाला ख्यात।।२३।। ईशान शिवाचे पहीले रुप। प्रकृती उपभोगुन क्षेत्रज्ञान स्थित। दुसरे तत्पुरुष सर्व ज्ञाताधिष्ठित। घेतसे भोग गुणांच्या आश्रयाने।।२४।। 'अघोर' नामक शिवाचे तिसरे रुप। असे बुध्दितत्त्वात अधिष्ठित।'वामदेव'शिवाचे चौथे रुप। अहंकाराधिष्ठित राहून करी कार्य।।२५।। 'ईशान' संज्ञक स्वरुप असे कर्ण। वाणी आणि आकाशाचे अधिष्ठान।

‘पुरुष’ नामक रुप असे त्वचा। हात, सर्वस्पर्शी वायुचे अधिष्ठान।।२६।। ‘अघोर’ संज्ञक रुप शरीर। रस, रुप, अग्नीचे अधिष्ठान। ‘वामदेव’ नामक रुप असे जीभ। गुदा, रस, जलाचे अधिष्ठान।।२७।। ‘सद्योजात’ नामक रुप असे नाक। उपस्थ, गंध, भूमीचे अधिष्ठान। शिवाची ही रुपे असती वंदनीय भक्तकल्याणकारी सुखदायक।।२८।। तैसेची असती शिवाच्या अष्टमूर्ती। सारे विश्वच अष्टमूर्ती स्वरुप। शर्व, भव, रुद्र, उग्र, पशुपती, ईशान। महादेव असती ही तयांची नाम।।२९।। जल, अग्नी,वायू, आकाश, क्षेत्रज्ञ। चंद्र यांच्यात शर्वादि अधिष्ठित। शिवाचे हेची विश्वंभरात्मक रुप। करी चराचर विश्वास धारण।।३०।। शिवाचे जीवनदायी जलरुप। नाम ‘भव’ असे जगास व्यापून। ‘उग्र’ नामक सदाशिवाचे रुप। भरण पोषण करुनी चालवी विश्व।।३१।। ‘भीम’ त्याचे आकाशात्मक रुप। करीतसे सर्व क्षेत्रांत निवास। भवपाश मुक्त करणारे शिवाचे रुप। असे प्रसिध्द ‘पशुपती’ नामक।।३२।। शिवाचे सूर्यात्मक रुप ईशान। करीतसे सारे विश्व प्रकाशित। विश्वाल्हादायक चंद्रात्मक रुप। या रुपास ‘महादेव’ म्हणतात।।३३।। ‘आत्मा शिवाचे आठवे रुप। असे मूर्त-अमूर्त मूर्तींना व्यापून। असे सारे विश्वच शिवमय। ऐसे सर्व ज्ञाते मानताती।।३४।। पुढे नंदीकेश्वर सांगती कुमारांस। शिवाचे अर्धनारीश्वरअनुपमरुप। तेची आत वर्णितो येथ। असे बहु पुण्यप्रद त्याचे श्रवण।।३५।।

सृष्टि निर्मिताने विधीने केल्या। प्रजा उत्पन्न परी विस्तार न झाला। दु:ख व्याकुळे मग झाले ब्रह्मा। त्यांनी आकाशवाणी ऐकली।।३६।। ''मैथुनी प्रजा करा निर्माण'' । करु लागले ब्रह्मा विचार। केले नसे निर्माण स्त्रीकुळ। मैथुनी प्रजा कैसी होईल।।३७।। ब्रह्माने केली तपश्चर्या शिवास्तव। शिवशक्ती चिंतून केले अनुष्ठान। आराधनेने झाले शिव प्रसन्न। प्रकटले ते अर्धनारीश्वर रुपात।।३८।। झाले ब्रह्मदेव बहु हर्षित। नम्रत्वे केला तयास प्रणिपात। वदती शिव ''जाणतो तवकार्य। होईल तुमची इच्छा पूर्ण''।।३९।। शिवाने केले शक्तीस विलग। ब्रह्माने केला तिज नमस्कार। ''करु इच्छितो मैथुन प्रजा उत्पन्न। असशी तू शक्ति उमगस्थान।।४०।। दे मज नारीकुळ निर्मिण्या सामर्थ्य। प्रकटावेस तू दक्षकन्या म्हणून''। 'तथास्तु' ऐसा आशीर्वाद देऊन। भ्रूमध्यातून केली शक्ती निर्माण।।४१।। शिवाज्ञेने झाली ब्रह्मावर प्रसन्न। दक्षकन्या होण्याचे केले मान्य। विधीस अनुपम शक्ती देऊन। झाली विलीन शिवशरीरात।।४२।। तेंव्हापासून झाला स्त्रीकुळ प्रारंभ। झाला मैथुनी सृष्टीचा आरंभ। होऊ लागला सृष्टीचा विस्तार। देखोनी ब्रह्मा झाले मुदीत।।४३।। नंदीश्वर वदले एकदा शिव। सांगती स्वत:चे चरीत्र वर्णुन। म्हणाले ब्रह्मास तेंव्हा शिव। वाराह कल्पात सातवे मन्वंतरात।।४४।। सर्व लोक प्रकाशित कर्ते कल्पेश्वर। तेच तुमचे पणतु आहेत। होतील ते वैवस्वत मनुचे पुत्र। त्या मन्वंतरातील

द्वापारयुग।।४५।। द्वापाराचे स्वामी त्यास। येईल त्यानंतर कलीयुग। याचे अंती शिवादेवीसह। होईल प्रकट श्वेतमुनीचे रुपात।।४६।। हिमालयातील छागल शिखरावर। होतील शिखाधारी शिष्य उत्पन्न। श्वेत, श्वेतशिख, श्वेताश्व, श्वेतलोहीत। असतील ध्यानयोगात प्रवीण।।४७।। अविनाशित्व जाणून होतील भक्त। राहतील परब्रह्मातच समाधी मग्न। तेंव्हा मानव ध्यानाव्यतिरिक्त। कर्महेतुक साधने न पाहू शकतील ।।४८।। तसेच प्रजापती श्वेतनामक। होतील व्याज दुसरे द्वापार युगात। तेंव्हा होईन मी कलीयुगात। सुतार नामाने विख्यात।।४९।। हृषिक, दुंदुभी, शतरुप, केतुमान। चार वेदज्ञ ब्राह्मण मम शिष्य। ध्यानयोगे मम अक्षय, अव्यय। रुप जाणून होतील मुक्त।।५०।। तिसरे द्वापारात भार्गव व्यास। दमन नामे मी होईन विख्यात। विशोक, विशेष, विपाक, पापनाशन। असतील हे माझे शिष्य।।५१।। शिष्यांसह व्यासांस करुन साहाय्य। दाखवीन लोकांस निवृत्तीमार्ग। चवथे द्वापारात अंगिरा व्यास। सुहोत्र नामे होईन प्रकट।।५२।। सुमुख, दुर्मुख, दुर्दम, दुरतिक्रम। योगसाधना माहात्मा हे शिष्य। यांच्यासह करीन व्यासांना मदत। असतील ते थोर साधक।।५३।। पाचवे द्वापारात सविता व्यास। होईन तपस्वी कंक नामक। सनक, सनातन, सनंदन, सनत्कुमार। होतील चारही माझे शिष्य।।५४।। शिष्यांसह करुन व्यासांस मदत। निवृत्ती मार्गाचा करीन प्रचार। सहावे द्वापारात ‘मृत्यु’

नाम व्यास। करतील ते वेदांचे विभाजन।।५५।। लोकाक्षी नामे होईन अवतीर्ण। निवृत्ती मार्गाची उन्नती करीन। सुधामा, विरजा, संजय, विजय। असतील माझे दृढव्रती शिष्य।।५६।। सातवे द्वापारात 'शतक्रतू' व्यास। 'सर्वज्ञ जैगीषव्य' मी होईन। सारस्वत, योगीश, मेघवाह, सुवाहन। असतील चे चार माझे शिष्य।।५७।। आठवे द्वापारात 'वसिष्ठ' वेदव्यास। 'दधिवाहन' नामे होईन अवतीर्ण। कपिल, आसुरी, पंचशिख, शाल्वल। हे योगी असतील मम शिष्य।।५८।। नववे द्वापरात 'सारस्वत' व्यास। 'ऋषभ' नामे होईन प्रकट। पराशर, गर्ग, भार्गव, गिरीष। हे महायोगी असतील मम शिष्य।।५९।। यांच्या सहयोगे व्यासास साहाय्य। बनवीन मी योगमार्ग सुदृढ। भक्तांवरती मी दया करुन। करीन उध्दार भवसागरातून।।६०।। दहावे द्वापारात 'त्रिधामा' व्यास। 'भृततुंग', हिमनग शिखरी राहतील। बलबंधू, नरामित्र, केतुशृंग, तपोधन। हे माझे शिष्य असतील।।६१।। अकरावे द्वापारात 'निवृत'व्यास। 'तप' नामे गंगाद्वारी प्रकटीन। लंबोदर, लंबाक्ष, केशांब, प्रलंबक। हे माझे दृढवती शिष्य होतील।।६२।। बारावे द्वापारात 'शततेजा' व्यास। स्वर्ण कवचयुक्त 'अत्रि' रुपे प्रकटीन। सर्वज्ञ, समबुध्दी,साध्य, शर्व। उत्तम योगी असतील मम शिष्य।।६३।। तेरावे द्वापारात 'नारायण' व्यास। 'महामुनी बली' नामे होईल प्रकट। सुधाता, काश्यप, वसिष्ठ, विरज। असतील

माझे श्रेष्ठ शिष्य।।६४।। चौदावे द्वापारात ‘रक्ष’ नाम व्यास। अंगिरस कुलात ‘गौतम’ नामे अवतरीन। अत्रि, दवशद, श्रवण, श्रविष्कट। असतील माझे चार शिष्य।।६५।। पंधरावे द्वापारात ‘त्रय्यारुणी’ व्यास। ‘वेदशिरा’ नामे अवतार घेईन। कुणी, कुणिबाहु, कुशरीर, कुनेत्रक। असतील महाज्ञानी मम शिष्य।।६६।। सोळावे द्वापारात ‘देव’ नामक व्यास। ‘गोकर्ण’ नामे मी प्रकट होईन। काश्यप, उशना, च्यवन, बृहस्पती। असतील माझे परमयोगी शिष्य।।६७।। सतरावे द्वापारात ‘देवकृतंयज’ व्यास। ‘गृहावासी’ नामे अवतार घेईन। उतथ्य, वामदेव, महायोग, महाबल। ऐसे चार माझे शिष्य असतील।।६८।। अठरावे द्वापारात ‘ऋतंजय’ व्यास। ‘शिखंडी’ नामे अवतार घेईन। वाचःश्रवा, रुचीव, स्वावास्य, यातीश्वर। ऐसे माझे शिष्य असतील ।।६९।। एकोणीसावे द्वापारात ‘भरद्वज’ व्यास। ‘जटीमाली’ नामे मी प्रकटीन। हिरण्यनामा, कौशल्य, लोकाक्षी, प्रधिनी। गंभीर स्वभावाचे माझे शिष्य।।७०।। विसावे द्वापारात ‘गौतम’ व्यास। ‘अट्टाहास’ नामे अवतार घेईन। सुमंतू, बर्बरी, कबंध, कुशिकंधर। विद्वान असतील माझे शिष्य।।७१।। एकविसावे द्वापरात ‘वाचश्रवा’ व्यास। ‘दारुक’ नामे मी प्रकट होईन। प्लक्ष, दार्भायणी, केतुमान, गौतम। असतील माझे परमयोगी शिष्य।।७३।। बाविसावे द्वापरात ‘शुष्मायण’ व्यास। ‘लांगली जीभ’ नामे मी प्रकटेन। भल्लवी,

मधु, पिंग अन् श्वेतकेतू। असतील परमधार्मिक मम शिष्य।।७३।। तेविसावे द्वापारात 'तृणबिंदू' व्यास। कांलजर पर्वती 'श्वेत' नामे प्रकटेन। कुशिक, बृहदश्व, देवल आणि कवि। हे चार तपस्वी माझे शिष्य।।७४।। चौविसावे द्वापारात 'यक्ष' व्यास। 'शूली' नाम महायोगी म्हणून प्रकटेन। शालिहोत्र, अग्निवेश, युवनाश्व, शरद्वसु। हे चार होतील माझे शिष्य।।७५।। पंचविसावे द्वापारात 'शक्ती' व्यास। महायोगी 'मुंडीश्वर' नामे प्रकटेन। छगल , कुंडकर्ण, कुभांड, प्रवाहक। चार तपस्वी माझे शिष्य होतील।।७६।। सव्विसावे द्वापारात 'पराशर' व्यास। 'सहिष्णू' नामे मी अवतार घेईन। उलुक, विद्युत, शंबूक, अश्वलायन। हे तपस्वी मम शिष्य होतील।।७७।। सत्ताविसावे द्वापारात 'जातूकर्ण्य' व्यास। प्रभास क्षेत्री मी ' सोमशर्मा' होईन। अक्षपाद, कुमार, उलूक, आणि वत्स। हे चार माझे शिष्य होतील।।७८।। अठ्ठाविसावे द्वापारात 'पाराशर' व्यास। ब्रह्मचाऱ्याच्या रुपात मी प्रकटेन। असेल हा माझा कायावतार। 'लंकुली' नामे विख्यात होईन।।७९।। कुशिक, गर्ग, मित्र आणि कौरुष। हे चार असतील माझे शिष्य। ब्रह्मचारी, वेदानुगामी असतील। माहेश्वर योगाने शिवलोकी जातील।।८०।। म्हणाले नंदीश्वर सनत्कुमारासी। युग चौकडीतील अवतारां विषयी। माहिती शिवाने कथिली ब्रह्मासी। होतील हे अवतार क्रमाक्रमाने।।८१।। यनत्कुमार पुसिती नंदीकेश्वरासी। सांगावे शिवत्व कैसे प्राप्त

तुम्हासी। तेंव्हा नंदीकेश्वर म्हणाले तयांसी। होता शिलाद नाम ब्रह्मात्मा मुनी।।८२।। पितरांनी आज्ञापिले तयासी। पुत्र प्राप्तीसाठी करी प्रयत्नांसी। जाऊनी शिवलोकी करी तपासी। देवेंद्र प्रकटले होऊन प्रसन्न।८३।। मागितला तयाने अयोनिज पुत्र। नसावा तयासी कदापि मृत्यु। देवेंद्र म्हणाले ऐशा वरदानास्तव। करी तू शिवप्रभुंची आराधना।।८४।। केली त्याने मन:पूर्वक शिवाराधना। जाहला शिव प्रसन्न तयांना। म्हणाले आलो मी तुज वर देण्या। घेई मागून अपेक्षित वरदान।।८५।। शिलाद तेंव्हा म्हणाले शिवास। तुम्हासम अयोनिज मृत्युरहीत। हवा मजसी ऐसा सुलक्षणी पुत्र। शिवजी तेंव्हा म्हणाले तयास।।८६।। ब्रह्मदेव देवादिंनी केली आराधना। त्यांच्या अन् तुझ्या इच्छे करीता। अवतार माझा होईल आत। होईल पूर्ण सर्वांची इच्छा।।८७।। 'नंदी' नावाने घेईन अवतार। तुझा अयोनिज पुत्र मी असेन। देऊनी शिलादास ऐसे वरदान। जाहले शिवपार्वती अंतर्धान।।८८।। शिलाद मुनी होते अंगणखणत। त्यांच्या शरीरातून झालो प्रकट। होती मम कांती दैदीप्यमान। केली सर्व देवांनी पुष्पवृष्टी।।८९।। झाले शिलार मुनी आनंदित। 'नंदी' असे ठेविले मज नाम। केला त्यांनी महेश्वरास नमस्कार। केले मग मी मनुष्यतनु धारण।।९०।। केले शिलादांनी जातकर्म संस्कार। केले माझे बहु कोडकौतुक। शिकविली सर्व शास्त्रे अन् वेद। झालो मी सात वर्षाचा।।९१।। आले मित्र अन् वरुण

पाहण्यास। केले मम पित्याने आदरातिथ्य। वदले तव पुत्र असे महाविद्वान। परी याचे आयुष्य असे अल्प।।९२।। ऐकून दुःख झाले पित्यास। पूसिले मी दुःखाचे कारण। दिली मी त्यांना वचने धीर। म्हणालो मी अस मृत्युरहित।।९३।। मग यास्तव करण्या तपश्चर्येस। गेलो निघून मी वनात। केल मनोभावे रुद्रमंत्र जप। जाहले शिव मजवर प्रसन्न।।९४।। म्हणाले मग शिवजी मज। असशी तू माझ्या प्रमाणेच। नसे मृत्युभय असशी बलवान। अजर, अमर आणि दुःखरहीत।।९५।। केले शिवाने मज त्यांचे समान। 'नंदी' हो म्हणून शिंपडले जल। त्यातून जटोदका, त्रिस्रोती, वृषभध्वनी। स्वर्णोदका, जंबु पंचनद्या उत्पन्न।।९६।। पंचनद नाम स्थान जपेश्वरा समीप। या तीर्थी स्नान करुन जो जप। करीतो मग लाभते तयास। सायुज्य मुक्ती शिवाच्या कृपेने।।९७।। केले शिवाने मज गणेश्वर। केले गणांचा अधिपती मज। मरुत् कन्या सुयशेसी माझा विवाह। करुन दिले अनेक आशीर्वाद।।९८।। नंतर शिवाज्ञेने दिले आम्हासी। ब्रह्मा हरींनी अनेक वरांसी। नंतर गणादिंसह आम्हा घेऊनी। आले शिवपार्वती आपुले स्थानी।।९९।। कथिले नंदीने नंदी आख्यान। ऐकून सनत्कुमार झाले हर्षित। हे आख्यान असे शिवभक्तिवर्धक। लाभते तेणे सुख अन् उत्तमगती।।१००।।

श्री सदाशिव चरणार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु

## ।। अध्याय आठवा ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री सदाशिवाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

श्री शिवतत्त्व परम महान। तैसेची तयाचे विविधावतार। ब्रह्मा, विष्णू, रुद्र होऊन। चालवितसे ब्रह्माण्ड चक्र।।१।। जाणण्या श्री शिवत्त्व अगाध। स्वामी वरदहस्तची कारण। करीतो मी आता वर्णन। शिवावतारांचे स्वामी कृपेन।।२।। सांगतो आता कालभैरवावतार। जाहला कैसा लोकल्याणस्तव। कथा असे सुरम्य सुमधुर। ऐकावी सर्वांनी लक्ष देवोनी।।३।। शिवतत्त्व असे विश्वास व्यापुनी। न जाणती ते ब्रह्मा अन् हरी। एकदा गेला इतिहास घडुनी। त्यातूनी भैरवावतार झाल असे।।४।। सुमेरु पर्वती ब्रह्मा बैसले निवांत। देव, श्रेष्ठऋषी गले भेटीस। पूसीले काय असे अविनासी तत्त्व। ब्रह्माजी तेंव्हा तयांस म्हणती।।५।। असे मीच ते अविनाशी तत्त्व। नित्य, अक्षय, अव्यय एक तत्त्व। असे मीची अनादी निरंजन। विश्वकर्ता, भर्ता, भोक्ता मीच।।६।। हरी ही झाले शिवमायेने मोहीत। झाले क्रुध्द ब्रह्मावचन ऐकोन। मीच विश्वकर्ता, परमात्मा, पुरुष परम। ऐसे असून कैसे

वदता वचन।।७।। करता सृष्टी उत्पन्न ममाज्ञेनेच। मीच मायाधिपती, परमगती। त्या उभयांमध्ये झाला कलह। तेंव्हा चारही वेद आले तेथ।।८।। तेंव्हा तयांस म्हणाले वेद। असती शिवाची सर्व सत्ताधीश। त्यांचे योगे होई विश्व प्रवृत्त। असती ते अविनाशी परमतत्त्व।।९।। वेदांचे वचन ऐकूनही ब्रह्मदेव। आणि श्रीहरी या उभयतात। श्रेष्ठत्वावरुन सुरु झाला वाद। त्यांचे मध्ये झाली ज्योत प्रकटीत।।१०।। दिसला त्या ज्योतीत पुरुष। जाणीले हे शिवजी प्रत्यक्ष। वदले ब्रह्मा शिवास झालास प्रकट। माझ्यापासून तू ये मज शरण।।११।। ऐकून ब्रह्माचे उध्दत वचन। झाले शिव बहुकोपायमान। केला त्यांनी भयंकर पुरुष उत्पन्न। हेच शिवाचे कालभैरव रुप।।१२।। म्हणाले शिवजी कालभैरवास। करी तू ब्रह्मदेवास शासन। क्षणात त्याने टाकले कापून। नखाने ब्रह्माचे पाचवे मस्तक।।१३।। पाहून शिवाचे अगाध सामर्थ्य। झाला उभयतांचा अहंकार दूर। जाणीले रुद्र हेच सच्चिदानंदरुप। गेले उभय शिवास शरण।।१४।। म्हणाले शिव काल भैरवास। उभय हे असती माझेच स्वरुप। केलेस जरी तू ब्रह्मास शासन। नित्य आदर करी उभयतांचा।।१५।। लागले असे तुज ब्रह्महत्त्यापातक। ब्रह्म कपाल धरुन करी अवलंबन। भिक्षावृत्ती कापालीक व्रत धरुन। माझे आज्ञे करी तीर्थयात्रा।।१६।। केली शिवाने भयंकर कन्या। नावची तिचे ब्रह्महत्त्या। करीत असता तू तीर्थयात्रा। येईल ही तुझ्या

मागोमाग।।१७।। कळेल त्यामुळे अखिल जगतास। असते ब्रह्महत्या फार भयंकर। तीर्थयात्रेत करता काशी प्रवेश। जाईल ब्रह्महत्या तुज सोडून।।१८।। काशीक्षेत्र अविमुक्त क्षेत्र। तेच महास्मशान, आनंदवन नाम। भैरवाने करता काशी प्रवेश। ब्रह्महत्या निघून गेली पाताळात।।१९।। ब्रह्मांजींचे मस्तक पडले गळून। कपालमोचक तीर्थ झाले तेथ। असे ऐसे काशीक्षेत्राचे माहात्म्य। येथे वास्तव्य असे कल्याणकारक।।२०।। कपालमोचन तीर्थी करुनी स्नान। करी जो देवतर्पण, पितृतर्पण। करी जो यथाशक्ती दानधर्म। होई मुक्त ब्रह्महत्या पापांतून।।२१।। तिथी अष्टमी मार्गशीर्ष वद्य। या दिवशी भैरव झाला अवतीर्ण। या तिथीस घेता भैरवाचे दर्शन। आणि पूजन महापापातून मिळे मुक्ती।।२२।। नृसिंहानी मारीला हिरण्यकशिपूस। नाही झाला कोपाग्नी शांत। समीप पाठवता प्रल्हादास। घेतले जवळ झाले हृदय शांत।।२३।। परी क्रोधाग्नी राहीला तसाच। घेतला शिवाने शरभावतार। तेणे आले नृसिंह शिवास शरण। दिधले तेंव्हा त्यास प्राणदान।।२४।। होते शिवभक्त मुनी शांदिल्य नगरात। शुचिष्मतीशी त्यांनी केला विवाह। सांगितले एकदा तिने विश्वानरास। हवा मज पुत्र शंकरासमान।।२५।। विश्वानर गेला तपास्तव काशीस। घेतले विरेश्वर लिंग दर्शन। विरेश्वर लिंगाचे करुनी त्रिकाल अर्चन। आचरु लागला तो तपास।।२६।। झाले विश्वानरावर शिवजी प्रसन्न।

म्हणे जाणतो शुचिष्मतीचे मनोगत। घेऊनी तुमच्या उदरी अवतार। होईन प्रसिध्द ‘गृहपती’ नामे।।२७।। झाला त्यास पुत्र शुभलक्ष्मण युक्त। नारदाने केले भविष्यकथन। बारावे वर्षी भय अग्नी, विजेपासून। ऐकून विश्वानर झाला शोकग्रस्त।।२८।। गृहपतीस समजात हे वृत्त। केले काशीत एक लिंग स्थापन। करु लागला तो कठोर तप। झाले शिव प्रसन्न त्यास।।२९।। आग्नपदाचा अधिकारी करुन त्यास। अग्नीश्वर नाम स्थापित लिंगास। जो कोणी करील या लिंगाचे पूजन। नसेल अग्नी अन् वीजेपासून भय।।३०।। नसेल तयाला अग्नीमांद्या भय। नसेल त्यास अपमृत्यु भय। मग शिवाने केला गृहपतीस। दिग्पती म्हणून अभिषेक।।३१।। सांगतो समुद्रमंथन समयास। जाहला समुद्रातून चंद्र उत्पन्न। ग्रासु लागला राहू चंद्रास। शिवाने केले मस्तकी धारण।।३२।। देवदैत्य युध्दात झाला विजय। देव सर्व करु लागले गर्व। तेंव्हा यज्ञेश्वर अवतार धरुन। दिली देवांना यथार्थ जाणीव।।३३।। शक्तीसह शिवाचे दहा अवतार। सांगतो त्यांचे संक्षीप्त वर्णन। महाकाल अन् महाकाली प्रथमावतार। असे भोग-मोक्ष प्रदायक।।३४।। तार आणि तारा द्वितीयावतार। दोघेही सुखभोगमोक्षदायक। बाळ भुवनेश भुवनेशी तृतीयावतार। असे शक्ती सज्जनांस सुखदायक।।३५।। षोडशविद्येश विद्येशी चतुर्थावतार। देई भक्तांना सुख आणि मोक्ष। भैरव भैरवीगिरीजा पंचमावतार। उपासकांना देई अभीष्टफल।।३६।।

छिन्नमस्तक छिन्नमस्तका षष्ठावतार। करी भक्तांचे मनोरथ पूर्ण। धूमवान धूमवती सप्तमावतार। उपासकांना देई श्रेष्ठ फळ।।३७।। बगलामुख बगलामुखी अष्टमावतार। असे हा भक्तांना सुखदायक। मातंग मातंगी हा नवमावतार। कामना पुरवून देई श्रेष्ठफळ।।३८।। कमल कमल असे दशमावतार। करीतसे भक्तांचे प्रेमे पालन। असती सुखदायी हे दहा अवतार। कार्य सिध्दीकारक अन् कल्याणप्रद।।३९।। दहा अवतारांच्या शक्ती अद्‌भूत। प्रभावशाली तंत्रशक्ती गर्भित। करती त्या दुष्टांना शासन। करती त्या ब्रह्मतेज वृध्दिंगत।।४०।। सांगतो आत अकरा रुद्रावतार। असे ही गोष्ट फार पुरातन। जाहले देवदानवात भीषणयुध्द। झाला देवांचा मोठा पराभव।।४१।। गेले देव कश्यपऋषींना शरण। सांगितले करावे आमुचे रक्षण। दिले कश्यपांनी देवांस आश्वसन। म्हणाले मी अवश्य करीन प्रयत्न।।४२।। गेले काश्यप काशीनगरीस। गंगेत स्नान केले विधिपूर्ण। मग विश्वनाथाचे दर्शन घेऊन। अंबेसहीत केले शिवाचे पूजन।।४३।। नंतर शिवलिंगाची स्थापना करुन। देव हितोद्देशे सुरु केले तप। झाले भक्तवत्सल महेश्वर प्रसन्न। 'वरमाग' म्हणाले देऊन दर्शन।।४४।। कश्यपाने आनंदाने केले नमन। नंतर मनोभावे केले शिवस्तवन। म्हणाले देवांचे दुःख पाहुन व्यथित। करीतो तुमचे चरणी प्रार्थना।।४५।। व्हावे तुम्ही मम पुत्र रुपे प्रकट। करावे तुम्ही देवांचे रक्षण। शिकवा

दैत्यांना धडा योग्य। 'तथास्तु' म्हणून शिव झाले अंतर्धान।।४६।। आनंदे कश्यप आश्रमात आले। देवांना काशीवर्तमान सांगितले। भगवान शंकरमग कालांतराने। सुरभी उदरातून अकरारुपे प्रकटले।।४७।। कपाली, पिंगल, भीम, विरुपाक्ष। विलोहित शास्ता, अजपाद, अहिर्बुन्ध्य। शंभू, चंड, भव ऐसे नामकरण। झाले सारे जग शिवमय।।४८।। दैत्यांशी मग करुन युध्द। केला भयंकर दैत्यसंहार। त्यांच्या कृपे देव झाले निर्भय। लाभले देवांना राज्य अन् अधिकार।।४९।। रक्षणास्तव राहती रुद्र ईशान्येस। असती भक्तवत्सल, लीलाचतुर। त्यांचेच कोटयवधी गण। असती त्रिलोकी सर्वत्र स्थित।।५०।। सांगतो दर्वास चरीत्र संक्षिप्त। असती अत्री ब्रह्माजींचे पुत्र। ब्रह्माने गेले सपत्नी त्र्यक्षनगावर। ठरविले पुत्रास्तव करीन तप।।५१।। विंध्याचला समीप नदी तीरावर। मांडले त्यांनी उत्तम आसन। विश्वाचा जो एकच प्रभु असेल। देईल पुत्र म्हणून केला तपारंभ।।५२।। तपदहाने झाले त्रिलोक संत्रस्त। आले ब्रह्माकडे इंद्रादि सर्व। केले आपुले दु:ख निवेदन। त्यांचेसह विधी आले विष्णु लोकास।।५३।। हरी समवेत आले शिवासमीप। सांगितली तयांसी हकीकत। करुनी परस्पर विचार विमर्श। आले त्रयीऋषी आश्रमात।।५४।। वदले तीघे अत्री ऋषींस। असू आम्ही तिघेही ईश्वर। आमच्या अंशापासून होतील। तुम्हा विश्वविख्यात तीन पुत्र।।५५।। ब्रह्माचे अंशे जाहला

चंद्र। दुसरा हरी अंशे झाला दत्त। तिसरा दुर्वास शिवजींचा अंश। होता धर्मप्रवर्तक आणि दयाळू।।५६।। घेतली त्याने अंबरीष परीक्षा। तैसेची घेतली रामचंद्र परीक्षा। घेतली तैसीची श्रीकृष्ण परीक्षा। जुंपिले रुक्मिणीसह रथास त्यास।।५७।। विष्णूचे मोहिनी रुप पाहून। जाहले शिवाचे वीर्य स्खलन। घेतले सप्तर्षींनी ते पानावर। केले स्थापन अंजनी उदरात।।५८।। झाला तिज वानरावतारधारी पुत्र। होता हा शक्तिशाली शिवावतार। बालपणी आकाशी केले उड्डाण। सूर्यास त्याने टाकले गीळून।।५९।। हनुमान शिवावतार जाणून। दिली देवऋषींनी वरदाने अनेक। घेतली विद्या त्याने शिवापासून। सूर्याने कथिले करी सुग्रीव साहाय्य।।६०।। केले रावणाने सीतेचे हरण। तेंव्हा केले श्रीरामास साहाय्य। स्वबळावर तेंव्हा सागर उल्लंघून। केला प्रवेश लंका नगरीत।।६१।। दाखवले लंकेत अद्‌भूत चरीत्र। केली अशोकवाटिका उध्वस्त। दिला रावण पुत्रास त्याने उपद्रव। रावणाने त्याचे पुच्छ पेटवले।।६६।। करुनी मग लंकेचे दहन। श्रीरामास कथिले सीता वर्तमान। श्रीरामाने केला लंकास्वारी निश्चय। सेतू बंधन कार्यात केले साहाय्य।।६३।। राम रावण यांच्या भीषण युध्दात। केला त्याने बहुत राक्षसांचा वध। संजीवनी लक्ष्मणास्तव आणून। केले तयास पुनर्जीवित।।६४।। मारुनी तेंव्हा महीरावणास। रामलक्ष्मणा केले त्याने मुक्त। स्वतः त्याने रामभक्ती करुन। रामभक्तीची केली स्थापना।।६५।।

समुद्रमंथना नंतर क्रोधित दैत्य। जाहले देवदानवांचे युध्द। जाहला दैत्यांचा रणात पराभव। गेले पळून ते पाताळात।।६६।। धावले श्रीहरी चक्र घेऊन। तेथे लावण्यवती स्त्रीया पाहून। गेले मोहून राहीले तेथेच। झाले श्रीहरींना अनेक पुत्र।।६७।। देऊ लागले ते सर्वांस उपद्रव। गेले ब्रह्माकडे समस्त देव। कैलासावर आले त्यांना घेऊन। केले शिवाने वृषभरुप धारण।।६८।। वृषभाने मारली मुसंडी पाताळात। सर्वांवर प्रहार केले प्राणघाातक। केला विष्णुपुत्रांचा नाश। ऐकून श्रीहरि झाले संतप्त।।६९।। आले हरी वृषभा संमुख। केली वृषभाने गर्जना भयंकर। जाणले ते वृषभरुप धारी शिव। श्रीहरींनी केले भक्तिपूर्वक नमन।।७०।। निघाले हरी आणाया सुदर्शन। शिवाने कथिले त्यांना थोपवून। राहू दे तेथे तुमचे सुदर्शन। दिले शिवाने दुजे दिव्यसुदर्शन।।७१।। दधिची नाम मुनी शिवभक्त। केला क्षुवाचा अन् विष्णूचा पराभव। सुवर्चा त्यांची पत्नी भाग्यवान। शिवाने उदरी घेतला पिप्पलाद अवतार।।७२।। एकदा वृत्रासुराची घेऊन मदत। केला दैत्यांनी देवांचा पराभव। कथिले देवांनी ब्रह्मास वृत्त। म्हणाले ब्रह्मा तो त्वष्टापुत्र।।७३।। वधास्तव असे एकमेव उपाय। केले दधिचींनी खडतर तप। तपाने त्यांच्या अस्थि कणखर। जाऊनी मागाव्या त्यांच्या अस्थी।।७४।। आले देव दधिची आश्रमात। उभे राहीले करुनी नमस्कार। जाणले दधिचींनी त्यांचे मनोगत। शिवध्यान

करीत केला देहत्याग।।७५।। अस्थिपासोनी शस्त्रे बनवून। केला देवांनी वृत्रासुर वध। इकडे सुवर्चा आली आश्रमात। समजला तिज सर्व प्रकार।।७६।। दिला सुवर्चेने देवांस शाप। म्हणाली तुम्ही पशु व्हाल सर्व। निघाली ती सती जाण्यास। ऐकिली आकाशवाणी तियेने।।७७।। असे तव उदरी दधिची गर्भ। सती जाणे सर्वथा अयोग्य। तिने फाडले आपले पोट। आला तेजस्वी बालक बाहेर।।७८।। तो शिवाचा अवतार जाणून। सुवर्चेने केले त्यास नमन। मग त्याचे कडून अनुज्ञा घेऊन। केला सुवर्चाने आपुला देह त्याग।।७९।। दधिची पुत्र जन्म वृत्त ऐकून। आले ब्रह्माविष्णू आदि देव। केले ब्रह्माने जातकर्मादि संस्कार। नाम त्याचे 'पिप्पलाद' ठेवले।।८०।। पिप्पलादाने केले प्रदीर्घ तप। गेला पुष्पभद्रा नदीवर स्नानास। पाहुनी अनरण्य। नृपाचे कन्येस। केला त्या पद्मेशी त्याने विवाह।।८१।। करु लागले सुखे उभय संसार। जाहले तयांना श्रेष्ठ दशपुत्र। पिप्पलादाने आज्ञापिले शनीस। जाचू नये सोळावर्षे पर्यंत कोणाही बालकास।।८२।। गाधी, कौशिक आणि पिप्पलाद। तीनही असती शनिपीडा निवारक। करावे सर्वांनी त्यांचे नित्य स्मरण। ग्रहपीडा निवारण होईल त्यामुळे।।८३।। होती महानंदा वेश्या नंदीग्रामीत। होती सुंदर गाननिपुण धनाढय। होती ती शिवाची निस्सीम भक्त। एकदा शिव परीक्षा घेण्या आले।।८४।। आले शिव एका वैश्याचे रुपात। होते दिव्य कंकण त्यांचे

करात। होता वैश्य तेजस्वी,आकर्षक। महानंदेने हसून केले स्वागत।।८५।। त्याचे कंकण पाहून झाली मोहीत। वैश्य तेंव्हा म्हणाला महानंदेस। देईन कंकण काय देशील मोल। वदली महानंदा तेंव्हा तयास।।८६।। असे मी वेश्या व्यभिचार धर्म। परी जर द्याल मज कंकण। तीन दिवसरात्री तुमचीच राहील। पतिव्रते प्रमाणे करीन सेवा।।८७।। ऐकून वैश्य झाला आनंदित। रत्नकंकण दिल महानंदेस। दिले तिज रत्नमय लिंग एक। म्हणे असे हे मज प्राणाहून प्रिय।।८८।। जर काही अवचित झाले लिंगास। सत्वरची मी करीन प्राणत्याग। महानंदेने ठेविले नृत्यशाळेत जपून। रात्री गेली वैश्यासमवेत झोपून।।८९।। मध्यरात्री शिव प्रेरणेने आग। नृत्यशाळेस लागली अतिभयंकर। महानंदा त्वरेने गेली धाऊन। केले मुक्त कोंबडा अन् मर्कटास।।९०।। झाली नृत्यशाळा भस्मसात। आगीत गेले जळून शिवलिंग। वचनाप्रमाणे मग चिता रचवून। केला वैश्याने आपला देहत्याग।।९१।। झाली महानंदा अतिदु:खीत। म्हणाली पाळीन पतिव्रता धर्म। पत्नी नात्याने करीन सहगमन। शिवस्मरणे घेतली आगीत उडी।।९२।। भक्तवत्सल शंकर झाले प्रकट। झेलले महानंदेस वरचे वर। झाला धगधगता चिताग्नी शांत। झाले तियेस साक्षात शिवदर्शन।।९३।। तेंव्हा शिव म्हणाले महानंदेस। घेतली परीक्षा तुझी मी च। असे मी तुजवर पूर्ण प्रसन्न। घेई वरदान तू मागुनी।।९४।। महानंदेने धरीले शिवाचे

चरण। म्हणे चरणाशी राहू द्यावे सतत। तैसेची मम दास, दासी, बांधव। आहेत भक्त मिळावी त्यांस मुक्ती।।९५।। जाणुनी महानंदेचे मनोगत। झाले शिव अतिशय मुदीत। तिच्या इच्छेचा मान ठेवून। दिले शिवांनी सर्वांस परमपद।।९६।। घेतली शिवाने भद्रायुची परीक्षा। त्यांनी द्विजेश्वर अवतार घेतला। विप्रस्त्रीचे रक्षण भद्रायू करुन शकला। मागितले विप्राने पत्नीचे वान।।९७।। दिले भद्रायूने स्वपत्नी दान। करु लागला अग्नि प्रवेश चिता रचून। तेंव्हाची शिवाने होऊनी प्रकट। कथिले भद्रायूस मागण्या वरदान।।९८।। म्हणाला पद्माकर वैश्य अन् पुत्र सुनय। दिला त्यांनी आम्हास आश्रय। मिळावे त्यांना स्थान तव चरणा जवळ। तैसेची कीर्तिमालिनीने कथिले।।९९।। मम माता अन् पिता चिंत्रागदास। मिळाले तुमचे चरणी स्थान। देऊनी तयांसी अपेक्षित वरदान। पावले सदाशिव मम अंतर्धान।।१००।।

श्री सदाशिव चरणार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु

## ।। अध्याय नववा ।।

श्री गणेशाय नमः। श्री दत्तात्रेयाय नमः। श्री स्वामी समर्थाय नमः। श्री सरस्वत्यै नमः।
श्री कुलदेवताय नमः। श्री कुलस्वामिन्यै नमः। श्री सदाशिवाय नमः। श्री ग्रामदेवताय नमः।

शिवतत्त्व अजरामर अक्षय अव्यय। वर्णन तयाचे करणे कठीण। लाभला मज स्वामींचा वरदहस्त। तयांनीच केले लिहीते मज।।१।। आहुक नाम धर्मनिष्ठ भिल्ल। पत्नी आहुका करी धर्माचे पालन। उभय होते निस्सीम शिवभक्त। परीक्षा घेण्या आले सदाशिव।।२।। अवतरले ते संन्याशी रुपात। मागितले एक रात्र करण्या निवास। धर्म पालनास्तव राहुनी कुटी बाहेर। दिला कुटीत सन्याशास आश्रय।।३।। रात्रीसमयी दिला पशूंनी त्रास। हल्ला करुन टाकले खाऊन। हाडे पाहुनी झाले सन्याशास दुःख। तेंव्हा भिल्लीण म्हणाली तयास।।४।। केले मम पतीने स्वधर्म पालन। करीन मी ही आता सहगमन। चितेत उडी घेण्याझाली सिध्द। यतिरुपातील शिव झाले प्रकट।।५।। शिव म्हणाले भिल्लीणीस। होईल हा विदर्भनृप नल। तू ही भीमनृप कन्या होशील। हंसरुपे येऊन घडविन संयोग।।६।। झाले सदाशिव लिंगरुपे स्थित। लाभले 'अचलेश' नाम त्यास। भिल्ल झाला विदर्भराज नल। दमयंती

नाम राजकन्या भिल्लीण।।७।। शिवाने तेंव्हा हंसरुप धरुन। आणिला त्यांचा विवाह घडवून। झाले ऐसे शिवाचे दोन अवतार। एक यतीश्वर अन् दुजा हंस।।८।। सांगतो शिवाचा सुरेश्वरावतार। झाला उपमन्युचा भक्ती कारण। उपमन्यु धौम्यज्येष्ठबंधु व्याघ्रपाद पुत्र। होते त्याचे घरी अतिदारिद्रय।।९।। उपमन्युस मातुलगृही मिळाले दुग्ध। दुध खूप आवडले उपमन्युस। स्वघरी आल्यावर मागितले दूध। दूध नाही घरी माता झाली खिन्न।।१०।। म्हणाली आपण राहतो वनात। शिवकृपेविना कैसे मिळेल दुग्ध। ऐकून म्हणाला उपमन्यु मातेस। करीन मी शिवकृपेस्तव तपाचरण।।११।। गेला आज्ञा घेऊन तो हिमालयावर। केले स्थापन छोटे शिवमंदिर। शिवपूजन करुन केले शिवध्यान। 'नमःशिवाय' मंत्राचा करु लागला जप।।१२।। झाले इंद्ररुपात शिव प्रकट। म्हणाले उपमन्युस माग वरदान। म्हणाला उपमन्यु नको वरदान। असावी माझी शिवभक्ती स्थिर।।१३।। म्हणाले शिव तर असती पिशाच। ते काय तुजसी वरदान देणार। ऐकून शिवनिंदा उपमन्यु कोपायमान। म्हणे ऐकून शिवनिंदा घडले पातक।।१४।। मारुन तुम्हास करीन अग्निप्रवेश। ऐसे म्हणून हातात घेतले भस्म। अभिमंत्रित करुनी टाकले इंद्रावर। योगप्रक्रीयेने केला अग्नी प्रदीप्त।।१५।। त्याचे अघोरास्त्र शिवाने घेतले करात। केला देहान्तर्गत अग्नी शांत। वृषभारुढ होऊन झाले प्रकट। सदाशिव पार्वती आणि

गणांसह।।१६।। असशी तू माझा अन् पार्वतीचा पुत्र। पेय, भक्ष्य, भोज्यांचे दिले समुद्र। म्हणाले होशील अजर आणि अमर। होशील दिव्यज्ञानी महाप्रभू।।१७।। दिधले उभयतांनी उपमन्युस वरदान। म्हणाले तू खरोखर धन्य आहेस। राहील तव भक्ती ममचरणी स्थिर। राहीन सदा मी तव आश्रमासमीप।।१८।। ऐसा शिवाचा हा सुरेश्वरावतार। असे पूर्ण करणारा सर्व मनोरथ। असे यश, आयुष्य, भोगमोक्षदायक। करीता पठण लाभे शिवलोक।।१९।। भारतीय युध्दापूर्वी महर्षी व्यास। शिवमंत्र जपत आले पांडव भेटीस। दिला अर्जुनास इंद्रविद्येचा उपदेश। सांगितले तयास 'करी शिवाराधना'।।२०।। गेला अर्जुन इंद्रकोल नगावर। केले शिवाचे पार्थिव लिंग स्थापन। करु लागला शिव उद्देशाने तप। करीत होता 'शिवपंचाक्षरी मंत्र' जप।।२१।। दुर्योधनाज्ञेने विशाल डुक्कर रुप। धरुन मूक नाम दैत्य गेला अर्जुनावर। तेंव्हा अर्जुनाने सोडला बाण। तेंव्हाच आला तेथे एक किरात।।२२।। अर्जुनाची परीक्षा घेण्यास्तव। धरीले होते शिवाने किरातरुप। त्यानेही सोडला बाण डुक्करावर। बाणासाठी झाला शिव-अर्जुन वाद।।२३।। झाले सुरु किरातार्जुन युध्द। भिल्ल करु लागला शरवर्षाव। करुनी निवारण अर्जुनाने प्रखर। केला हल्ला त्या किरतावर।।२४।। किरताने केली त्याची अस्त्रे निष्प्रभ। जाहले दोघात प्रबळ द्वंद्व युध्द। झाला उभयतात अद्‌भूत संग्राम। अर्जुनाने

मनी केला शिवस्मराण।।२५।। धरीले अर्जुनाने किराताचे पाय। लागला फिरवू तयास गरगर। तेंव्हा शिवांनी करुन स्मितहास्य। जाहले अर्जुनासमोर प्रकट।।२६।। पाहून अर्जुन झाला चकीत। जाहला अर्जुनास बहु पश्चाताप। केले तयाने शिवचरणी नमन। विनविले करावी मजसी क्षमा।।२७।। शिव म्हणाले ,''होऊ नको व्यथित। घे मागून वर तू अपेक्षित। पार्थ म्हणे 'जाहलो दर्शने पावन। द्यावा मज कार्यसिध्दीचा वर।।२८।। जाणूनी शिवाने हा आपुलाच भक्त। दिधले पार्थास पाशुपतास्त्र। म्हणाले या योगे होशील अजिंक्य। वदरहस्त ठेवून झाले अंतर्धान।।२९।।

सौराष्ट्रे सोमनाथं च श्रीशैल्ये मल्लिकार्जुनम्। उज्जयिन्यां महाकालमोंकारममलेश्वरम्।।
परल्यां वैजनाथं च डाकिन्यां भीमाशङ्करम्। सेतुबंधे तू रामेशं नागेशं दारुकावने।।
वाराणस्यां तु विश्वेशं त्र्यंबकं गौतमीतटे। हिमालये तु केदारं घुसृणेशं शिवालये।।
एतानि ज्योतिर्लिङ्गानि सायंप्रातः पठेन्नरः। सप्तजन्मकृतं पापं स्मरणेन विनश्यति।।
इति द्वादशज्योतिर्लिङ्गानि।।

शिवाचा सोमेश्वर नाम प्रथमावतार। झाला पावन सौराष्ट्र देशात। चंद्रदुःख निवारण्यास झाले शिव। शिवलिंग स्थित, असे हे दुःखनाशक।।३०।। मल्लिकार्जुन नाम द्वितीयावतार। कार्तिकेयास्तव झाला

श्रीशैल्यावर। ठेविले येथे शिवाने सूक्ष्म अस्तित्व। याच्या पूजेने होई मोक्षप्राप्ती।।३१।। महाकालवतार झाला उज्जैयनीत। झाला हा भक्तरक्षण करण्यास्तव। हुंकारे मारुन दूषण नाम दैत्यास। केले रत्नमालापुत्राचे रक्षण।।३२।। ओमकार नाम झाला चवथा अवतार। विंध्यनगाने स्थापिले शिवाचे लिंग। ओंकारेश्वर आणि परमेश्वर नाम। असती दोन्ही लिंगे अभीष्टफलदायक।।३३।। हिमालयात झाला केदारेश्वरनामक। असे केदारक्षेत्रात लिंग स्थापित। विष्णुअवतार नरनारायणाचे कारण। झाले शिवजी येथे प्रकट।।३४।। असे भीमाशंकर सहावा शिवावतार। केला शिवाने भीमासुराचा वध। भक्त सुदक्षिण याचे भक्तिकारण। डाकिनी येथे ज्योतिर्लिंग रुपात स्थित।।३५।। काशीत विश्वेश्वर नाम सप्तमावतार। असे हे ब्रह्मांडाचे स्वरुप। या नगरीचे स्वामी भगवान शंकर। ज्योतिलिंग अन् भैरव रुपे स्थित।।३६।। गौतमीतटी त्र्यंबकनाम अष्टमावतार। गौतम ॠषींच्या प्रार्थनेकारण। पाहुनी त्यांची जनोध्दर तळमळ। झाले शिव ज्योतिर्लिंग रुपे स्थित।।३७।। परळीत वैद्यनाथ नाम नवमावतार। झाला रावणाच्या निमित्तेकारण। रावण घेऊन जात असता शिवलिंग। झाले ते शिवलिंग चिताभूमीवर स्थित।।३८।। वैद्यनाथेश्वर नामे झाले ते प्रख्यात। असे याचे दर्शन भुक्तीमुक्तीदायक। नागेश्वर नाम शिवाचा दशमावतार। झाला असे भक्तरक्षणा कारण।।३९।। सुप्रिय नाम भक्ताच्या रक्षणा स्तव।

केला दारुक नमा दैत्याचा वध। अंबिकेसह झाले ज्योतिलिंग स्थित। दर्शनाने होई महापातक नाश।।४०।। रामेश्वर असे शिवाचा एकादशवतार। झाला असे हा श्रीराम कार्यास्तव। सेतुबंधावर शिवलिंग स्थापून। आराधना केली रामाने विजयास्तव।।४१।। घुश्मेश्वर नामक बारावा अवतार। झाला देवगिरीजवळ सरोवरात। सुदेह्य दैत्याने मारीले घुश्मेच्या पुत्रास। भक्तवत्सल शिवाने दिले जीवदान।।४२।। अशी ही ज्योतिर्लिंग अन् अवतार। जाहले भक्त कल्याणास्तव। या ज्योतिलिंगाचे घेऊन दर्शन। करीता पूजन होई भोगमोक्षप्राप्ती।।४३।। होई ज्योतिर्लिंग पूजने पाप नाश। मिळे या जन्मी सुख परलोकी मोक्ष। करीता ज्योतिर्लिंग नैवेद्य भक्षण। होती सर्व पापे जळून भस्मसात।।४४।। असती प्रत्येक लिंगाचे उपलिंग। त्यांचेही दर्शन पूजन पुण्यदायक। असे पृथ्वी अन् सागर संगमावर। सोमेश्वराचे उपलिंग अन्तकेश्वर।।४५।। मल्लिकार्जुनातून प्रकटले रुद्रेश्वर लिंग। असे हे लिंग भृगुकक्षेत स्थित। महाकालातून उत्पन्न दुग्धेश लिंग। असे हे नर्मदेच्या तीरावर।।४६।। ओंकारेश्वराचे उपलिंग कर्दमेश्वर नाम। स्थित असे ते बिंदु सरोवरावर। केदारेश्वरातून उत्पन्न उपलिंग भूतेश। असे यमुनेच्या तटाकी स्थित।।४७।। भीमाशंकराचे उपलिंग भीमेश्वर। असे स्थित हे सह्यपर्वतावर। नागेश्वरातून प्रकटले उपलिंग भूतेश्वर। मल्लिकासरस्वती तीरी असे स्थित।।४८।। रामेश्वराचे उपलिंग गुप्तेश्वर

नाम। घुश्मेश्वरातून प्रकटले व्याघ्रेश्वरलिंग। असती बाराही उपलिंगे जागृत। करिती ती समस्त पापनिवारण।।४९।। असती ऐशी अनेक प्रधान लिंगे। काशी मुक्तिदायिनी म्हणून ख्यात असे। शिवाचे मुख्य विश्वनाथ लिंग येथे। कृतिका वासेश्वर, तिलमांडेश्वर प्रसिध्द असे।।५०।। गंगासागर संगमी संगमेश महादेव। कौशिकीतीरी भूतेश्वर अन् नारीश्वर। गंडकीतीरी बटुकश्वेर फल्गुतीरी पुरेश्वर। उत्तरनगरी सिध्द नागेश्वर असे।।५१।। दशामेश्वमेध तीर्थी ब्रह्माने स्थापित। असे ब्रह्मेश्वर लिंग प्रसिध्द। धर्म, अर्थ, काम आणि मोक्षदायक। फलदायक असे हे लिंग।।५२।। सोमेश्वर असे आपत्ती निवारक। भरद्वाजेश्वर असे ब्रह्मतेजदायक। शूलटंकेश्वर असे सर्व कामप्रद। माधवेश्वर लिंग भक्तरक्षक असे।।५३।। ऐसेची नागेश, भुवनेश, लोकेश। कामेश्वर, गंगेश, शक्रेश्वर, शुक्रसिध्द। कपालेश्वर,वक्रेश। भीमेश्वर, सूर्येश्वर। विमलेश्वर,कंटकेश्वरादि असती प्रसिध्द।।५४।। गोदावरी पश्चिमतीरी पशुपति लिंग। दक्षिणेस असे अत्रीश्वर लिंग ख्यात। असे अत्रीश्वर लिंगाची कथा सुंदर। सांगतो आत मी तुम्हास।।५५।। चित्रकुट पर्वतावर कामद वनात। करीत होते अत्रि अनसूयेसह तप। तेंव्हा शंभर वर्षे न झाला पाऊस। होऊ लागले प्राणिमात्रांचे हाल।।५६।। अत्रि तेंव्हा झाले समाधिमग्न। करती ते ज्योतिरुप शिवाचे ध्यान। गेले सर्व शिष्य अत्रींस सोडून। करीत होती अनसूया

पतिसेवा।।५७।। शंकरही अंशरुप स्थित करुन। गेले कैलासावर ते निघून। गंगा मात्र राहीली तेथ। न झाला पाऊस चोपन्न वर्षे।।५८।। केले अत्रींनी समाधि विसर्जन। गेली अनुसूया जल आणण्यास। जात होती गंगाही मागोमाग। दिले तिने अनुसूयेस दर्शन।।५९।।अनसूयेस कथिले खड्‌डा खणण्यास। केला अनसूयेने खड्‌डा तयार। केला गंगेने खड्‌डयात प्रवेश। निर्मल जल झुळुझुळु वाहू लागले।।६०।। दिले आणून जल अत्रिऋषींस। पिऊनऋषी जाहले संतुष्ट। सुकलेले वृक्ष पाहून पूसता तियेस। म्हणाली ती नाही झाला पाऊस।।६१।। निवेदिली तिने जलाची हकीकत। आली अनसूया त्यांना घेऊन। निघाली गंगा स्वस्थानी जाण्यास। रोखीले उभयतांनी तिजसी।।६२।। झाले प्रसन्न शिव अनसूयेवर। गंगेसह शिवांनी केले तेथे वास्तव्य। झाले शिव अत्रीश्वर नामे ख्यात। झाली ख्यात गंगा मंदाकिनी नामे।।६३।। पश्चिम समुद्रतटी असे गोकर्ण स्थित। असे येथ शिवाचे आत्मलिंग साक्षात। लिंगवर्ण सत्ययुगी श्वेत, त्रेतात आरक्त। द्वापारात पीत, कलियुगात कृष्णवर्ण असे।।६४।। नेत असता शिवात्मलिंग दशानन। गणेशाने युक्तीने केले हस्तगत। हस्तगत करुन केले येथे स्थापित। देव, लोकेश, यक्ष, पितर करती रक्षण।।६५।। गोकर्णातील हे शिवात्मलिंग। असे महाबळेश्वर नामे ख्यात। महाबळेश्वर हे मोक्षाचे द्वार। होई शिवपद प्राप्ती पूजनाने।।६६।। माघ मास वद्य चतुर्दशीस।

असतो महाशिवरात्री महोत्सव। यादिनी पूजनाने होई पापनाश दर्शना येती सर्व वर्णी जन।।६७।। पशुपति नाम लिंग असे ख्यात। असे हे लिंग नेपाळ देशात। आहे शिरोभाग स्वरुपासह स्थित। करीतसे ते मनोकामना पूर्ण।।६८।। एकदा पांडव गेले असता केदारात। घेतले शंकराने महिषाचे रुप। पांडवांनी पकडली त्याची शेपूट। खाली तोंड करुन राहीला उभा।।६९।। पंडुपुत्रांसाठी राहीले तेथे शिव। नेपाळी प्रकटला महिषाचा शिरोभाग। म्हणूनी नेपाळात असे शिव। शिरोभागा सहीत ते स्थित।।७०।। शिवभक्त ऋषी होते दारुवनात करीती ते शिवाचे त्रिकाल पूजन। त्यांचे कल्याणास्तव केले लीलानाटक। होते शिवलिंग ऋषींचे हातात।।७१।। ऋषी म्हणाले गळून पडेल शिवलिंग। खरेच गळून पडले शिवलिंग। प्रज्ज्वलीत होऊन सुटले जाळीत। दारुवनातील ऋषी झाले व्यथित।।७२।। गेले सर्व तेंव्हा ब्रह्मासमीप। ब्रह्माने सांगितले ते असती शिव। गेले सर्व ऋषी शिवांना शरण। केले शिवपार्वतीचे आराधन।।७३।। पार्वती झाली योनिरुपे स्थित। ऋषींनी शिवलिंग स्थापिले त्यात। शिवपार्वती प्रतिमास्वरुप हे लिंग। झाले हाटकेश्वर नामे विख्यात।।७४।। पूर्वी एकदा दैत्य झाले प्रबळ। त्यांच्यामुळे देव जाहले संत्रस्त। आले विष्णुकडे देव समस्त। श्री विष्णू म्हणाले, ''करीन तुमचे कार्य।।७५।। गेले श्रीहरी कैलासपर्वतावर। शिवजींचे लिंग केले स्थापन। करती ते पूजन

विधानासहीत। परी शिव नच जाहले प्रसन्न।।७६।। करु लागले हरी सहस्रनाम जप। वाहती नामासह एक एक कमळ। एके दिनी शिवाने लपविले कमळ। हरींनी भक्तीने वाहीले स्वनेत्रकमळ।।७७।। जाहले सदाशिव अति प्रसन्न। दिधले त्यांनी हरींना दर्शन। शिव वदले माग वरदान। श्रीहरी म्हणाले तेंव्हा शिवास।।७८।। दैत्यत्रासे झाले सर्वजग संत्रस्त। करण्यासी त्या दैत्यांचा निःपात। द्यावे मजसी एखादे शस्त्र। हीच विनंती असे तुमचे चरणी।।७९।। दिले शिवांनी तेजःपुंज सुदर्शन। त्या चक्राने हरीने केला दैत्यसंहार। झाले सुखी देव, जगही स्वस्थ। सुदर्शन चक्राने वाढले हरि सामर्थ्य।।८०।। करी जो सहस्रनाम स्तोत्राचे पठन। होती सर्व त्याचे मनोरथ पूर्ण। करीती स्वयं विष्णु सहस्त्रनाम पाठ। असे हे अतिशय फलदायक।।८१।। सांगतो आता मी तुम्हास। महाशिवरात्री व्रताचे माहात्म्य। एकदा भिल्ल गेला शिकारीस। परी न मिळाली शिकार त्यास।।८२।। घडले तया हस्ते शिवाचे पूजन। बिल्वपत्रपूजन, जलाभिषेक। जाहले शिव त्याचेवर प्रसन्न। शिवाने त्याचे 'गुह' ठेविले नाम।।८३।। म्हणाले येतील तव घरी श्रीराम। करशील रामांना तू सहाय्य। जाहला शिवकृपे व्याध धन्य। तैसे मृग कुटुंबही झाले शापमुक्त।।८४।। सुतांनी कथिले भक्ती अन् मुक्ती स्वरुप। असती मुक्तीचे चतुर्विध प्रकार। सारुप्य, सालोख्य, सामिप्य, सायुज्य। ब्रह्मा हरिकृपे साधती पुरुषार्थ

तीत।।८५।। असती ब्रह्मादि त्रय गुणाधीश्वर। शिवच असती निर्विकार परब्रह्म। साधण्या मोक्षरुपी पुरुषार्थ। लागते असावी शिवाची कृपा।।८६।। असे भक्ती सगुण आणि निर्गुण। श्रवणादि तियेची नऊ अंगे। शिवकृपेविना न होती साध्य। शिवभक्तीनेच होतो ज्ञानोदय।।८७।। अनेकत्वाची इच्छा कैवल्यारत पुरुषास। झाले शिव सगुण रुपात प्रगट। तो शिवच जाहला पुरुष। शक्ती झाली तयापासून उत्पन्न।।८८।। केले तयांनी प्रकृती पुरुष। परमात्मा सांगे करावे तप। नव्हते त्यास्तव योग्य स्थान। केली शिवजींनी नगरी उत्पन्न।।८९।। पुरुष श्रीहरिने केले वास्तव। श्रमाने जल वाहीले अंगातून। व्यापीले जलाने शून्य आकाश। श्रीहरींनी हालविले स्वमस्तक।।९०।। तेंव्हा मणी पडला कानातून। झाले तेथे मणिकर्णिका क्षेत्र। बुडू लागली नगरी त्या जलात। शिवांनी त्रिशूळावर नगरी धरीली।।९१।। शिवेच्छेने हरीच्या नाभीकमळातून। जाहले तेंव्हा ब्रह्मा उत्पन्न। चौदा भुवनयुक्त रचिले ब्रह्मांड। केली ब्रह्माने अद्‌भूत सृष्टी निर्माण।।९२।। शिवानी ठेविली नगरी पाचकोस। सर्व ब्रह्मांडापासून ती अलग। परी सर्व प्राण्यांच्या कल्याणस्तव। स्थापिले तेथे अविमुक्त लिंग।।९३।। त्या नगरीस स्थापिले मर्त्य लोकात। काशी ही ज्ञान, कर्म, मोक्षदायक। असे हे काशीक्षेत्र अविनाशी अव्यय। असे शिवजींस ते अतिप्रिय।।९४।। कैलासपती शिव सत्त्वगुणी आतून। तमोगुणी आहेत ते बाहेरुन। कालाग्नीरुद्र

नामे प्रसिध्द। ते निर्गुण शिवतत्त्वाचे साकाररुप।।९५।। कालाग्नी रुद्राने विनविले शिवास। करावी तुमची राजधानी काशीस। करावा काशीत उमेसह निवास। करावा तुम्ही जगदोध्दार।।९६।। अविमुक्ताने तेंव्हा विनविले शिवास। असा दिव्यौषधी कालरुपी रोगावर। मीही ध्यान करीत येथेच राहीन। करावा तुम्ही येथे नित्य निवास।।९७।। शिवतत्त जाणणे असे कठीण। वर्णन करणे असे सर्वथा अशक्य। परी स्वामीकृपे शिव प्रसन्न। त्यांनीच नवशती घेतली लीहून।।९८।। असती माझे स्वामी स्वयं समर्थ। त्यांच्याच कृपेने लाभले सामर्थ्य। स्वामींचाच असे माझा विचार। प्रत्येक श्वास माझा असती स्वामी।।९९।। स्वामीसमर्थ तुम्हीच जगन्नाथ। ठेवितो तुमचे चरणी मस्तक। लिहवून नवशती केले कृतार्थ। असे मी तुमचाच दासानुदास।।१००।।

श्री सदाशिव चरणार्पणमस्तु। श्री स्वामी समर्थ चरणार्पणमस्तु

।।श्री।।

।।श्री स्कन्वाग्रजायनमः।।

शङ्कराचर्नम्

विश्वमान्य-विश्वनाथ-विश्ववन्द्यमीश्वरम्।
देवदेवमहादेवं, देववृन्दवन्दितम्।।
प्रथमनाथं,भूतनाथं,नारदादिवर्णितम्।
तं स्मरामि, तं भजामि, तं नमामि शङ्करम्।।१।।
ॐ नमः शिवाय।

मन्थनेनमुद्भवं विषंधरं धुरंधरम्।
विष्णुपादमुद्भवं सुरनदीं जटाधृतम्।।
किशोर चन्द्रशेखरं, स्फुरत्फणाफणिधरम्।
तं स्मरामि, तं भजामि, तं नमामि शङ्करम्।।२।।
ॐ नमः शिवाय।

मखेमृतांसतीं विलोक्य, रौद्ररुप धारकम्।
वीरभद्रनिर्मितं, दक्षयज्ञनाशकम्।।
विचित्रनृत्यनाटितं,विकटहास्य हासितम्।
तं स्मरामि, तं भजाति, तं नमामि शङ्करम्।।३।।
ॐ नमः शिवाय।
अनङ्गरंगभंजकं, त्रिअम्बकं, पुरान्तकम्।
चिताभस्मधारकं,चित्तवृत्तिरोधकम्।।
तपोनिधिं, महामुनिं चिदानन्दकन्दकम्।
तं स्मरामि, तं भजामि, तं नमामि शङ्करम्।।४।।
ॐ नमः शिवाय।
भक्तवृन्दसेवितं, चिदम्बरं, दिगम्बरम्।
राघवेन्द्रपूजितं, धराधरेन्द्रवन्दितम्।
जनानन्ददायकं, मङ्गलप्रदायकम्।

तं स्मरामिं, तं भजामि, तं नमामि।।५।।

ॐ नमः शिवाय।

रामात्मजः

डॉ. अरविंद जोशी

**।श्री स्वामी समर्थ अमृत रक्षा शाबर मंत्र।**

ॐ परब्रह्म परमात्मने नमः

उत्त्पती स्थिती प्रलय कराय ब्रह्म हरी हराय

त्रिगुणात्मने सर्व कौतुकानी दर्शय दर्शय स्वाः

स्वामी देवे कमल का फुल, कमल के फुल में सच्ची मिठाई

अमृत रक्षा देने भवँर को कमलदल में छिपाई

ॐ गणपती यहाँ पठाऊ तहां जावो

दस कोस आगे जा दस कोस पिछे जा

दस कोस सज्जे दस कोस खब्बे

मैया गुफा की आज्ञा मन रिध्दी सिध्दी देवी लान

अगर सगर जो न आवे तो माता पारवती की आन

जय हो मंगलमुर्ति गणेश जी रक्षा करो रक्षा करो भगत की

ॐ गनपत वीर जो फल माँगू सो फल आन

गनपत के छत्र से बादशाह डरे
राजा के मुख से प्रजा डरे हाथा चढ़े सिंदूर
औलिया गौरी का पुत गनेश गुग्गुल की ढेरी
रिध्दी सिध्दी गनपत धनेरी जय गिरनार पती चिंतामणि
रक्षा करो मेरी हे मेधा पती
आद अंत धरती आद अंत परमात्मा दोनो विच बैठे शिवजी महात्मा
खोल घडा दे दडा देखा शिवजी महाराज तेरे शबद का तमाशा
रक्षण करके सारी बुराई को देवे झासा
गौरी गौरी शिव की जोरी संकट को जोर से मारी
जरा दलिद्रय को मुल से सवारी
सुख समृध्दी फुलावे गौरामाई पाप हारी
रक्षण करो रक्षण करो जय अंबे सुखकारी
कुट कुट कोटन को काटे खोल खोल भागन को खोले

हरे मुरुगा हरे मुरुगा शिवा कुमारा हरो हरा
हरे कंधा हरे कंधा हरे कंधा हरो हरा
हरे षण्मुखा हरे षण्मुखा हरे षण्मुखा हरो हरा
हरे वेला हरे वेला हरे वेला हरो हरा
हरे मुरुगा हरे मुरुगा ॐ मुरुगा हरो हरा
रक्षा करो रक्षा करो हरे कंधा रक्षा करो
झोली भरो झोली भरो हरे कार्तिका झोली भरो
ग्यान के सागर में होवे हाथी की सुंड
कमल के आरों में शोभे विष्णुजी का पिंड
रक्षावे भगत दुरावे माया का बहाना
चुनके दिलावे भक्ती शक्ती का खजाना
लक्ष्मी माई सत्य की सवाई आवो माई करो भलाई
विष्णु प्रिया लक्ष्मी शिव प्रिया सती से प्रकट हुई कामाक्षा भगवती

आदिशक्ती युगल मुर्ती अपार दोनो की प्रीती अमर जाने संसार
रक्षा कर महामाई आय बढा व्यय घटा
दरिद्रय रोग को मुलसे काटा दुख भोगन को देवे सोटा
चुटकी बजाके क्षण में दिलावे सोने का लोटा
धन की बौछार करके रक्षा करो लक्ष्मी माई
सुंदर करो जीवन पुत्र पौत्रन से फुलाई
चारों वेदसे भरा है आंगन चौसठ कलाओं से फुला है चमन
धर्म गिता ग्यान से चमकावे भांडार
पुरावे आठो सिध्दी खोलके माया किवार
अधिपती ब्रह्मा राजन का दरबार भगत की रक्षा करावे लोह की दिवार
श्री सरस्वती माई स्वर्ग लोक बैकुंठ से आई
शिवजी बैठे अंगुठ मरोड देवता आया तेतिस करोड
संत भक्तन की रक्षा करे दैत्योंका भक्षण करे

विद्या दिलाके ग्यान स्फुरावे सरस्वती दिनन की रक्षा करावे
ॐ ऱ्हि श्रीं चामुंडा सिंह वाहीनी बिस हस्ती भगवती
रत्न मंडीत सोनन की माल उत्तर पथ में आप बैठी
हाथ सिध्द धन धान्य देहि देहि रक्षा करो मेरी माई
नकदी दौलत सोनन को पुराई
जय हो माई जय हो माई राखो मेरा मान
सुख रक्षा अंजन करके दिलावे सन्मान
जय मल्हार जय मल्हार घोडे पे होके सवार
सिंहासन पर बैठे दास झुलावे चवार
भुतन मारे टोना टंबर को टाले रक्षण कराके नसीब का ताला खोले
चल चल चले नवग्रहों का मेला सवांरे नसीब देवे सुभाग्य का थैला
शतरंज खेलके मौज में फेके फासा
ग्रह तारका रक्षण करावे पुत की खासा

माटी का कुंडा कुंडे में पिंड राखन कराके झुल झुलावे ब्रह्मांड
काली काली महाकाली चमकाके बिजली बजावे ताली
काली काली इंद्र की बेटी ब्रह्म की साली
पित भर भर रक्त प्याली उठ बैठी पिपल की डाली
दोनों हात बजाए ताली जहाँ जाये वज्र की थाली
वहाँ न आए दुश्मन हाली सदा करे दुर्भोगन को खाली
रक्षण करावे जय हो महाकाली
वीर वीर बावन वीर नाम लेवे तो जलावे तीर
जंगडी तंगडी लंगडी पुकार के होवे भांगडी
जय हो महावीर विजय तो पहने सफेद पगडी
दक्ष दक्ष साजे रक्षण की रक्ष रक्ष राखे भक्तन की
कुबेर कुबेर परचंड धन के पाली लज्जा राखो भक्तन की हे रखपाली
आठों दिशा से भंडार भरता भारी

धन ज्योत जगाओ कडकापन को मारी
निगरानी करके हिफाजत करना मेरी
बढाओ मंजिल दौलत की होके सवारी
ॐ नमो हनुमंत वीर धरती आकाश धरती पीता धरती धरेना धीर
बाजे सिंगी बाजे तर्तरी आयो गोरख नाथ
मीन का पुत मुंज का छडा लोहे का कडा
हमारे पिठ पिछे वीर हनुमंत खडा
वज्र का कोठा जिस में पींड हमारा बैठा
इश्वर कुंजी ब्रह्म का ताला इस घट पिंड का यती हनुमंत रखवाला
पाताल के बादशाह पाताल के शहंशाह
नागों के राजा ईशाधारी ईशा काम पुरन करनी मणियों के राजा
मणियों मे रहना मणि अमर अमृत कुंड के देशा
नागन के राजा राणी बैठे पाताल के देशा

ईशा पूरवाके रक्षा भक्तन की करनी
आस पुरावे जय हो नागन की राजा रानी
आद भैरो जुगाद भैरो भैरो है सब भाई
भैरो ब्रह्मा भैरो विष्णु भैरो ही भोला साई
भैरो देवी भैरो देवता भैरो सिध्द भैरोनाथ
गुरु भैरो पीर भैरो ग्यान भैरो ध्यान
भैरो योग वैराग भैरो बीन होय ना रक्षा भैरो बीन बजे ना नाद
काल भैरो विकराल भैरो घोर भैरो अघोर भैरो
भैरो की कोई ना जाने सार भैरो की महीमा है अपरंपार
श्वेत वस्त्र श्वेत जटाधारी हत्थ में मुदगर श्वान की सवारी
सार की जंजीर लोहे का कडा जहां सिमरु भैरोबाबा हाजिर खडा
कड कड कडके बीजली कडके रक्षा करने चौसठ भैरो भडके
बज्र बज्री बज्र किवाड बज्री में बांधा दशोद्वार को घाले

उलट वेद बाही को खात पहिली चौकी गणपती की
दुजी चौकी हनुमंतजी की तिजी चौकी भैरव की
चौथी राम की पाचवी कृष्ण की छटवी चामुंडा की
सातवी महाकाली की आठवी महीषासुर मर्दीनी की
नौवी तैतीस करोड देवता की
रक्षा करने को श्री नरसिंह देवजी आए साथ साथ आवे उनके रखवाल
भगत की रक्षा करावे आठों दिक्पाल
जादू टोना ठोकके मार भगावे
भाग्य विधाता होके भक्तन का जीवन फुलावे
जय हो स्वामी जय हो स्वामी जय हो तेरी सवारी
रक्षा करके मेरी सदा सत्य को फवारी
हाथ में दंडा सिर पे पगडी झुले हो महाराज
दिव्य अंजली पान से प्यास बुझावे आज

नौ रंगो की चुनरी ओढके खुष करे जहान
दिव्य ग्यान बुटी दिलाके बनावे सबसे महान
अटक मटक चटक लटक लटक सटक तटक
पेहरा देके याचक के दुभार्ग झट से पटक
कोटन सुरज का तेज कोटन चांद की ठंडी करे पालन पोषण
कोटन स्वामी के हाथ रक्षण करावे दिल से भावन
सदाही जय हो तुम्हारी अवलिया स्वामी साई
कोटी छत्र छाया देकर करो भगत की भलाई
ॐ स्वामी ॐ स्वामी ॐ स्वामी